**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.७ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**
संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३४ ■ रविवार ६ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

**भतवाल हॉस्पिटल म्हणजेच**
**गंगाराम हॉस्पिटल**
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# पाकिस्तानमध्ये पुन्हा लष्कराचे वर्चस्व वाढविणारा निर्णय मुनीरांच्या हाती तिन्ही सैन्यदलांची सूत्रे, अण्वस्त्रांवरही ताबा

**इस्लामाबाद, दि.५- पाकिस्तानात लष्कराचे वर्चस्व अधिक बळकट करणारा एक ऐतिहासिक आणि वादग्रस्त निर्णय घेण्यात आला आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच एकाच लष्करी अधिकाऱ्याकडे भूदल, नौदल आणि हवाई दल अशा तीनही सैन्यदलांची कायदेशीर कमान सोपवण्यात आली आहे. पाकिस्तानच्या संसदेने डिफेन्स फोर्सेस ऑफ पाकिस्तान ॲक्ट २०२६ हा कायदा मंजूर केला असून, त्याअंतर्गत चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस (सीडीएफ) या सर्वोच्च पदाची निर्मिती करण्यात आली आहे. फील्ड मार्शल असीम मुनीर हे पाकिस्तानचे पहिले सीडीएफ बनले असून ते लष्करप्रमुखपदासोबतच या नव्या पदाची धुरा सांभाळतील. द इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.**



सन १९७६ नंतर पाकिस्तानच्या लष्करी रचनेत झालेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा फेरबदल मानला जात आहे. यापूर्वी तीनही दलांमध्ये समन्वयासाठी चेअरमन ऑफ द जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ कमिटी हे पद अस्तित्वात होते. मात्र त्या पदाला नौदल किंवा हवाई दलाला थेट निर्णय देण्याचे कायदेशीर अधिकार नव्हते. नव्या सीडीएफ पदामुळे मुनीर यांना तीनही दलांवर थेट ऑपरेशनल कमांड मिळाली आहे. या निर्णयामुळे पाकिस्तानातील संरक्षण तज्ज्ञांमध्ये दोन गट पडले आहेत. नव्या कायद्यानुसार देशाच्या अण्वस्त्र कमांडचे प्रमुखपद आता केवळ लष्कराच्या अधिकाऱ्याकडेच राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. रावळपिंडीतील एका निवृत्त थ्री-स्टार जनरलने अल जझीराला दिलेल्या माहितीनुसार, नवी रचना पूर्णपणे लष्करकेंद्री असून नौदल आणि हवाई दलातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नती व निर्णय प्रक्रियेवर आता लष्कराचाच प्रभाव राहील.

**लोकशाही आणि नागरी नियंत्रणावर प्रश्नचिन्ह**

या पुनर्रचनेमुळे सरकारचे लष्करावरील (पान ८ वर)

## रामकुंडात स्नानासाठी उतरलेली पाच मुले बुडाली

नाशिक, दि.५- नाशिकमधील रामकुंडात स्नानासाठी उतरलेल्या मुलांपैकी पाच जण बुडाले. स्थानिक नागरिक आणि जीवरक्षक दलाने तातडीने बचाव कार्य हाती घेतल्याने चार मुलांना वाचवण्यात यश आले, तर एका मुलाचा बुडून मृत्यू झाला. मूळचे उत्तर भारतीय असलेले आणि काही वर्षांपासून मुंबईत राहणाऱ्या जणांचा ग्रुप धार्मिक पर्यटनासाठी नाशिकमध्ये आले होते. सकाळी गोदावरी नदीत स्नान करून शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचा त्यांचा नियोजित कार्यक्रम होता. सकाळी सगळे गोदावरीतील रामकुंडात स्नानासाठी उतरले. त्यांच्यासोबतची मुलेही पाण्यात उतरली. यात पाच मुले बुडायला लागली. जीवरक्षक दलाचे जवान धावले आणि त्यांनी मुलांना वाचवण्याचे प्रयत्न केले. चार मुलांना वाचवण्यात यश आले, मात्र गोपाल गुप्ता या बालकाचा मृत्यू झाला.

## पेपरफुटीचे धागे दोरे मंत्रालयाशी

# गौरव पाटलांच्या घरात रहाणे हा योगायोग मंत्र्यांचे ओएसडी गणेश देवरे यांचा खुलासा

**नंदुरबार, दि.५(प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणाचे धागे आता मंत्रालयापर्यंत पोहोचल्याची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणातील आरोपी गौरव पाटील याच्या नंदुरबार येथील घरात औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ यांचे ओएसडी गणेश देवरे हे सुमारे तीन वर्षे भाडेकरू म्हणून राहत होते, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे या बाबीचा पेपरफुटी प्रकरणाशी काही संबंध आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित झाले असून पोलिस तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

दरम्यान, या प्रकरणात आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली असून तपासादरम्यान रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. नंदुरबार येथील कौटिल्य केडमी, तेथील संबंधित व्यक्ती आणि पेपरफुटी प्रकरणातील आरोपी यांच्यातील संबंध तपासले जात आहेत.

या प्रकरणातील आरोपी ऋतूजा पाटील हिचा मित्र असलेल्या गौरव पाटील याच्या घरात ओएसडी गणेश देवरे हे भाडेकरू म्हणून राहत असल्याची बाब समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे. काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

गणेश देवरे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना आपण गौरव पाटील यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहत होतो, ही बाब मान्य केली आहे. मात्र, आपले वास्तव्य हा निव्वळ योगायोग असून पेपरफुटी प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोषींवर कारवाई झाली पाहिजे आणि या प्रकरणाचा सखोल तपास व्हावा, अशी भूमिकाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शिवसेनेचे संपर्कप्रमुख संदीप मोरे तसेच पंडित माळी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. पेपरफुटी प्रकरणातील सर्व आरोपींचा तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

## उड्डाणपुलाच्या कामामुळे वाहतूक कोंडी अरुंद पुलावर अवजड ट्रॉला अडकला

**सोनगीर दि. ५ (प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील वाघाडी फाट्याजवळ सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या संथ आणि त्रुटीपूर्ण कामामुळे प्रवाशांचा खोळंबा सुरूच आहे. शुक्रवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास कारखान्याची अवजड यंत्रसामग्री वाहून नेणारा एक भव्य ट्रॉला या भागातील तात्पुरत्या अरुंद पुलावर अडकला. यामुळे महामार्गावर दोन्ही बाजूंनी १ ते दीड किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून प्रचंड वाहतूक कोंडी झाली.**

सोनगीरहून अमळनेर मार्गावर ये-जा करताना होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी येथे उड्डाणपूल मंजूर करण्यात आला आहे. मात्र, संबंधित ठेकेदार कंपनीने योग्य आणि सुरक्षित सर्व्हिस रस्ता न उभारताच वाहतूक वळवल्याने हा मार्ग अपघाताचा केंद्रबिंदू बनला आहे. बालाजी नगरकडे जाणाऱ्या बोगद्याजवळ दोन्ही बाजूंना करण्यात आलेले दोन पदरी सिमेंटचे सर्व्हिस रस्ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण आहेत. आर्थिक फायद्यासाठी कंत्राटदाराने अपूर्ण रस्त्यावरूनच वाहतूक सुरू केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. सर्व्हिस रस्त्यावर चढताना (पान ८ वर)

## एमबीबीएसच्या विद्यार्थ्याची गळफास घेवून आत्महत्या

नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाचे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका परप्रांतीय विद्यार्थ्यांचा गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना उघडकीस आल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शहरातील धुळे रस्त्यावरील गांधीनगरातील अंबिका ट्रेडर्सच्या मागील बाजूस असलेल्या इमारतीच्या वरच्या मजल्यावरील खोलीत मयंक हरिशंकर पंड्या (वय २१) हा विद्यार्थी राहत होता. दि ३ सप्टेंबर रोजी पोलिसांनी भेट दिली असता मयंक पंड्या हा पंख्याला बांधलेल्या दोरीच्या साह्याने गळफास (पान ८ वर)

## कावठे गावालगत भीषण अपघातात स्कुटीवरील दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू

**साक्री, ५ (प्रतिनिधी)- साक्री शहरा बाहेरुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर कावठे गावालगत असलेल्या हॉटेल ताज जवळ अपघात होऊन नवरा आणि बायको दोन्ही गंभीर दुखापत झाले आहेत.त्यांना साक्री ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले**

शनिवार सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास दहिवेलकडून साक्री कडे येत असतांना स्कूटी क्र. जी.जे १६ ए.एम ४८६६ आणि आयशर क्रमांक जी.जे १३ ए.एक्स ७४८४ यांच्यात अपघात



घडला. अपघातात राजेंद्र महारु नेरकर आणि रेखा राजेंद्र नेरकर राहणार वसमार ह.मु.म्हसदी हे दहिवेलकडून साक्रीकडे येत असताना हॉटेल ताज अपघात झाला. अपघातात गंभीर दुखापत झाल्याने दोघे गंभीर दुखापतींना १०८ आणि खाजगी ॲम्बूलंसच्या साह्याने साक्री ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी (पान ८ वर)

## शहरासह जिल्ह्यात चोरी घरफोडीचेही सत्र सुरूच

धुळे, दि.५- शहरासह धुळे जिल्ह्यात गेल्या काही दिवसात चोरी घरफोडीचे प्रकार सातत्याने सुरू आहेत. धुळे तालुका व मोहाडी तसेच शहर हद्दीत चोरट्यांनी कहर केला असून दिवसाआड चोरीचे प्रकार घडत आहेत. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यापलीकडे कुठलीही कारवाई नसल्याचे दिसते. त्यामुळेच की काय चोरटेही बिनधास्तपणे एकापाठोपाठ एक घर मटार्गेटफ करीत आहेत. विंचूर (ता. धुळे) येथे एका ग्राम महसूल अधिकाऱ्याच्या घराचे कुलूप तोडून सुमारे पाच लाखाचा ऐवजसह रोकड लंपास केली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला. विंचूर येथील ग्राममहसुल अधिकारी जिजाबराव (पान ८ वर)

## आ.अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त मुलांच्या हृदयविकार क्लिनिकचा शुभारंभ

**धुळे, दि.५- : आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे जिल्ह्यातील लहान बालकांसाठी महत्त्वपूर्ण आरोग्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जिल्हा रुग्णालय धुळे, मुंबई येथील किम्स हॉस्पिटल आणि एबी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने लहान बालकांच्या हृदयविकार क्लिनिकचा शुभारंभ रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा रुग्णालयात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.**



लहान बालकांमध्ये आढळणाऱ्या विविध हृदयविकारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व पुढील उपचारांचे मार्गदर्शन या क्लिनिकच्या माध्यमातून मिळणार आहे. मुंबई येथील किम्स हॉस्पिटल हे बालकांच्या हृदयविकार शस्त्रक्रियांसह विविध जटिल शस्त्रक्रियांसाठी प्रसिद्ध असून, या रुग्णालयाचे डॉ. श्रीनिवास व त्यांची तज्ज्ञ टीम या उपक्रमात सहभागी होणार आहे. तज्ज्ञ डॉक्टर स्वतः मुंबईहून धुळ्यात येऊन बालकांची तपासणी करणार असल्याने (पान ८ वर)

## तळागाळातील नागरिकांपर्यंत न्याय पोहोचविण्यासाठी सोनगीरपाड्यात कायदेविषयक सहाय्य, मार्गदर्शन केंद्र

**नंदुरबार, ५(प्रतिनिधी)- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये नंदुरबार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सोनगीरपाडा, ता. जि. नंदुरबार येथे कायदेविषयक सहाय्य व मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली.**



या केंद्राचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश-१ ए. एच. सैय्यद यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर के. ए. नहार, गटविकास अधिकारी अर्जना वागमोडे, ग्रामविस्तार अधिकारी सागर राजपूत, ग्रामसेवक रावजी रोडया माहले तसेच सरपंच उरीदास गांगुर्डे उपस्थित होते.

या मेगा ड्राईव्हचा प्रमुख उद्देश तळागाळातील नागरिकांना मोफत कायदेविषयक सहाय्य, मार्गदर्शन व विधी सेवा उपलब्ध करून देणे, तसेच नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची आणि कायद्याची माहिती करून देणे हा आहे. यासोबतच विविध शासकीय योजना, विधी सेवा योजना आणि नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

या केंद्राच्या माध्यमातून कौटुंबिक वाद, महिला व बालकांशी संबंधित समस्या, ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, विविध नागरी व कायदेविषयक बाबी तसेच मोफत विधी सहाय्य मिळण्याबाबत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायत प्रशासन तसेच नंदुरबार येथील (पान ८ वर)

## डोंगरे महाराल नगरात घरफोडी

धुळे, दि.५- शहरातील पारोळा रोड डोंगरे नगर मधील कापड व्यावसायिकाच्या बंद घरातून चोरट्यांनी भरदिवसा पाच लाख पंधरा हजारांचा ऐवज कंपास केला. डोंगरे महाराज नगरमध्ये निलेश किसनलाल खंडेलवाल यांचे वास्तव्य आहे. बुधवारी (ता.२) बाहेर गेल्याने दुपारी त्यांचे घर बंद होते. दुपारी ते घरी परतले असता घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी घरातून ५० हजारांची रोकड, सोने-चांदीचे दागिने, एअर बॅग असा एकूण ५ लाख १५ हजार २०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी आझाद नगर पोलिसात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.



## अवैध धंदे विरोधी आंदोलन लेखी आश्वासनामुळे तुर्त स्थगित : ॲड.गोरे

**धुळे, दि.५- गेल्या २५ ऑगस्ट पासून सतत नऊ दिवस अवैध धंदे व वाढत्या गुन्हेगारी विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष युवासेना महाराष्ट्र राज्य सहसचिव ॲड. पंकज गोरे यांच्या माध्यमातून आंदोलन उपोषण सुरू होते. पोलीस प्रशासनाने अवैध धंद्यांवर कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पूरते स्थगित करण्यात आले आहे.**

शहरात चौका (पान ८ वर)

## रस्त्यांसह खुल्या जागांना अतिक्रमणाचा विळखा; शहादा नगरपालिकेचे दुर्लक्ष

**शहादा,दि.०५(का.प्र.)- नगरपालिका बांधकाम विभागाचे अभियंता ,अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शहरात सध्या ठिकठिकाणी अतिक्रमणात प्रचंड वाढ झाली आहे. संबंधित विभाग प्रमुखांनी या गंभीर समस्येकडे सोयीस्करपणे पाठ फिरवल्यामुळे अतिक्रमणधारकांचे धाडस वाढले असून शहरातील मुख्य रस्त्यांसह खुल्या जागांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. या वाढत्या अतिक्रमणामुळे केवळ रहदारीचा खोळंबा होत नसून शहरात कायदा व सुव्यवस्थेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.**

सध्या शहरातील डोंगरगाव रोड, जुना मोहिदा रोड, शासकीय विश्रामगृह परिसर, सप्तशृंगी मंदिर परिसर, पंचायत (पान ८ वर)



## एसएफआय व डिवायएफआय विविध मागण्यांसाठी शहाद्यात निदर्शने

**शहादा,दि.०५(का.प्र.)- दरा व चिंचोरा परिसरातील विद्यार्थ्यांना म्हसावद, लोणखेडा व शहादा येथे शिक्षणासाठी ये-जा करण्यास सुलभ व्हावे, यासाठी पुरेशी व नियमित बस सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात यावी, या मागणीचे निवेदन स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया व डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने शहादा आगार प्रमुखांसह प्रांताधिकारी कार्यालयात देण्यात आले.**

दरा व चिंचोरा भागातील अनेक विद्यार्थी (पान ८ वर)

## अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण

**शिरपूर, दि.५- माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. तपनभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनच्या संचालिका सौ. द्वेता पटेल नथवानी यांच्या मार्गदर्शनाखाली बोंबल्या पाडा (रोहिणी), ता. शिरपूर, जि. धुळे येथे भव्य वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.**



या अभियानांतर्गत परिसरात तब्बल २ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली.या कार्यक्रमास श्रीमती केतकीबेन मुकेशभाई पटेल, श्रीमती अलकाबेन पटेल, माजी जि. प. सदस्य कैलास पावरा, माजी जि.प. सदस्य योगेश बादल, सरपंच खुमसिंग पावरा, अस्तित्व फाउंडेशनच्या समन्वयिका सोनिया भसीन, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी यांच्यासह आर. सी. पटेल आश्रमशाळा, निमझरी, वाघाडी, असली व चोपडा येथील शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.पर्यावरण संवर्धन, परिसर हिरवागार करणे तसेच भावी पिढीसाठी शाश्वत व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. वाढदिवस व जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम राबविण्यात आला.या वृक्षारोपण अभियानात आर.सी. पटेल आश्रमशाळा, निमझरी, वाघाडी, (पान ८ वर)

## धुळे तालुक्यासह जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा- शिवसेना उबाठा मागणी

**धुळे,दि.५-राज्यात पावसाची १६ टक्के तुट असली तरी यावेळी धुळे जिल्ह्यात साधारणत: ४६% पाऊस झाला आहे. यंदाचा खरीप हंगाम उशीराने सुरु झाला. पण गेल्या २८ दिवसापासून पावसाने दडी मारल्याने पावसाअभावी मका, कापुस, बाजरी, ज्वारी या प्रमुख पिकांच्या वाढीवर परिणाम होऊ लागला आहे. पिके वाचविण्यासाठी शेतकरी बांधव दमदार पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. शेतकरी वर्ग भयानक चिंतेत आहे. ही सगळी दुष्काळ सदृश परिस्थिती बघता शासनाने औपचारिक निकषांची प्रतिक्षा न करता तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे यांनी केली आहे.**

खरीप (पान ८ वर)

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,41,250 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

**हार्दीक अभिष्टचिंतन**



**श्री.प्रविण भगवान चौधरी (आबासाहेब)**
मो.नं.९८२३०७०८६९
तुमच्या आयुष्यात सदैव आनंद, समृद्धी आणि उत्तम आरोग्य नांदो!
वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा!
-: शुभेच्छूक :-
गजानन कोतकर स्वप्निल कोतकर
विनय कोतकर परीन कोतकर
कोतकर परीवार धुळे, पिंपळनेर
गजानन ग्रुप, धुळे

**स्मरणपुष्प १६ वे**



**स्व. रमा भास्करन पुतनपुरे**
(स्वर्गवास - ६.९.२०१०)

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमें
अपार कष्ट सहकर, आपने हमे
जीवन में सक्षम बनाया।
आप हमेशा हमारे हृदयमे विराजमान
रहेंगे और आपका आशिर्वाद भी
हमेशा हमारे साथ रहेगा।।
आपके पवित्र श्रीचरणोंमे विनम्र अभिवादन।

* श्रध्दावनत *
**वासवा फॅमिली**
एवं समस्त कर्मचारी धुलीया.



# यकृत प्रत्यारोपणासाठी साडेतीन लाखांची मदत- आ. राम भदाणेंच्या प्रयत्नांना यश

**धुळे, दि.५- धुळे ग्रामीण मतदारसंघातील फागणे येथील रहिवासी भटू प्रकाश पवार यांच्या यकृत प्रत्यारोपणाच्या उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ३ लाख ५० हजार रुपयांची भरीव मदत मंजूर करण्यात आली आहे. आमदार राम भदाणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मदत मिळाली आहे. ही मदत मंजुरीचे पत्र माजी सभापती तथा लोकनियुक्त सरपंच ज्ञानज्योती भदाणे यांच्या हस्ते देण्यात आले.**

फागणे येथील भटू पवार यांना यकृत प्रत्यारोपणासाठी मोठ्या खर्चाची गरज होती. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी आमदार राम भदाणे यांच्याकडे मदतीविषयी सांगितले होते. आमदार भदाणे यांनी तात्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यासंदर्भात अर्ज करून विशेष प्रयत्न केलेत. त्या प्रयत्नांना यश आले असून मुख्यमंत्री सहायता निधीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा या बँक खात्यात अर्थसहाय्य वर्ग करण्यात आले आहे. प्रथम नियमित मंजूर रक्कम दोन लाख रुपये आणि अधिक विशेष बाब म्हणून अतिरिक्त अर्थसहाय्य दीड लाख रुपये, असे एकूण साडेतीन लाख रुपये मंजूर झाले आहेत. ही रक्कम अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

जगण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीला मुख्यमंत्री सहायता निधीचे बळ यकृत प्रत्यारोपनामुळे पवार यांना नवे जिवन मिळणार आहे. त्यांच्या जगण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीला मुख्यमंत्री सहायता निधीचे बळ मिळाले आहे.

भटू पवार यांच्या कुटुंबाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ.राम भदाणे, मुख्यमंत्री सचिवालयाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक, राज्याचे वैद्यकीय समन्वयक डॉ. स्वानंद सोनार, राज्य समन्वयक डॉ. रितेश पाटील, जिल्हा समन्वयक डॉ. मनोज विसपुते आदींचे आभार मानले आहेत. तर जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश पाटील, कमलेश भोई, कपिल पिवाल, मुख्यमंत्री सहायता निधीसाठी आमदार प्रतिनिधी वीरपाल गिरासे आदींनी मंजुरीसाठी सहकार्य केले.

आमदार राम भदाणे हे केवळ विकासकामेच नव्हे तर गोरगरीब रुग्णांच्या मदतीसाठीही नेहमी धावून जातात. त्यांना वैयक्तिकसह मुख्यमंत्री निधी व इतर माध्यमातूनही मदत मिळवून देत असतात. मतदार संघातील विविध प्रश्न सोडविणे. विकासकामे करणे. त्याचबरोबर आबालवृध्दांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा वसा आमदार भदाणे यांनी घेतला आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल समाधान व्यक्त आहे.

# मौलाना आझाद महामंडळाच्या कर्जदारांना मोठा दिलासा द्या प्रशासकीय दिरंगाईची उच्चस्तरीय चौकशी करा : ॲड.जुबेर शेख

**धुळे, दि.५- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत वितरित करण्यात आलेल्या शैक्षणिक कर्जांची सरसकट माफी करावी, सर्व कर्जप्रकारांवरील संचित व्याज पूर्णतः रद्द करावे आणि कर्जबुडवू अशा नावाच्या व्हॉट्सॲप समूहांद्वारे कर्जदारांची होणारी अवमानकारक अडवणूक त्वरित थांबवावी, अशी ठाम आणि सविस्तर मागणी समाजवादी पार्टी महाराष्ट्रचे प्रदेश सचिव ॲड.जुबेर शेख यांनी राज्य शासनाकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा पवार यांना एका सर्वसमावेशक निवेदनाद्वारे वस्तुस्थितीची जाणीव करून देत तातडीच्या हस्तक्षेपाची विनंती केली आहे.**

ॲड.जुबेर शेख यांनी विविध जिल्ह्यांत प्रत्यक्ष फिरून, शेकडो कर्जदार, त्यांचे कुटुंबीय आणि जामीनदार यांच्या भेटी घेऊन तळागाळातील वास्तव अभ्यासले. त्यांच्या या सखोल पाहणीतून धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. अनेक प्रकरणांमध्ये कर्ज थकीत झाल्यानंतर तब्बल १० ते १२ वर्षे महामंडळाकडून कोणतीही वसुली प्रक्रिया राबवण्यात आली नाही किंवा कोणतेही स्मरणपत्र पाठवले गेले नाही. आता अचानक प्रदीर्घ काळानंतर थेट दूरध्वनी करून एकरकमी परतफेडीसाठी प्रचंड दबाव आणला जात आहे. प्रशासकीय विलंबाने मूळ मुद्दलावर चक्रवाढ व्याज चढत गेल्याने आज व्याजाची रक्कम मूळ कर्जापेक्षाही कित्येक पटीने जास्त झाली आहे.

शिक्षण ही नफा मिळवण्याची बाब नसून सामाजिक गुंतवणूक असल्याने शैक्षणिक कर्जे पूर्णतः माफ करावीत. कर्जमाफी शक्य नसेल तर सर्व संचित व्याज व दंडव्याज पूर्णतः माफ करून केवळ मूळ मुद्दल वसुलीपात्र धरावे. धोरणात्मक तोडगा निघेपर्यंत कर्जदार व जामीनदारांवरील सर्व कायदेशीर नोटिसांना स्थगिती द्यावी. ॲड. शेख यांच्या विविध मागण्यांमध्ये कर्जवसुलीची प्रक्रिया १०-१२ वर्षे कोणत्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे थांबली, याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. संचित व्याज १००% माफ करून, मुद्दलावर सवलत व विनाव्याज हत्यांची सुविधा देणारी किमान ६ महिन्यांची ओटीएस योजना लागू करावी. कर्जदारांची अवहेलना करणारे व्हॉट्सॲप ग्रुप्स बरखास्त करून संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी. नव्या कर्जांसाठी वैयक्तिक जामीनदारांऐवजी शासकीय पतहमी निधीचाअवलंब करावा. मालमत्तेवर महामंडळाचा बोजा चढवलेल्या लाभार्थ्यांना मंजूर कर्जाची रक्कम तातडीने वितरित करावी. जिल्ह्यांमधील रिक्त पदे भरून लाभार्थ्यांची स्थानिक पातळीवरच सोय करावी, जेणेकरून त्यांना मुंबईच्या फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. अल्पसंख्याक तरुणांसाठी भरीव तरतुदीसह स्व. अजितदादा पवार विशेष शैक्षणिक व स्वयंरोजगार योजना सुरू करण्यात यावी. आदिंचा समावेश आहे.

**कायदेशीर आणि घटनेच्या चौकटीत मांडलेला विरोध**

आपल्या कायदेशीर अभ्यासाचा दाखला देत ॲड. जुबेर शेख यांनी निदर्शनास आणून दिले की: प्रशासकीय विलंबात कर्जदाराचा कोणताही दोष नसताना व्याजाची आर्थिक शिक्षा त्यांच्यावर लादणे अयोग्य आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी डीफॉल्टर ग्रुप अशा नावांचे व्हॉट्सॲप समूह तयार करून कर्जदारांची जाहीर मानहानी चालवली आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३१ अन्वये मिळालेला प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार तुडवण्याचा परवाना कोणालाही नाही. जामीनदारांना थेट कायदेशीर नोटिसा पाठवल्यामुळे समाजात भीतीचे वातावरण आहे, ज्यामुळे नव्या गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी जामीनदार मिळणे कठीण झाले आहे.

सार्वजनिक निधीच्या नियमानुकूल वसुलीला विरोध नसून, प्रशासनाच्या असंवेदनशील कार्यपद्धतीला विरोध असल्याचे स्पष्ट करत ॲड. शेख यांनी उचललेल्या या मुद्द्यामुळे राज्यभरातील हजारो अल्पसंख्याक कुटुंबांना दिलासा मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

# महेंद्र पब्लिक स्कूलमध्ये दहिहंडी कार्यक्रम संपन्न

नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- येथील महेंद्र पब्लिक स्कूल मध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी सह विविध कार्यक्रमात बालगोपालांनी केली धमाल.

श्रीकृष्णाचा जन्मानिमित्त दहीहंडी फोडण्याची अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे यानिमित्त दहीहंडी कार्यक्रमात चिमुकल्यांसह बालगोपाल सहभागी होत असतात अशाच दहीहंडीचा कार्यक्रमात मनमुराद असा आनंद लुटला येथील महेंद्र पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी

येथील महेंद्र पब्लिक स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला त्यासोबत राधा व कृष्ण वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली यात सुमारे २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला चिमुकल्यांनी राधा आणि कृष्णाच्या आकर्षक अशा वेशभूषा करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला गोविंदा आला रे आला मटकी संभाल बाला यासह विविध गाण्यांवर धमाल केली राधाकृष्ण चे विविध गाण्यांवर नृत्य देखील सादर केले त्यानंतर दहीहंडी फोडण्यात आली.

कार्यक्रमाला शिवानी परदेशी, केजल जैन, दिव्या जैन, नगरसेविका सायली रघुवंशी, संचालिका पीनल शाह, मुख्याध्यापक अरुण पाटील यांच्यासह विविध मान्यवर पालक शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी मंदाना यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक अरुण पाटील यांनी केले.



# कमलाबाई क.शाळेत शिक्षण परिषद विविध विषयांवर बहुमोल मार्गदर्शन

**धुळे, दि.५- धुळे येथील स्त्री शिक्षण संस्थेच्या कमलाबाई शंकरलाल कन्या शाळेत नुकतेच धुळे महानगरपालिकेतर्फे आयोजित शिक्षण परिषदेचे प्रथम पुष्प उत्साहात संपन्न झाले. समग्र शिक्षा अभियान (मनपा, धुळे) यांच्या वतीने आयोजित शिक्षण परिषद समूह तीन, चार व सातचे शिबिर संपन्न झाले.**

या शिबिरासाठी समूह क्रमांक चार व सात चे समूह प्रमुख म्हणून शरद पवार यांनी तर समूह क्रमांक तीन चे समूह प्रमुख म्हणून तुषार वाणी यांनी अत्यंत नियोजनबद्ध रित्या कामकाज पाहिले. या शिक्षण परिषदेत तज्ञांनी मसुलभ क्रांतीफ अंतर्गत विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. सर्वप्रथम प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अन्न व औषध प्रशासन, धुळे चे सहाय्यक आयुक्त मोहरे, किशोर जाधव लेखाधिकारी शालेय पोषण आहार जिल्हा परिषद, धुळे, भामरे राजीव गांधी शाळा यांनी मार्गदर्शित केले. मेहमूद यांनी शाळा व्यवस्थापन समिती-स्थापना पुनर्रचना व कार्यपद्धती यावर माहिती दिली. सिसोदिया यांनी यु-डायस प्रणालीत माहिती भरताना घ्यावयाची काळजी विशद केली. सदर कार्यक्रमात मध्यंतरीच्या वेळात समूहातील पदोन्नती, निवड झालेल्या शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच कमलाबाई कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका छाया नाईक यांना मुख्याध्यापक पदी कार्यालयाकडून नियुक्तीपत्र प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. नवभारत साक्षरता अभियान व उल्हास ॲप याबाबत महेंद्र पवार यांनी प्रौढ साक्षरता व उल्हास पचा वापर यावर मार्गदर्शन केले. विविध शासन निर्णय वाचा व त्या शासन निर्णयाचे स्पष्टीकरण करा, तसेच नुकत्याच प्राप्त महत्त्वाच्या शासन निर्णयांचे वाचन सोप्या भाषेत समूह क्रमांक तीनचे प्रमुख तुषार वाणी यांनी करून दिले. मनपा शाळेतील व्यवसाय शिक्षण विभागाच्या मॅडम यांनी व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. विद्या पाटील, स्वाती पाटील, पानपाटील यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणासाठी असलेल्या प्रशस्त ॲपचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यांच्या हस्ते उपस्थित अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. हर्षदा येवले यांनी व्यवसाय मार्गदर्शन संदर्भात माहिती दिली. राहुल गायकवाड (विद्या विकास शाळा, धुळे) यांनी आभार मानले. अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख रवींद्र टाकणे यांनी दिली.

# बेटावद गावात आधार केंद्र सुरू करा; मागणी

बेटावद, दि.५- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद हे गाव जवळपास १५ ते १६ गाव लगत असून या ठिकाणी आधार केंद्र सुरू करण्याची मागणी जनतेतून मोठ्या संख्येने होत आहे

याबाबत वृत्त असे बेटावद तेथून २५ किलोमीटर अंतरावर शिंदखेडा शहर असल्यामुळे या ठिकाणी परिसरातील गावांच्या संपर्क बेटावद गावाच्या बाजारपेठेची संपर्क असून लोकांच्या दररोज येजा होत असल्यामुळे या ठिकाणी आधार अपडेट तसेच केवायसी ,नवीन आधार कार्ड काढणे ,दुरुस्ती, तसेच इतर आधार संबंधित कामांसाठी नागरिकांना तब्बल २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या शिंदखेडा शहरात जावे लागत असते म्हणून बस भाडे तसेच वेळ आणि त्या ठिकाणी केंद्राची गर्दी यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असते बेटावद येथेच आधार कार्ड ,केवायसी ,अपडेट , नवीन आधार कार्ड बनविणे आधार कार्ड दुरुस्ती व इतर आधार संबंधित सेवा देणारे अधिकृत ई सेवा उपलब्ध करून द्यावी अशी परिसरातील जनतेतून मागणी होत आहे.

# गाव वाचवायचे असेल तर तरुणांसाठी रोजगार, स्वाभिमान आणि योग्य जीवनसाथीची दारे खुली करा- ललित बहाळे

**धुळे, दि.५- मुलगा असो वा मुलगी, शिक्षण, स्वावलंबन, चांगले चारित्र्य, परस्पर सन्मान आणि समजूतदारपणा यांना प्राधान्य देणारा समाज निर्माण झाला, तर विवाह ही समस्या न राहता सुंदर सहजीवनाची सुरुवात बनेल. त्यामुळे गाव वाचवायचे असेल तर गावातील तरुणांसाठी रोजगार, स्वाभिमान आणि योग्य जीवनसाथी या तीनही दारे खुली करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे राज्य अध्यक्ष ललित बहाळे यांनी केले.**

शेतकरी संघटना, धुळे जिल्हा यांच्या वतीने युगात्मा शरद जोशी जयंती सप्ताहानिमित्त शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सौभाग्य मंगल कार्यालय येथे शेतकरी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात शेतकरी प्रश्न, ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, रोजगाराच्या संधी तसेच ग्रामीण तरुणांच्या भवितव्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी नवी दिल्ली येथील ऑल इंडिया किसान को-ऑर्डिनेशन कमिटीचे जनरल सेक्रेटरी गुणवंतराव पाटील हंगरंगेकर, जैन इरिगेशन, जळगावचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. डी. जडे, मिलिंद पाठक, स्वतंत्र भारत पक्षाचे गुलाबसिंग भैय्या रघुवंशी, धुळे जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पुरुषोत्तम देवरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

ललित बहाळे म्हणाले की, ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे शहरांकडे स्थलांतर वाढत आहे. शेतीला प्रतिष्ठा, आधुनिक तंत्रज्ञान आणि चांगले उत्पन्न मिळाले, तर ग्रामीण तरुणांना गाव सोडण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

गावातील अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता कृषी प्रक्रिया उद्योग, कृषी पर्यटन, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप, पशुपालन, दुग्ध व्यवसाय आणि डिजिटल सेवा अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. या माध्यमातून ग्रामीण तरुणांना आर्थिक स्वावलंबन मिळेल आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अनेक प्रश्नांवरही सकारात्मक परिणाम होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विवाहाच्या प्रश्नाकडे केवळ सामाजिक समस्या म्हणून न पाहता त्यामागील आर्थिक आणि सामाजिक कारणांचाही विचार करणे गरजेचे आहे. मुलगा आणि मुलगी दोघांनाही शिक्षण व स्वावलंबनाची समान संधी मिळाली, तसेच परस्पर सन्मान आणि समजूतदारपणावर आधारित वैवाहिक जीवनाची मूल्ये रुजली, तर समाज अधिक सक्षम बनेल, असे बहाळे यांनी नमूद केले.

**बाजारपेठेचा अभ्यास करून पीक पद्धतीचे नियोजन करा**

शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने केवळ एखाद्या पिकावर अवलंबून न राहता बाजारपेठेतील मागणी, उपलब्ध संधी आणि उत्पादन खर्चाचा अभ्यास करून पीक पद्धतीचे नियोजन करावे, असे आवाहन ऑल इंडिया किसान को-ऑर्डिनेशन कमिटीचे जनरल सेक्रेटरी गुणवंतराव हंगरंगेकर यांनी केले.

शेतकऱ्यांनी उत्पादनाबरोबरच बाजारपेठ, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि थेट विक्री यांचा विचार केल्यास शेतीमधून मिळणारे उत्पन्न वाढवता येऊ शकते. बदलत्या कृषी अर्थव्यवस्थेत बाजारपेठेचा अभ्यास हा शेतकऱ्यांच्या निर्णय प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग असला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**कापूस व मक्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा**

जैन इरिगेशन, जळगावचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. डी. जडे यांनी कापूस आणि मका पिकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविण्याची गरज व्यक्त केली. बदलते हवामान, उत्पादन खर्च आणि बाजारपेठेतील चढ-उतार लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. योग्य व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा वापर आणि शास्त्रीय पद्धतीने पीक व्यवस्थापन केल्यास उत्पादनाची गुणवत्ता व उत्पादकता सुधारू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

**तरुणांचा शेतकरी संघटनेत प्रवेश केला**

या शेतकरी परिसंवादाला धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यांमधून बहुसंख्य शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते. नरेंद्रभाई पटेल, भगवान बापूजी, आत्माराम पाटील, निंबा दादा पाटील, विनय बोरसे, कैलास देवरे, रवींद्र वाघ तसेच धुळे ऑरगॅनिक फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष अमृत पवार आदींची उपस्थिती होती. परिसंवादात शेतकरी प्रश्नांसोबतच ग्रामीण भागातील रोजगार, शेतीचे आधुनिकीकरण, बाजारपेठ, कृषी प्रक्रिया, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि तरुण पिढीच्या भवितव्यावर विचारमंथन झाले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भदाणे यांनी केले. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.


TO BOOK TICKETS SCAN THE QR

ज्योती सिनेमा 3D JYOTI

DOLBY DIGITAL PLUS




ता.०५ से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे

हनुमान अंश (हिंदी)

bookmyshow

9422789999/9823177599 Jyoticinemadhule.


# बोरकुंड येथील कॉलेज ऑफ फार्मसीचा शंभर टक्के निकाल

धुळे, दि.५ (प्रतिनिधी)- बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित कॉलेज ऑफ फार्मसीचा निकाल शंभर टक्के लागला असुन महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम ठेवली आहे. स्वामिनी वाडीले यांनी प्रथम क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बोरकुंड येथील आयबीपीएस औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेकनिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे अंतर्गत दिलेल्या चतुर्थ सेमिस्टर व सहाव्या सेमिस्टर परीक्षेचा निकाल नुकताच लागला. यात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सहाव्या सेमिस्टर मध्ये स्वामिनी वाडिले यांनी ८.५० सीजीपीए मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तृप्ती भदाणे व आरती चौधरी यांनी ८.१३ सीजीपीए मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तर गायत्री आमले यांनी ८.०० सीजीपीए मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्याचप्रमाणे चतुर्थ सेमिस्टर मध्ये निखिल पाटील याने ८.५७ सीजीपीए मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. सोनल माळी यांनी ८.४३ सीजीपीए मिळवत द्वितीय क्रमांक, तर राज नन्नावरे याने ८.४३ सीजीपीए मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. या सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब रावण भदाणे, सचिव शालिनीताई बाळासाहेब भदाणे, प्राचार्य डॉ. आर. ए. अहिरराव यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या उज्वल शैक्षणिक व व्यावसायिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, तसेच महाविद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मोलाचे ठरले.


प्रकाश में आज यकीन




धर्मेन्द्र शर्मीला टॉगोर, शेट्टी हेलन अनवर हुसेन डेविड अस्तिसेन इफ्तेखार


# नाबार्डतर्फे ग्रामीण नवसंशोधनाला चालना देण्यासाठी प्रकाशामध्ये रुटागे स्मार्ट व्हिलेज सेंटरचा शुभारंभ

**तळोदा, दि.५ (प्रतिनिधी)- ग्रामीण सक्षमीकरणाच्या देशाने एक महत्त्वाचा टप्पा गाठत, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) आज नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशा येथे प्रायोजित रुटागे स्मार्ट व्हिलेज सेंटर चे सकाळी ११ वाजता अधिकृत उद्घाटन केले. हे अत्याधुनिक केंद्र ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाची दरी मिटवण्यासाठी, स्थानिक पातळीवर उपयुक्त व प्रमाणित तंत्रज्ञान उपयोगात आणून उद्योजकता आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करेल.हा उद्घाटन सोहळा हायब्रीड (प्रत्यक्ष व आभासी) पद्धतीने पार पडला. यामध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवरील धोरणकर्ते, स्थानिक प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामीण भागातील परिवर्तन घडवून आणणारे घटक एकत्र आले होते.**




नाबार्डचे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. ए. के. सूद यांनी या केंद्राचे आभासी पद्धतीने उद्घाटन केले. या आभासी कार्यक्रमात नाबार्ड महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य महाव्यवस्थापक डॉ. ए. . भवानी शंकर, नाबार्ड प्रधान कार्यालय मुंबई येथून श्री. बी. आर. प्रेमी आणि भारत सरकारच्या मुख्य वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या स्ट्रॅटेजिक अलायन्स संचालक डॉ. सपना पोती हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी बायफ चे अध्यक्ष श्री. भरत काकडे, अविनाश तिवारी, उपमहाव्यवस्थापक नाबार्ड यांनी मार्गदर्शन केले. मनोज चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक श्री. दीपक बारहाते, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक श्री. नंदकुमार पैठणकर, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक डॉ. राजेंद्र दहातोंडे, संचालक, कृषी विज्ञान केंद्र श्री. दीपक पटेल, प्रकल्प संचालक, आत्मा श्रीमती राजनंदनी भिल्ल, सरपंच, प्रकाशा ग्रामपंचायतडॉ. प्रकाश पटेल, प्राचार्य, कृषी व महाविद्यालयस्थानिक मान्यवरांनी या उपक्रमाचे सामूहिक कौतुक केले

सदर प्रकल्प हा संपूर्ण महाराष्ट्रातून पहिले केंद्र असून ते नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुका मधील प्रकाशा या गावी ग्रामीण भागात स्थापन करण्यात आले आहे. सदर केंद्राच्या व त्यातून दिल्या जाणाऱ्या आधुनिक व उच्च प्रतीच्या तंत्रज्ञानाच्या कृषी उत्पन्नासाठी गुणवत्तापूर्व शेतीपूरक उत्पन्न वाढीस त्याची मदत होईल असा विश्वास नंदुरबार जिल्ह्याचे डी डी एम मा श्री रवींद्र मोरे यांनी व्यक्त यावेळी बोलताना व्यक्त केला .

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवींद्र मोरे डी डी एम नाबार्ड जिल्हा नंदुरबार ,बायफ चे व्यवस्थापक श्री. देवेंद्र पाटील व सहकारी यांनी परिश्रम घेतले

सदर कार्यक्रमास परिसरातील शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चे चेअरमन, पदाधिकारी, शेतकरी बांधव पत्रकार मित्र व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शब्दकोडे क्रमांक : २४४७



**आडवे शब्द :** १.देशाचे किंवा राज्याचे मुख्य शासन ४.कायदेशीर हक्क किंवा एखाद्या गोष्टीचा अधिकार ५.भारतातील पूर्वेकडील एक डोंगराळ राज्य ८.सातू ९.आईचे अपत्यावर असणारे निस्सीम प्रेम ११. रियाझ १२.धनुष्य १३.पूर्वजांकडून मिळालेली मालमत्ता १४.इंग्रजीत-मजा १५. दाराला लावायचे आंब्याच्या पानांचे मंगल चिन्ह १६.एखाद्या चांगल्या कामाची मिळालेली पावती किंवा कौतुक १७.मित्रांमधील घट्ट मैत्री किंवा स्नेहसंबंध २०.आशिया खंडातील आपला एक मोठा शेजारी देश २३.आकार किंवा संख्येत होणारी प्रगती २४.त्वचेला येणारी कंड २५. पराक्रमी किंवा ज्याचा पराभव करता येत नाही असा २६.तोरा, मिजास किंवा रुबाब २७. घोषणा किंवा पक्षाचा जयजयकार २८.इंग्रजीत-जा २९.समाजात असणारा आब किंवा आर्थिक विश्वासार्हता ३०.एकाच कुळातील पिढ्यांची परंपरा ३२. पराक्रम, शौर्य किंवा मोठा नावलौकिक ३३.जंगलातील एक हिंस्र पट्टेदार प्राणी ३४.इमारती लाकडासाठी प्रसिद्ध असलेले एक मोठे झाड ३५.एक जलाशयाचा प्रकार३७.तातडीचा संदेश किंवा माहिती पाठवण्याची जुनी पद्धत ३८.मोजणी किंवा संख्या मोजण्याची क्रिया ४०.अतिशय थंड किंवा बर्फासारखा गार ४२.गायी-गुरांना रात्री बांधण्याची हक्काची जागा ४४.दृष्टी ४६.विजेसारखी अतिशय चपळ असणारी स्त्री ४८.संधी,मोकळीक ४९.आकाश, गगन किंवा अंतराळ ५०.सर्व, संपूर्ण किंवा सगळे मिळून ५१.गणितातील दोन संख्या एकत्र करण्याची क्रिया **उभे शब्द :** १.नेहमी जागरूक, सावध किंवा हुशार असणारा २.मोठा आवाज किंवा ध्वनीचा नाद ३.मनाला आनंद देणारा किंवा रम्य असा ४.दान देणारा किंवा मोठा देणगीदार ५.दिवंगत अभिनेता सुनील दत्त जी आणि अभिनेत्री साधना यांचा एक भयपट ७.भारतीय शास्त्रीय संगीतातील एक प्रसिद्ध राग १०.चित्त ११.ब्रिटिश काळातील एक मानद पदवी किंवा पावसाची झडप १२.काम, कार्य किंवा नशीब १३.तंटा १४.आमिर खान,काजोल यांचा एक सिनेमा १६.निःस्वार्थ देणगी १८.वन १९.राजस्थानातील एक प्रांत २०. वस्तू २१.सातारा जिल्ह्यातील एक किल्ला २२.डौल,रुबाब २४.मिठाची चव असलेला किंवा खारट पदार्थ २६.रविवार २७.नासधूस किंवा मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान चाकाचे घर्षण थांबवण्यासाठी वापरतात ते तैलरूपी द्रव ३१.अभिनेता संजय दत्तचा एक सिनेमा ३४.सागाच्या लाकडापासून बनवलेला ३६.आठवड्याचा एक दिवस ३७.माज ३९.दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ४१.वाचन करणारा ४२.जमा ४३.शिकार ४५.पाणी ४७.क्षण-हिंदीत ४८.पंढरपूरची यात्रा

**शब्दकोडे क्रमांक : २४४६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | हे | र | | ति | ख | ट | | न | वा | | ब |
| र | वा | | आ | स | रा | | अ | ग | र | ब | त्ती |
| वा | | न | ख | रा | | अ | र | ण्य | | ल | |
| | फ | | णी | | स | रा | व | | चा | क | र |
| त | ल | फ | | स | ह | | ली | ट | र | | जा |
| | क | ळ | वा | | म | जा | | क | | क | |
| सा | | बा | रा | म | ती | | क | म | त | र | ता |
| स | ल | ग | | ती | | च | म | क | | व | र |
| रा | व | | स | | ज | व | ळ | | जा | त | |
| | क | र | वं | द | | दा | | प | ळ | | वे |
| थो | र | | ग | | स | र | ब | त | | सा | त |
| डा | | क | डी | प | त्ता | | रा | न | टी | | न |



# बहर



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वातील महान राजे

# मराठी भाषेच्या वैभवाचे जनक




मराठी ही समृद्ध भाषा असुन तिला हजारो वर्षाचा संपन्न इतिहास लाभला आहे. मराठी ही विश्वातील एक महत्वाची भाषा आहे. मानवाच्या संवादासाठी भाषा हे सर्वात शक्तीशाली माध्यम आहे. छत्रपती शिवाजी महाराज रचनात्मक प्रतिभावंत राजे होते.त्यांनी मराठी भाषेला वैभव प्राप्त करून देण्याचे महान कार्य केले. महाराजांनी मराठी भाषेला सन्मानाचे स्थान देवून तिला उज्ज्वल बनविले. छत्रपतींचा कालखंड हा मराठी साहित्याचा मोठा समृध्द वारसा घेऊन मिरवणारा कालखंड होय. छत्रपतींनी स्वदेश, स्वधर्म, स्वभाषेच्या प्रगतीसाठी खुप शासनव्यवस्थेतील राज्यकारभाराबरोबर मराठी भाषेचा विस्तार इतर क्षेत्रात ही मोठ्या प्रमाणात वाढला. बखरी, वाङःमय, दळणवळण, राजकारण या क्षेत्रामध्ये मराठी भाषा मोठ्या प्रमाणात विस्तारली. विविध क्षेत्रातुन मराठी भाषेला मोठे सौदर्य प्राप्त झाले. स्वराज्याच्या सिमा जशा विस्तारीत गेल्या त्याच प्रमाणे मराठी भाषेचा विस्तारही तेवढ्याच मोठ्या प्रमाणात झाला.

छत्रपतींनी मराठी भाषेच्या वैभवाचा पाया घातला. मराठी भाषेला स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून दिले. महाराजांनी राजशक सुरू केले. हा सर्व भारतातील जनतेच्या अस्मितेचा विषय होय. एका नविन युगाला एका अर्थाने सुरुवात झाली. राजशक सुरू झाल्यानंतर हिंदू महिना, तिथी यांचा सर्रास वापर होऊ लागला. यातुन मराठी, संस्कृत भाषेला महत्व प्राप्त झाले. छत्रपतींनी राज्यव्यवहारामध्ये आढळून येणारे फारसी व दखखनी उर्दूतील शब्द यांच्या ऐवजी संस्कृत पर्याय वापरून राज्यव्यवहार कोशाचे मराठीकरण करण्याचे कार्य केले. राज्यव्यवहार कोशामध्ये राजदरबारातील खलबतखान्याला मंञ्यस्थान असा शब्द मोठे प्रयत्न केले.यातुन छत्रपतींनी मराठी मुलुखाला अस्मिता प्राप्त करून दिली व मराठीला कळसावर पोहचविण्याचे महान कार्य केले. छत्रपतींनी सर्वसामान्यांची एकरूप असणारी भाषा लोक व्यवहारात आणली. मराठी भाषेची मजबूत बांधणी केली. छत्रपतींनी मराठी साहित्याचे दालन अत्यंत समृद्ध केले. मराठी भाषेचे देखणे स्वरूप साहित्याच्या माध्यमातुन उमटले. मराठी भाषेला गौरवशाली इतिहास व फार मोठा ऐतिहासिक वारसा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषा राज्यकारभारामध्ये सक्तीची आणि देशभक्तीची बनविली. तिला वैभव प्राप्त करून दिले.मराठी भाषेतील राज्यकारभार सर्वसामान्य जनतेला तो आपलाच आहे असे वाटू लागले. मराठी भाषेमुळे सर्वांना शासनव्यवस्थेतील निर्णय प्रक्रीया समजू लागली. 'आपले स्वराज्य आपली भाषा' हे ध्येय डोळयासमोर ठेवुन छत्रपतींनी मराठी भाषेच्या विकासासाठी व वाढीसाठी प्रयत्न केले. मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा देऊन जनताभिमुख धोरण स्विकारले. छत्रपती कालीन पत्रात्मक गद्याचे दालन अत्यंत समृध्द आहे. या पत्रात्मक गद्यास ऐतिहासिक गद्याचे अधिष्ठान लाभले आहे. मराठी भाषेत अनेक नवीन शब्दांची भर पडत गेली. त्याचबरोबर पूर्वी प्रचलित असलेले आणि मध्यंतरीच्या राजवटीमुळे वापरातून गेलेले अनेक शब्द राज्यव्यवहार कोशामुळे पुन्हा व्यवहारात आणले गेले. मराठीचे गद्य हे प्रामुख्याने पत्रव्यवहार, सनदा, महजर, निवाडे, करीने आदि .स्वरूपात असल्यामुळे मराठीच्या विस्ताराला बळ मिळाले.

'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः लेखन केले होते. अभंग रचले होते. तंजावर येथील सरस्वती महालात महाराजांच्या हस्ताक्षरातील अभंग उपलब्ध आहेत'. मोडी लिपीतील महाराजांचे लिखाण आहे. छत्रपतींनी फारसी भाषेतही काव्यरचना केलेली होती. त्यावेळी राज्यव्यवहारामध्ये फारसी भाषेचा अधिक वापर होत होता. शासन व्यवस्थेमध्ये महाराजांनी प्रथमतः फारसी, दखखनी, हिंदी ऐवजी मराठीतील शब्दप्रयोग वापरण्याचे सुरू केले. फारसी भाषेतील पेशवा शब्दाऐवजी मुख्यप्रधान, मुजुमदार ऐवजी अमात्य, सुरनिस ऐवजी सचिव असे शब्दप्रयोग सुरू केले. राज्यकारभारात स्वभाषेचा वापर करणे ही एक क्रांतिकारी घटना होती.

छत्रपतींच्या कालखंडात मराठी भाषेमध्ये अनेक कागदपत्रे तयार झाली. मराठी भाषेच्या संर्वधनासाठी 'राज्यव्यवहार कोश' नावाचा स्वतंत्र कोश तयार करून घेतला. राज्यव्यवहार कोश हा मराठी भाषेतील एक अलौकिक ग्रंथ होय. हा ग्रंथ रामचंद्रपंत आमात्यांनी लिहिला असला तरी त्याचा अधार व त्यावरील छाप मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचीच आहे. स्वराज्यातील दिला. आज मुंबईच्या सेक्रेटरिएटला मंत्रालय हे नाव मिळाले. हे छत्रपतींनी निर्माण केलेल्या राज्यव्यवहार कोशाचे यश होय.

जिवंत भाषा हे जिवंत संस्कृतीचे द्योतक असते. भाषेला जिवंत ठेवण्याचे काम त्या-त्या शासन व्यवस्थेचे असते. हे काम मध्ययुगीन कालखंडामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. स्वराज्याच्या वाढत जाणा-या सिमेबरोबर मराठी भाषेचीही सिमा वाढविली गेली. याचे सर्वस्वी श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांना दिले जाते. सर्व सामान्य लोकांच्या शिक्षणाची व्यवस्था स्वराज्यामध्ये झालेली होती. सर्व जाती धर्मातील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. छत्रपतींच्या कालखंडातील समाज विविध विषय हातळण्यास तयार होता.

राज्याभिषेक समारंभा प्रसंगी हिंदी कवी भूषण रायगडावर होता .त्याने 'शिवराजभूषण' हे महत्वपूर्ण काव्य लिहिले. छत्रपती राजाराम महाराजांच्या सांगण्यावरून 'शिवराज्याभिषेक कल्पतरू' हा ग्रंथ तयार झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी निरिक्षण आणि गणित यांची एकवाक्यता साधून ग्रहसिद्धी करणारा सुगम ग्रंथ तयार करवून घेतला. छत्रपतीच्या कालखंडामध्ये संपूर्ण भारत देशामध्ये या ग्रंथाच्या साहयाने पंचागाचे विश्लेषण केले जात होते.

मराठीशाहींतील ऐतिहासिक गद्य हा मराठीचा एक बहुमोल अलंकार असून त्याची उभारणी महाराजांनी केली. कृष्ण नामक ज्योतिषाच्या मदतीने पंचांग शोधन केले. वेदांत, धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रामायण, महाभारत आदि. विषयावर मोठ्या प्रमाणात लिखाण झाले. बुद्धिमान विचाराची प्रगल्फता विकसित करणारे विचारवंतही महाराजांच्या कालखंडामध्ये होऊन गेले. जयराम पिंडये या विचारवंताने राधामाधवविलासचंपू व पर्णालपर्वतग्रहणाख्यान हे अतिउच्च कोटीतले ग्रंथ लिहिले. शिवभारताचा ग्रंथकार परमानंद, दंडनीतीकार केशव पंडित, राजव्यवहार कोश या महत्वपूर्ण कोशाचा ग्रंथकार रघुनाथ हणुमंते हे ग्रंथकार छत्रपतींनी निर्माण केले. या लेखनास अनुकुल अशी शैक्षणिक प्रगती या कालखंडात झाली. रामचंद्रपंत आमात्य यांनी राज्यव्यवस्थेवर अधारीत लिहिलेल्या आज्ञापत्र या ग्रंथातील मजकुर हा छत्रपतींच्या विचारधारेचा होता.

छत्रपती शिवाजी महाराजांचे बंधू व्यंकोजीराजे यांना आठ भाषांचे ज्ञान होते. त्यांचा मुलगा शहाराजे यांनी 'पंचभाषा विलास' नावाचे मराठीतील पहिले नाटक इ. स. १६७५ मध्ये लिहिले. त्यातील पात्रे मराठी, संस्कृत, कन्नड, तामीळ, तेलगू अशा पाच भाषेत संवाद करतात. व्यंकोजीराजे यांच्या पत्नी दीपाराजे सहा भाषेत संवाद करत असत. त्यांचे भरपूर साहित्य छापील स्वरूपात उपलब्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जेष्ठ पुत्र व स्वराज्याचे पहिले युवराज छ. संभाजी महाराज **(पान ६ वर)**

# गणेशोत्सवाचे बदलते स्वरूप

## उत्सव हवा, पण संस्कृती हरवता कामा नये!




विकास कपोले
धुळे, मो.९४०३४२५७७७

गणेशोत्सव आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाजारपेठा सजल्या आहेत, गणेशमूर्तींची दुकाने थाटली आहेत, गणरायाच्या स्वागतासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंची रेलचेल सुरू झाली आहे. सर्वत्र उत्साह, आनंद आणि लगबग दिसून येत आहे. घराघरांत गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाच्या मनात आपल्या लाडक्या गणरायाच्या आगमनाची आतुरता आहे.

गणेशोत्सव म्हणजे केवळ दहा दिवसांचा उत्सव नाही; तो महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि सामाजिक एकात्मतेचा एक महत्त्वाचा भाग आहे. मात्र, या आनंदाच्या वातावरणात आज मनात एक प्रश्न निर्माण होतोआज आपण साजरा करीत असलेला गणेशोत्सव आपल्याला खरोखरच आवडतो आहे का? की उत्सव साजरा करण्याच्या नादात आपण त्यामागचा मूळ उद्देशच विसरत चाललो आहोत?

एक काळ असा होता की गणेशोत्सव म्हणजे साधेपणा, उत्साह, संस्कृती आणि सामाजिक एकोपा यांचा सुंदर संगम होता. गणरायाचे स्वागत लेझीम, ढाल, ढोल-ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात केले जायचे. पारंपरिक वेशभूषेत तरुण-तरुणी सहभागी व्हायचे. गल्लीबोळात गणेश मंडळांची लगबग असायची. दहा दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, पोवाडे, गाणी, पारंपरिक खेळ, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि विविध सामाजिक उपक्रम आयोजित केले जायचे. या उत्सवामुळे शेजारी एकत्र यायचे, मित्रमंडळी भेटायची आणि समाजातील विविध घटक एकमेकांच्या जवळ यायचे. गणेशोत्सव हा लोकांना एकत्र आणण्याचे माध्यम बनायचा.

याच सामाजिक एकतेचा आणि जनजागृतीचा विचार लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून पुढे नेला. परकीय सत्तेविरुद्ध जनजागृती करण्यासाठी, समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी आणि लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्यामागे व्यापक सामाजिक उद्देश होता. मात्र आजच्या गणेशोत्सवाकडे पाहिले तर चित्र काहीसे वेगळे दिसते.

आज पारंपरिक वाद्यांची जागा मोठ्या आवाजाच्या डीजेने घेतली आहे. उत्साह असावा, जल्लोष असावा; पण त्यासाठी कानठळ्या बसवणारा आवाज आवश्यक आहे का? डीजेच्या प्रचंड आवाजाजवळून जाताना अनेकदा अक्षरशः छातीत धडधड जाणवते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि प्राणी यांच्यावर त्याचा होणारा त्रास आपण विसरून चालणार नाही.

दरवर्षी मोठ्या आवाजाच्या वाद्यांमुळे होणाऱ्या त्रासाच्या आणि दुर्घटनांच्या बातम्या आपल्या वाचनात येतात. मग प्रश्न असा पडतोगणरायाला प्रसन्न करण्यासाठी एवढा मोठा आवाज आवश्यक आहे का? गणपती बाप्पा मोरया म्हणताना आपल्या मनात भक्ती असावी; आवाजाची स्पर्धा नसावी. आज गणेशोत्सवात झगमगाटही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आकर्षक रोषणाई, विविध प्रकारचे फोकस, चमकणारे दिवे आणि डोळ्यांना दिपवून टाकणारे प्रकाशझोत यामुळे उत्सवाचे दृश्य भव्य दिसते. आकर्षक सजावट करण्यात काहीच गैर नाही; परंतु भव्यतेच्या स्पर्धेत भक्ती, संस्कृती आणि सामाजिक संदेश हरवता कामा नये.

गणेशोत्सव हा खर्च करण्याची किंवा दुसऱ्यापेक्षा आपले मंडळ मोठे दाखवण्याची स्पर्धा नसून, एकत्र येण्याची, आनंद वाटण्याची आणि समाजाला काहीतरी चांगले देण्याची संधी आहे. म्हणूनच यावर्षी आपण थोडा वेगळा विचार करू या. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाऐवजी ढोल-ताशा, लेझीम आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाचे स्वागत करू या. पारंपरिक वेशभूषेत मिरवणूक काढू या. आपल्या मुलांना आणि तरुणांना आपल्या लोककला, लोकपरंपरा आणि संस्कृतीची ओळख करून देऊ या.

गणेश मंडळांनी दहा दिवसांमध्ये केवळ मनोरंजनाचे कार्यक्रम न घेता वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, पोवाडे, कथाकथन, भजन, कीर्तन, पारंपरिक खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. आज मोबाईलच्या आणि सोशल मीडियाच्या युगात मुलांच्या हातातील पुस्तक दूर जात आहे. अशा वेळी गणेशोत्सवाच्या निमित्ताने एखाद्या महान व्यक्तीच्या जीवनावर वक्तृत्व स्पर्धा घेता येईल. एखादे पुस्तक वाचून त्यावर चर्चा घेता येईल. इतिहास, विज्ञान, संविधान, पर्यावरण, आरोग्य, व्यसनमुक्ती अशा विषयांवर व्याख्याने आयोजित करता येतील. गणरायासमोर फक्त आरतीच नव्हे, तर विचारांची ज्योतही तेवत ठेवू या. गणेशोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे सामाजिक उपक्रमही करता येतील. अशा उपक्रमांमधून गणेशोत्सवाचा आनंद समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल.

आपण आधुनिकतेला विरोध करत नाही. काळ बदलतो, तंत्रज्ञान बदलते आणि उत्सव साजरा करण्याच्या पद्धतीही बदलतात. परंतु आधुनिकता स्वीकारताना आपली संस्कृती आणि परंपरा विसरता कामा नये. आधुनिक प्रकाशयोजना असू द्या, सुंदर सजावट असू द्या, नवीन कल्पना असू द्या; पण त्यासोबत आपल्या मातीचा सुगंध, आपल्या संस्कृतीची ओळख आणि आपल्या पूर्वजांनी दिलेला वारसा जपला पाहिजे.

**शेवटी गणेशोत्सवाचा खरा अर्थ काय?**

गणरायाच्या आगमनाने आपल्या घरात आणि मनात आनंद निर्माण होणे. गणरायाच्या दर्शनाने मनाला शांतता मिळणे. दहा दिवस समाजातील भेद विसरून सर्वांनी एकत्र येणे. आणि गणरायाच्या विसर्जनानंतरही त्याचे संस्कार आपल्या आचरणात **(पान ६ वर)**

# थेट भेट मुरलीधराशी..!

ऋचा सुनील पारेख
मो. ९९३०१ २१४९०

...कल्पना आहे मला अशा कातरवेळी तुझ्या अनुमतीशिवाय तुझ्या पुढ्यात येऊन धडकणं योग्य नव्हे. माझा जन्मदाता ही मुरलीधर आणि तू ही मुरलीधर!पित्याशी बोलायला अनुमतीची आवश्यकता काय? तू मला भेटतोस पित्याच्या रूपात, सख्याच्या रूपात, सखीच्या रूपात, प्रियकराच्या रूपात, अगदी बालपणीच्या सवंगड्याच्या रूपात! तुझ्याशी बोलतांना जणू विश्वच भारावल्यासारखं भासतं. तुला खूप वाचलं, ऐकलं, समजून घेण्याचा प्रयत्न केला, पण ''तृप्ती पासून तृष्णा'' हे जागरण काही संपत नाही. शेवटी निश्चय केला थेट संवाद साधावा तुझ्याशीच!!

तू जन्म घेतला तोच मुळी आजन्म जन्मलेला राहण्यासाठी. आम्हाला नाही नं ते जमणार!आम्ही जीवनाच्या विवशतेत बांधलो गेलो आहोत. प्रकाश पांघरता येत नाही आणि तिमिरात लुप्तही होता येत नाही. सगळीच विवशता!योगी असून भोग करत, सृजनही करतो अन भंजनही, रागीही आहेस अन बैरागीही, निष्काम पण असतोस अन कामीदेखील, एकच जन्म दिलास पण तो देखील विरोधाभास आणि विसंगतीच्या गर्तेत हेलकावे खाणारा. बघतोस तू हे सगळं मग कुठेतरी किनारा का नाही देत येऊन?

सगळ्या विश्वाला व्यापून टाकलं आहेस तू तुझ्या मोहमायेने कान्हा! ज्यांना तुझी आठवण येते ते सर्वकाही विसरून तुझ्या प्रतिमेत विभोर होतात. आजही तुझ्या बासुरीचे सूर त्यांना संमोहित करून गोकुळापर्यत खेचून नेतात. तुझ्या रासलीला आणि प्राणप्रिय राधेच्या रंगात तर इतके तल्लीन होऊन रंगतात की आश्चर्य वाटतं. रासलीला करण्याच्या वयात तू सांदीपनी ऋषींचा आश्रम गाठलास. आता रासक्रीडा आणि राधेचं रहस्य तू तुझ्या शब्दात सांग किंवा स्पष्ट नकार दे. या अंतहीन द्वंद्वात आमची अस्मिता आम्हीच घोळत बसतो.

सरळ सरळ सांगणं हा तुझा स्वभाव नाहीच नं! सगळीकडे लीला फक्त! आवडतं तुला सगळ्यांना तुझ्यात गुंतवून ठेवायला. राधेनं तुझं अर्ध आयुष्य व्यापून टाकलं. तिचं अस्तित्व ही खरं तर तुझीच माया!! प्रामाणिक आणि प्रासंगिक दोन्ही राहू शकलास. सभोवतालच्या सगळ्यांना इतकं कृष्णमय केलंस की आपादमस्तक तुझ्यात बुडालेल्यांनी आजपर्यंत जाणून घेण्याचा प्रयत्नही केला नाही की सत्य काय आहे? हे माधवा!! तूच ह्याचं उत्तर दे!

तू उपदेश दिलास 'कर्म करा फळाची अपेक्षा ठेऊ नका' तू स्वतः कर्म करत करत हा उपदेश दिलास. आणि तुझे अनुयायी मात्र ते नं करता फक्त तुझ्या नावाचा जप करत बसतात. त्यांना तुझं नामस्मरण करणं हेच कर्म वाटतं. तुझ्या नावाचे स्मरण करून त्यांचं जीवन व्यर्थ होतंय सार्थक नाही. कारण तुझं नामस्मरण करण्यापेक्षा तुझ्यासारखा निष्काम कर्मयोग जर स्वीकार केला तर सगळं युगच सार्थक होईल. तू हे बघत असतोस मग हे आकर्षण करून स्वतःला कान्हा म्हणवतात तेव्हा काळीज जळतं. तू मात्र वर्षानुवर्षे हे सहन करूनही इतका आनंदी कसा? हे मनमोहन! तूच ह्याचा उलगडा कर!

आजचे हुकूमशाह स्वतःच्या स्वार्थाचे चोचले पुरवण्यासाठी क्रूरकर्म करत असतात. ते करताना सर्रास कृष्णनीती उल्लेख करतात. तू तर जे केलंस ते समतेच्या



कमी का नाही करत? हजारो नावांनी तुझी भावनाशून्य स्वार्थमिश्रित भक्ती ऐकण्याची तुझी अशी कुठली विवशता आहे हे मुकुंदा, उत्तर दे! एक अजूनही समजत नाही. तू इतका निर्मम कसा? तू देवकी, यशोदा, नंद, वासुदेव, राधा, गोपिका, अगदी प्राणीमात्रांना ही स्वतःच्या चुंबकीय वशीकरणात घट्ट बांधून ठेवलंस. आणि अचानक एक एक करून तेच बंध सोडत गेलास. नियम करत गेलास तेच नियम मोडत ही गेलास. इतकी कमालीची अलिप्तता! मन, बुद्धी सुन्न होते. तुझा त्याग पटकन लक्षात येत नाही. सगळे तुझे असून तू कोणाचा झाला नाहीस हे मात्र तुझ्या माथी लिहिलं गेलंय!गोपिकांसोबत रासक्रीडा करणारा तू दिसतोस पण स्वतःच्या धर्मपत्नीला स्पर्श ही नं करणारा कृष्ण मात्र स्मृतीआड जातो. स्वतंत्रतेत संयम हा गुण तुझ्याकडून आत्मसात करावा. काही भोगी माणसं असा भोग विलास प्रस्थापनेसाठी केलंस नं? न्यायाच्या आड येणाऱ्याला नष्ट करण्याचं काम... एका वाक्यात तुझं सूत्र होतं स्वतः स्वार्थी व्हायचं नाही आणि दुसऱ्याचा स्वार्थ पोसायचा नाही. तू निस्वार्थी होतास पण स्वतःच्या मुलांना मारण्याइतपत क्रूरही झालास. तुझ्याबाबतीत किती सूक्ष्म विचार करायचा हेच उमगत नाही..

जाणवतंय कृष्णा! बाहेर अंध:काराचं साम्राज्य पसरलंय. ह्या घनघोर तिमिरातून प्रकाशाकडे न्यायला एकदा तरी ये खऱ्या अर्थाने दर्शन..नव्हे मार्गदर्शन करायला! काही काळ नि:शब्दता.. तो त्याच्या खास शैलीत चेहऱ्यावर मधुर पण गूढ हास्य करीत उठला... माझे प्रश्नच नाही तर विचारही थांबले होते... ह्या मुरलीधर कन्येच्या हातात अलगद मोरपीस ठेवत तो मुरलीधर पाठमोरा निघून गेला.... पुन्हा एकदा मला कृष्णमय करून....



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

**आनंदी वाटचाल**

# आत्मबळ

आत्म्यात संकल्प किंवा निश्चय करण्याची जी शक्ती असते तिला आत्मबळ असे म्हणतात. आत्मबल म्हणजे संकल्प शक्तीचे सामर्थ्य .आत्म बळाचा उपयोग प्रत्येक जण नेहमीच करीत असतो. पण आपल्या अंगी आत्मबळ आहे आणि त्याचा उपयोग आपण जीवनात पदोपदी करीत असतो अशी जाणीव मात्र सहसा कोणालाही नसते .आपल्या शारीरिक शक्तीने आपण अनेक क्रिया नेहमी करीत असतो. पण त्याकरतांना आपण शक्तिमान आहोत आणि आपल्या शक्तीचा उपयोग करीत आहोत असे आपल्याला क्वचितच वाटते. जेव्हा विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त शक्ती खर्च करण्याची पाळी येते तेव्हा शक्ती खर्च करावी लागत असल्याची जाणीव आपल्याला होते आणि अशी जाणीव होऊ लागली म्हणजेच आपल्या अंगी शक्ती आहे की नाही हे सांगण्याचा किंवा ठरविण्याचा प्रश्न उत्पन्न होतो. ज्या गोष्टी करण्याची आपल्याला नेहमी सवय असते त्या करताना जे मनोव्यापार होत असतात त्याकडे आपले लक्ष नसते जे संकल्प रोज करण्याची सवय असते ते करण्याकरिता आत्मबळ फारसे लागत नाही .पण बुद्धीच्या निर्णयानुसार संकल्प करावयाचा असला तर मात्र तो करताना आत्मबळ बरेच लागते. ज्या गोष्टी करण्याचा मोह आपणाला होतो त्या करण्याचा संकल्प करताना आत्मबळ विशेष लागत नाही पण ज्या गोष्टी स्वाभाविक पणे आपल्याला आवडत नाही किंवा ज्या करण्याची सवय नसते त्या करण्याचा संकल्प करताना आत्मबळ जास्त लागते. आत्मबळाचा उपयोग चांगले किंवा वाईट असे दोन्ही प्रकारचे निश्चय करण्यासाठी केला जातो. म्हणूनच आत्मबलाचे निरनिराळे प्रकार असू शकतात. आत्मबलाचे सात्विक राजस आणि तामस असे तीन प्रकार सांगितलेले आहेत .ज्या आत्मबलाच्या योगाने मनप्राण व इंद्रिय यांच्या क्रिया विशुद्ध किंवा सात्विक बुद्धीच्या निर्णयानुसार कोणत्याही रीतीने न चळता होतात ते सात्विक आत्मबल होय यालाच नैतिक किंवा दैवी बळ असे म्हणतात.
ज्या आत्मबलाच्या योगाने धर्म अर्थ आणि काम यांच्यापासून प्रसंगानुसार प्राप्त होणाऱ्या फलाच्या इच्छेने मनुष्य ते पुरुषांर्थ साधण्याचा निश्चय करतो ते आत्मबल राजस होय. ज्या आत्मबलाच्या योगाने मनुष्य सात्विक बुद्धीच्या निर्णयानुसार न वागता दुष्ट भावनांच्या आहारी जाऊन झोप भीती शोक विशाद आणि गर्व ही सोडित नाही ते आत्मबल तामस होय .यालाच राक्षसी किंवा आसुरी बळअसंही म्हणतात .

सात्विक आत्मबळयुक्त पुरुष उच्चशीलवान निस्वार्थी परोपकारी आणि सदाचारी असतात. राजस आत्मबल युक्त मनुष्ये मध्यम शिलाची असतात आणि तामस आत्मबलयुक्त मनुष्ये निकृष्ट शिलाची किंवा दुशिल परपोषक आणि दुराचारी असतात सात्विक आत्मबळयुक्त पुरुष स्वतः उच्च पदाला जातात व समाजाची उन्नती करण्यास कारणीभूत होतात तामस आत्मबल युक्त पुरुष समाज शत्रू असतात ते स्वतः अधोगतीला जातात आणि इतरांना अनेक प्रकारे दुःख देतात.



मनुष्याचे आत्मबल किंवा शील पुष्कळ अंशी त्याच्या सवयीवर अवलंबून असते. लहानपणापासून ज्याला उत्तम सवयी लागलेल्या असतात त्याचे शील सर्वोत्कृष्ट असते ज्याला लहानपणापासून किंवा नंतर वाईट सवयी लागतात तो दुशील होतो. व्यक्तीच्या स्वतःच्या सवयीप्रमाणे कौटुंबिक जातीय धार्मिक सामाजिक राष्ट्रीय किंवा ऐतिहासिक सवयी जिला आपण परंपरा असे म्हणतो तिचाही परिणाम व्यक्तीच्या आत्मबलावर होत असतो. परंपरा चांगली किंवा वाईट असेल त्यानुसार त्या परंपरेत वाढलेल्या व्यक्ती सुशील वा दुशील होतात. आत्मबल व सवयी यांचा याप्रमाणे निकट संबंध असल्यामुळे सवयी कशा जडतात कशा तोडता येतात आणि जीवनात सवयीचे महत्त्व काय आणि किती असते हे पाहणे ही जरूर आहे. एकच क्रिया पुन्हा पुन्हा केल्याने त्याची सवय लागली असे आपण म्हणतो .शारीरिक श्रम विचार आत्मबल आणि वेळ यांची बचत होण्याकरिता सवय ही एक ईश्वर निर्मित नामीयुक्ती आहे असे म्हणण्यास हरकत नाही. मनुष्याचे जीवन व्यवस्थित पद्धतशीर नियमित आणि यशस्वी होण्यासाठी चांगली सवय असणे ही एक महत्वाची गोष्ट आहे. चांगल्या सवयी लहानपणापासून लावून घेणे हे सात्विक आत्मबल वाढविण्याचे सोपे आणि अत्यंत परिणामकारक साधन आहे .वाईट सवयी म्हणजे आत्म्याची दुर्बलता आणि असंस्कृतपणाचे चिन्ह होय. वाईट सवयीमुळे मनुष्याचे जीवन अव्यवस्थित होते. मनुष्याच्या सवयी नेहमी त्याच्या ताब्यात असल्या पाहिजे म्हणून मनुष्याने वारंवार आत्मनिरीक्षण करून आपले संकल्प सात्विक बुद्धीच्या निर्णयानुसार होत आहे की नाही याची पाहणी करीत गेले पाहिजे .या सवयी अनिष्ट आणि अपायकारक आहेत असे आढळून येईल त्यांना तात्काळ आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

**उमलत्या कळ्या**

# सहेली

आभाळ भरून आलं होतं. भर दुपारी अंधार पसरला होता. कोणत्याही क्षणी पाऊस जोराने कोसळेल असे वाटत होते. सकीनाभाभीने बाहेर दोरीवर वाळत घातलेले कपडे घरात आणले. काही खिडकीवर, काही खुर्चीवर असे पसरवून ठेवले.

अम्मी! अगं कितनी बार कपडा लाएँगी अंदर! अभी इधरही सुखने दो। फॅन लगाऊ क्या? सलमाने विचारले.

नही! लाईट बील कितना आता है, देखती है ना! तू तेरी पढ़ाई कर चूपचाप से! वह सलमान किधर गया है? कभी से घर में नही है!

तू नदी पे गई थी, तभी से वह दक्ष के साथ उसके घर खेलने गया है! सलमाने सांगितले.

तूने काय कूँ जाने दिया उसको! सकीनाभाभी थोडी चिडली होती.

वह थोडी ना मेरी बात मानता है! सलमाने तक्रार सांगितली.

तेवढ्यात पावसाचे मोठे थेंब खोलीच्या पत्र्यावर पडू लागले. टपटप येणाऱ्या आवाजामुळे सलमा व सकीनाभाभी वर छताकडे पाहू लागल्या. दोघींना वाटले की पाऊस पत्र फोडून आतमध्ये येतोय की काय. दोघी एकमेकींकडे पाहून हसल्या. मात्र मनातून त्या घाबरल्या होत्या. सलमाचे अब्बू असते तर त्यांना अजिबात भीती वाटली नसती. मात्र गेल्यावर्षी आलेल्या पुरात सलमाचे अब्बू आपली सायकल नि त्यावर ठेवलेल्या खारी, टोस्ट, बटर असा बेकरीचा माल वाचवण्याच्या प्रयत्नात पुलावरून खाली पडले नि नदीच्या प्रवाहात वाहून गेले.

भल्या पहाटेच गेलेले खारी, टोस्ट विकायला गेलेला बशीर भैय्या नेहमीच्या वेळेप्रमाणे बारा वाजता घरी आला नाही, म्हणून सकीनाभाभी चिंतेत पडली. दोन्ही पोरं शाळेत गेलेली. सलमाचे अब्बू आले की सोबतच जेवू म्हणून सकीनाभाभी वाट पाहत होती. बाहेर पावसाने थैमान घातला होता. पावसामुळे उशीर झाला असेल असे गृहीत धरून भाभी दहावेळा तरी दारात येऊन गेली असेल.

पोरं शाळेतून आली तरी बशीर भाईचा पत्ता नाही म्हणून सकीनाभाभी खोलीबाहेर पडली. कोणाला विचारावं असा तिला प्रश्न पडला. इथे ना त्यांचे कोणी नातेवाईक होते ना कोणी भाऊबंद! पोट भरायला म्हणून ते इथे आलेले. कमी भाड्याची खोली म्हणून इथे टेकडीच्या पायथ्याशी राहायला आलेले. दुकानात वाणसामान आणायला गेल्यावर किंवा गिरणीत जाताना तोंडओळख झालेल्या दोन-तीनजणांना तिने हिम्मत करून विचारलेही, बशीर भाई को देखा है क्या? सकाळीच गेलेत, अजून वापस नाय आले.

मग एक गुराखी आपल्या गुरांना घेऊन परतत होता. त्याने भाभीला पाहून आवाज दिला.

ओ भाभी! बशीर भैय्या नदीत वाहून गेला. आम्ही म्हणत होतो सायकल दे सोडून तरी त्यानं ऐकलं नाही.

सकीनाभाभी रस्त्यातच मटकन खाली बसली. डोक्यावरच्या ओढणीचा बोळा तोंडात कोंबून 'हाय अल्ला!' असा हंबरडा फोडला. क्षणाधार्धात होत्याचं नव्हतं झालं.

गाव परका असला तरी त्यातल्या माणसांनी तिला आधार दिला. पोरांना भरवसा दिला. सकीनाभाभीनं स्वतःला सावरलं. सलमाला जवळ घेऊन म्हणाली, तेरी दसवी की परीक्षा है! तू अच्छी पढ़ाई कर! मैं सिलाईकाम करूंगी! तू घर का थोडा काम निपट लो!

अम्मी तू चिंता मत कर! मैं तुम्हारी मदद करूंगी! सलमा शहाण्यासारखी बोलली.

सकीनाभाभीनं सलमाला पोटाशी धरलं. तिला रडावसं वाटत होतं, पण ती रडली नाही.

त्यानंतर मात्र सकीनाभाभीने मागे वळून पाहिले नाही. रात्रंदिवस शिलाई मशीन चालवत राहिली. पैशाला-पैसा जोडत गेली. सलमा-सुलतानच्या भविष्याचा विचार करता-करता तिचा दिवस संपायचा. नव्या आशेने तिचा दिवस उजाडायचा. गावातल्या महिला आपले ब्लाऊज सकीनाभाभीकडे द्यायच्या. गावानंही या कुटुंबाला स्वीकारलं होतं.

भर पावसाच्या तडाख्यात गुलाबबाई घाईघाईने आली. पोत्याला पाय पुसून ती आत आली.

भाभी, एक विचारायला आलेय. नाशिकला आपल्याला ट्रेनिंग देणार आहेत. दोन महिने ट्रेनिंग पूर्ण केलं की कंपनी आपल्याला त्यांची मशीन देईल. सर्टिफिकेट पण देईल. त्यांच्या मशीनवर आपण घरीच काम करून कंपनीची ऑर्डर पुरी करायची. तू येशील का आमच्यासोबत ट्रेनिंगला? गुलाबबाईनं बसता-बसता एका दमात सांगितलं.

ताई मला तं कामाची लय जरूरी आहे. पण मला नाशिकला कसं यायला जमंल? घरी दोन पोरांचं उरकायचं, घरातलं उरकायचं, मला जमंल असं नाय वाटत. सकीनाभाभी फार विचार करून बोलत होती.

अगं भाभी! माझ्या बी दोन पोरी हायती. नाशिकला जायला इथून कंपनीची बस आहे. दुसऱ्या चार गावच्या पंचेचाळीस बाया आहेत. तू आलीस तर मी बी येईन. बघ विचार कर. गुलाबबाई मनात काही ठरवून आली होती.

दोघींचं बोलणं ऐकून सलमा म्हणाली, अम्मी तू जा बिनधास्त मावशीबरोबर. मी आवरेल घरातलं. तुला मशीन मिळाल्यावर आपण दोघीपण काम करू. तेरी फिकीर नही मेरुकूं! सलमान की चिंता लगती है मेरुकूं! सकीनाभाभीचं मन द्विधा झालं होतं. अगं भाभी, तुझी सलमा जाणती झालेय. माझ्या दोघी तर तिच्यापेक्षाही लहान आहेत. गुलाबबाई म्हणाली.

मावशी, तुम्ही नका काळजी करू. मी गौरीच्या वेण्या बांधून देईन. तुम्ही लवकर गेल्या तरी त्यांना तयारी करायला मदत करीन. सलमा मनापासून बोलत होती.

भाभी, तुझी सलमा लय गुणाची हाये बघ! आपण आजच नाव नोंदवून येऊ. पुढचं पुढं बघू! गुलाबबाईनं निर्णय पक्का केला.

पुढच्या आठवड्यापासून सकीनाभाभी ट्रेनिंगला जाऊ लागली. भल्या पहाटे उठून ती तिघांचा स्वयंपाक करी. झाकपाक करून ठेवी. जाताना दरवाजा लावायला म्हणून ती सलमाला उठवायची. लेकरांना असं मागे सोडून जाताना भाभीला वाईट वाटे. मात्र तिचा नाइलाज होता. दिवसभराचं ट्रेनिंग संपवून घरी परतायला अंधार पडत असे. तिथून आल्यावर घरातलं आवरणं, स्वयंपाक, कपडे धुणे, पोलक्यांची काज-बटणं करणं यात रात्रीचे अकरा वाजत. अम्मीची धावपळ बघून सलमाला वाईट वाटे. ती अम्मीला म्हणायची, तू निकल जा टाईम पे. घर का सारा मैं देखूंगी!

भाभी सलमाला पोटाशी धरी. तिच्या डोक्यावरून हात फिरवी. तिच्या कपाळावर आपले ओठ टेकवायची. छोटा सलमानही शहाण्यासारखा वागू लागला होता. सलमा सांगायची तसा तो वागायचा. पसारा आवरायचा. गौरीला निरोप देणे, तिला बोलावणे अशी कामे तो करू लागला.

महिन्याभरात सकीनाभाभी रुळली. तिचा दिनक्रम सुरळीत चालू होता. अचानक एके दिवशी ट्रेनिंगहून परतल्यावर भाभी आल्या-आल्या भिंतीला टेकून बसली.



अम्मी, आज जरा जास्तच थकलेस. चाय बनाके देऊ क्या? सलमाने विचारले.

नही! नको! अगं, बस में आते समय कुछ औरत कुछ बी बोलती थी! कुछ बोलती थी, हम सब कल से नही आनेवाले है करके!

अम्मी, जो औरत नही आनेवाले है ना, उनके आदमी ने उन्हें मना किया रहेगा! और क्यों मालूम? उन्हें घर में पहले से ज्यादा मेहनत करनी पडती होगी! औरत वैसे नही मानेंगी इसलिए कंपनी में ऐसा होता, वैसा होता है। ऐसे वैसे कुछ भी बोलते है। तू फिकीर मत कर. बस्स और एक महिना ट्रेनिंग पुरा कर. बाद में घर बैठकर ही काम करना है ना?

अगं, ऐसाच हुआ है। बोलती है पगार कम देंगे। बस का भाडा निकालेंगे। दुसरा भी कुछ गंदा-गंदा बोलती है। सकिनाभाभी दिव्याच्या प्रकाशाकडे बघत बोलत होती.

अम्मी, हमारी स्कूल में इस साल एक सुंदर लडकी आयी है।वह होशियार भी है। मगर लडकों ने उसके बारे में कई अफवाहों को फैला दिया। उसने अपना पुरा ध्यान पढ़ाईपर दिया। अब सब शांत हो गये है!

कितनी शानी है गं तू मेरी बेटी! मैं टेन्शन में आयी थी। चल, अब खाना बनाते है पहले। सुबह जल्दी उठना पडता है! असं म्हणत सकीनाभाभीने सलमाच्या कमरेत हात घालून त्या दोघी स्वयंपाकघरात गेल्या. अम्मीच्या स्पर्शाने सलमाला आपण मोठे झाल्याची जाणीव झाली. भाभीला आपल्याला सहेली भेटल्याचा आनंद झाला.

# थेंबाचे महत्त्व

मंगला राजपूत
धुळे, मो. ८२७५२५४६३५

**पाऊसआला, वारा आला**
**पान लागले नाचू**
**थेंब टपोरे गोरे गोरे**
**भर भर गारा वेचू**

थेंबे थेंबे तळे साचे असे म्हणतात हा वाक्प्रचार दोन अर्थाने वापरला जातो एक म्हणजे थोडे थोडे पैसे साठवले किंवा थोडी थोडी बचत केली तर ती संकटाच्या वेळी किंवा महत्त्वाच्या वेळी उपयोगी पडते आणि दुसरा अर्थ की थेंब थेंब पाण्याने सुद्धा तलाव साठतो आणि दुष्काळामध्ये असं तलावाचं पाणी उपयोगी पडतं.

यावर्षी अल निनो मुळे पाऊस कमी पडेल असं सांगितलं जात होतं आणि जून सुरू झाला तरी पाऊस येत नव्हता घामाच्या धारा वाहत होत्या त्यावेळेला आपोआप तोंडातून शब्द बाहेर पडत होते की चार थेंब तरी पडू दे रे देवा आणि खरंच चार थेंब पडले म्हणजे पाऊस पडला तर खूपच गारवा वाटायला लागला. पहिल्या पावसात थेंब जेव्हा जमिनीवर पडतात तेव्हा असं म्हणतात की पावसाच्या थेंबांनी भिजल्यामुळे मातीला खूप आनंद होतो म्हणून खूप छान सुगंध सुटतो.

तीन थेंबांची गोष्ट खूपच महत्त्वाची आहे, एक थेंब जर शिंपल्यात पडला तर त्याचा मोती होतो, दुसरा थेंब जर तव्यावर पडला तर त्याची वाफ होऊन जाते आणि तिसरा थेंब जर गटारीत पडला तर त्याचं घाणेरडे पाणी तयार होतं यातून असं सांगायचं आहे की चांगल्या संगतीत राहिलं तर जीवन मोतीसमान होतं म्हणजे जीवन चांगलं होतं आणि कधी कधी वाईट संगतीमुळे वाफे सारखं जीवन वाया जातं तर अगदीच वाईट संगतीत राहिल्यामुळे जीवन गटारी सारखं म्हणजे अगदीच अधोगती होते म्हणून चांगली संगती ठेवावी यासाठी ही गोष्ट सांगितली जाते.

पावसाळा सुरू झाल्यावर एकदा थेंब थेंब पाऊस सुरू झाला की काही काळाने सृष्टी हिरवीगार होते नदी, नाले, धबधबे, ओढे व्हायला लागतात आणि सृष्टीचं सौंदर्य सर्वांगाने फुलून येतं त्यावेळेला कविता आठवते की -

**हिरवं हिरवं गार झालं**
**सारं शिवार हो सारं शिवार**

**आनंद गगनात मावेना**
**हसू गालात लपून राहीना**
आणि
**हिरवा निसर्ग हा भवतीने**
**जीवन सफर करा मस्तीने**
**मन सरगम छेडा रे**
**जीवनाचे गीत गा रे**

पाऊस पडल्यावर शेतकरी शेतात बी पेरतात,



निंदणी करतात, कापणी करतात घामाचे थेंब गाळतात तेव्हा आपल्याला खायला मिळतं म्हणजे घामाच्या थेंबाचे खूप महत्त्व आहे.

कधीकधी डोळ्यातून दोन आनंदाश्रू वाहिले तरी आपल्याला खूप आनंद होतो आणि ते अश्रूंमधून आपल्या भावना व्यक्त होतात की किती आनंद झाला आहे म्हणजे थेंब आनंदाचं पण प्रतीक आहे.

अत्तराच्या एका थेंबानेही मनाला प्रसन्न वाटतं, तजेला येतो, आत्मविश्वास येतो. आपल्यालाही चांगलं वाटतं आणि दुसऱ्यालाही चांगलं वाटतं, वातावरण सुगंधित, सकारात्मक होतं.

सणावाराला दिवाळीला आपण थेंबाची रांगोळी काढतो, ठिपक्या ठिपक्यांनी जोडून सुंदर रांगोळी तयार होते, सुंदर आकार तयार होतो आणि त्याच्यामध्ये रंग भरल्यावर खूपच मनमोहक अशी रांगोळी दिसते आणि प्रसन्न वाटतं आणि सकाळी सकाळी रांगोळी काढल्यामुळे दिवसभर मनामध्ये प्रसन्नता निर्माण होते म्हणून पूर्वीच्या बायका दररोज सकाळी रांगोळी काढायच्या की दिवसभर मनाला चांगलं वाटावं, सकारात्मक राहावं.

पावसाळ्यात काही ठिकाणी उंचावरून एखाद्या दगडावर थेंब थेंब पाणी सतत पडत राहतं आणि त्या दगडाला सुंदर आकार मिळून एक सुंदर शिल्प तयार होतं म्हणजेच यावरून सातत्य किती महत्त्वाच आहे हे दिसून येत.

पावसाळ्यात जर पाऊस पडला तर एखाद्या दिवशी संध्याकाळी सुंदर इंद्रधनुष्य दिसतं, पावसाच्या थेंबांमधून प्रकाश किरण गेल्यामुळे असं सुंदर इंद्रधनुष्य दिसून येतं, कधी न पाहिलेलं, आपण बनवू न शकणार असं सुंदर दृश्य दिसतं अशी आहे थेंबांची जादू. रक्तदान हे सर्वात श्रेष्ठ दान आहे असे म्हणतात कारण ऑपरेशन करतांना रुग्णाला किंवा ज्याला गरज असेल त्याला थेंबाथेंबाने सलाईन मधून रक्त दिले जाते त्या व्यक्तीला जीवनदान मिळते असे रक्त म्हणजे एक प्रकारे संजीवनीच असते म्हणून रक्तदात्याला जीवनदाता असे म्हणतात. थॅलेसिमिया वगैरे काही आजारांमध्ये रुग्णाला रक्त देण्याची गरज असते अशा वेळेला थेंब थेंब रक्ताचेही खूप महत्त्व असते कारण त्या रुग्णाचे जीवन अशा रक्तावरच अवलंबून असते. सलाईन द्वारे ही रुग्णाला थेंबा थेंबाने शक्तिवर्धक इंजेक्शन व औषध दिले जाते त्यामुळे रुग्णाला शक्ती मिळून शरीर चांगले होते. दो बूंद जिंदगी की अशी जाहिरात लहान मुलांना पोलिओ डोस देण्या अगोदर केली जाते तर खरंच रोगप्रतिकारक शक्ती वाढावी म्हणून लहान मुलांना पोलिओ डोस दिला जातो आणि त्यांचं शरीर सुदृढ होतं. चातक पक्षी हा तर पावसाच्या दोन किंवा काही थेंबांची खूप वाट बघत असतो आणि पावसाचे काही थेंब प्राशन केल्यानंतर त्याचं मन तृप्त होतं. वाळवंटात तर पाण्याच्या काही थेंबांचं खूपच महत्त्व असतं, वाळवंटात उन्हाळ्यात उंटावरून प्रवास करतांना लांबच लांब पर्यंत वाळवंट असतं, कुठेही पाण्याचा एक थेंबही दिसत नाही अशा वेळेला खूप तहान लागते त्यावेळेला जिवंत राहण्यासाठी पाण्याच्या काही थेंबाची सुद्धा खूप गरज असते.

पूर्वी म्हातारी व्यक्तीची तब्येत खराब असतांना त्या व्यक्तीच्या शेवटच्या घटकेच्या वेळेला बुजुर्ग सांगायचे की शेवटचे दोन थेंब तरी तोंडात टाका, म्हणजे जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसाला गरज असते पाण्याच्या थेंबांची, थेंब थेंब मिळून जे पावसाचे पाणी मिळते त्याचे जीवनात जगण्यासाठी खूपच गरज असते. अन्न, वस्त्र निवाऱ्यासाठी थेंब थेंब पडणाऱ्या पावसाची खूप गरज असते अशा जीवनावश्यक गरजा पूर्ण करणाऱ्या पावसाला म्हणजेच पाण्याच्या थेंबाला जीवनात खूप महत्त्व आहे.

पूर्वी पिकांना चारीने पाणी दिले जायचे त्यामुळे खूप पाणी वाया जायचे पण हल्ली ठिबक सिंचन योजना काढून सरकार त्यासाठी अनुदानही देते आणि थेंब थेंब पाणी बरोबर त्या रोपाच्या ठिकाणी पडून त्या रोपाची वाढ होते आणि शेतकऱ्यांना चांगलं उत्पादन ,उत्पन्न मिळत, नाही तर पूर्वी अगदी शेवटी शेवटी पाऊस पडला नाही तर पिके वाया जायचे परंतु आता ठिबक सिंचन मुळे पिकांना जीवदान मिळते. बुंद से गई वो हौद से नही आती असेही म्हणतात, माणसाची इज्जत- प्रतिष्ठा जाऊ नये किंवा माणसाने वाईट वागू नये म्हणून या वाक्प्रचाराचा उपयोग करतात . एका हिंदी कवितेत म्हटले आहे की पावसाच्या एका थेंबाला ढगातून पडायला भीती वाटते की आपलं कसं होईल परंतु एकदम जोराची हवा येते आणि तो थेंब खाली पडतो आणि तो थेंब समुद्रात जाऊन त्याचा मोती होतो या कवितेत कवीला सांगायचे आहे की घाबरू नये, हिम्मत करावी, आत्मविश्वास असावा म्हणजे सफलता नक्की मिळते आणि आपले घर सोडतांनाही शिक्षणासाठी असो किंवा नोकरीसाठी असो जर बाहेर पडलं तरच प्रगती होते.

आकार नाही उपयोग महत्त्वाचा-थेंबाचेही काही प्रकार असतात म्हणजे अगदी बारीक थेंबा थेंबाने पाऊस पडत असल्यास त्याला रिपरिप पाऊस म्हणतात, मध्यम आकाराच्या थेंबांनी पाऊस पडतो त्याला जे रिमझिम पाऊस म्हणतात, तर खूप मोठे थेंब आकाशातून येतात त्याला धो धो पाऊस म्हणतात.

परंतु असा धो धो पाऊस खूप पडला तर नद्या नाल्यांना पूर येतो घरं, गाड्या, सामान वगैरे वाहून जातं, मनुष्य आणि वित्तहानी होते म्हणजे पावसाचे थेंब रौद्र रूप धारण करतात तेव्हा असे होते म्हणजेच सर्व काही प्रमाणात असावे असे म्हणतात ते खरे आहे.

पावसाचे थेंब जमिनीवर पडायलाही योग्य हवामान लागते कधी कधी हवामान अनुकूल नसल्यास खूपच कमी पाऊस पडतो व दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते अशा वेळेला कविता आठवते की-

**पानी की हर बूंद कहे**
**बचा लो मुझे**
**जीवन की डोर हुं मै**
**पशु,पक्षी, पेड, इन्सान**
**पाणी से ही सबकी जान है**
**विनती है, हर बूंद बचाओ**
**बचा लो मुझे**

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

## माझा खान्देश

स्वातंत्र्य चळवळीत खानदेशचे योगदान अविस्मरणीय आहे. भारतीय समाजातील घराघरात त्याकाळी स्वदेशी चळवळ पोहोचलेली होती. विदेशी कापडाच्या होळ्या, दारूबंदी ,खादीचा प्रचार यासारखे स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित कार्यक्रम नियोजनबद्धपणे होत होते. स्वातंत्र्य चळवळीच्या या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन राष्ट्रीय चळवळीला गती देण्याचे काम खानदेशातील वकील मंडळींनी केले. सनदशीर मार्गाने चालणाऱ्या चळवळीला खानदेशातून खूप मोठी रसद मिळाली, ज्या ज्या मार्गांनी शक्य असेल त्या त्या सर्व मार्गाने खानदेशने स्वातंत्र्याच्या लढा चालवला. हजारो लोक तुरुंगात गेले. कित्येकांनी कठोर सजा भोगली, काही फासावर चढले तर काहींनी आपल्या छातीवर गोळ्या झेलल्या. स्वातंत्र्यासाठी समर्पित भावनेने योगदान देणाऱ्या खानदेश भूमीतील भिल्ल समाजातील स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याच्या हा छोटासा प्रयत्न.

**स्वातंत्र्य सैनिक ॲड. जयवंतराव गणपतराव नटावदकर**

स्वातंत्र्यासाठी समर्पित भावनेने योगदान देणारे खानदेश भूमीतील भिल्ल समाजातील स्वातंत्र्य सैनिक ॲड. जयवंतराव गणपतराव नटावदकर यांचा जन्म १८ जून १९१९ रोजी आदिवासी सामान्य कुटुंबात झाला. वडील व्यवसायाने शिक्षक असल्यामुळे घरात शैक्षणिक वातावरण पूर्वीपासून होतेच. त्यामुळे जयवंतराव नटावदकर यांना लहानपणापासून शिक्षणाची गोडी लागली होती.जयंतराव नटावदकर यांचे प्राथमिक शिक्षण नटावद या जन्मगावी तर पुढील शिक्षण नंदुरबार येथे झाले.नंदुरबार येथील म्यूनिसिपल हायस्कूल मधून १९४० साली मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नाशिक व पुण्यातील सर परशुराम भाऊ महाविद्यालयामधून उच्च शिक्षण त्यांनी पूर्ण केले. विद्यार्थी दशेत असताना महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशभर सुरू असलेल्या १९४२ चे चलेजाव आंदोलन व त्याच्या घोषणा यांनी त्याकाळी वातावरण भारावून टाकले होते . शाळा महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थीही या आंदोलनापासून दूर राहिले नाहीत. जयंतराव नटावदकर यांनी विद्यार्थीदशेत असतानाच चलेजाव आंदोलनात सक्रियपणे भाग घेतला. आंदोलनात भाग घेतल्यामुळे त्यांना ६ महिने कारावासाची शिक्षण ठोठावण्यात आली. मोठ्या हिमतीने या सर्व प्रसंगांना त्यांनी तोंड दिले. पुढे आचार्य विनोबा भावेंच्या भुदान चळवळीतही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. शिक्षणक्रमही सुरू ठेवला. १९४४ साली ते बी.ए.च्या परीक्षेत इंग्रजी व मराठी विषयांसह चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाले. त्याकाळी मुंबई राज्यातील आदिवासी समाजातून बी.ए.ची पदवी प्राप्त करणारे जयंतराव नटावदकर हे पहिले पदवीधर होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासी भागात व भिल्ल समाजात सुधारणा करु पाहणाऱ्या व सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात काम करणारा कार्यकर्ता म्हणून जयवंतराव नटावदकर सर्व दूर परिचित होते. १९४६ ते १९५७ हा जयवंतराव नटावदकर यांच्या शैक्षणिक कार्याचा उत्कर्षाचा कालखंड म्हणता येईल. कारण याच कालखंडात ते पश्चिम खानदेश भिल्ल शिक्षण मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे आणि भविष्याकडे पाहण्याच्या शैक्षणिक दृष्टिकोन असल्यामुळे त्यांनी पश्चिम खानदेशातील विशेष करून सातपुड्यातील आदिवासी पट्ट्यात विविध ठिकाणी शिक्षण संस्था सुरू केल्या व आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय करून दिली.




शिक्षण क्षेत्रच नव्हे तर सामाजिक क्षेत्रात देखील जयंतराव नटावदकर यांनी सक्रियपणे योगदान त्याकाळी दिले . त्यांनी सामाजिक कार्यास सुरुवात केली त्यावेळेला शंकर विनायक ठकार, काकासाहेब बर्वे, बाळुभाई मेहता अशी सर्वोदयी विचारसरणी असलेले सर्वोदयी स्वातंत्र्य सैनिक पश्चिम खानदेशात आदिवासी भागात काम करीत होते. त्यांनी पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार या संस्थेच्या माध्यमातुन ठिकठिकाणी आश्रमशाळा, जंगल कामगार सहकारी संस्था स्थापन करून जनजागरणाच्या कामास सुरुवात केलेली होती. १९४४ साली या सर्व समाज सेवकांनी स्वतः बाजुला होऊन जयवंतराव नटावदकर यांच्याकडे पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा सोपवली. जयवंतराव नटावदकर यांनी कर्तबगारीने ही जबाबदारी पार पाडली. आजही पश्चिम खानदेशातील सातपुड्यातील विविध आदिवासी गावांमध्ये त्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्था उत्तमपणे काम करीत आहेत. शिक्षणाची गंगा आदिवासींपर्यंत नेऊन आदिवासींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिक्षणाच्या बळावर आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना सक्षमपणे उभे करण्याचे श्रेय जयंतराव नटावदकर यांना जाते. विविध विद्याशाखांमधून आजही हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन वेगवेगळ्या पदांवर आपल्या सेवा देत आहेत.

जयंतराव नटावदकर यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करण्यासाठी विशाल क्षेत्र मिळाले. त्यांनी १९४६ ते १९६१ या कालखंडात आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थांच्या माध्यमातुन आदिवासी क्षेत्रात आदिवासींना आर्थिक बळ मिळवून दिले. आदिवासी विद्यार्थी शिक्षणात कुठेही कमी पडू नये. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी होती. त्यांनी काही काळ महसूल खात्यात अधिकारीपदी नोकरी देखील केली. परंतु दऱ्या –खोऱ्यातील उपेक्षित, वंचित आदिवासी बांधवांवर होणारा अन्याय त्यांना अस्वस्थ करीत होता . म्हणून त्यांनी १९५१ साली कायद्याची पदवी मिळवली व गरीब आदिवासी समाजातील व्यक्तींना न्याय मिळवुन देण्यासाठी वकिलीची सनद मिळवून काही वर्ष वकिली व्यवसाय केला. आदिवासींच्या सर्वांगिण विकासाची कल्पना साकार करण्यासाठी व आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी ३२ जंगल कामगार सहकारी संस्था तसेच सामाजिक, सांस्कृतिक कार्यासाठी स्वच्छता व स्वावलंबन ह्या आपशी गुला महाराज यांच्या शिकवणीचा त्यांनी जास्तीत जास्त प्रसार केला. पुढे जाऊन बालपणापासून

घरातूनच शैक्षणिक संस्कार व वातावरण मिळालेल्या जयवंतराव नटावदकर या होतकरु आणि शिकलेल्या तरुणाला राजकीय कार्यात पुढे आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. १९३५ च्या कायद्यानुसार १९४० साली मुंबई राज्याच्या असेंब्लीच्या झालेल्या पहिल्या निवडणुकीत पश्चिम खानदेशातुन नंदुरबार मतदार संघातुन ते निवडून आले. आदिवासींचा पहिला लोकप्रतिनिधी या नात्याने जयवंतराव नटावदकर यांनी आदिवासींच्या अनेक समस्यांवर आवाज उठवून आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले.पुढे १९५२ मध्ये नंदुरबार लोकसभा मतदार संघातुन ते खासदार म्हणून निवडून आले. साधारण दहा–अकरा वर्षाचा कालखंड हा जयंतराव नटावदकर यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. याच कालखंडात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या थोर विभूतींचे कार्य परिचय त्यांना जवळून पाहता आले. आदिवासींसाठी जीवन कंठणाऱ्या कणखर वृत्ती व स्वयंभू व्यक्तिमत्व असलेल्या जयंतराव नटावदकर यांचा १७ मे १९७८ रोजी निधन झाले.

### ‘माझा खानदेश’... खानदेशचा वैभवशाली इतिहास मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न

खानदेशातील प्रबोधनाच्या चळवळीत ’आपला महाराष्ट्र’ चे लक्षणीय योगदान राहिले आहे. मी स्वतः गेल्या चार–साडेचार दशकापासून ’आपला महाराष्ट्र’ दैनिकाचा वाचक राहिलो आहे. संपूर्ण खानदेशात अत्यंत लोकप्रिय दैनिकात दर रविवारी प्रकाशित होणाऱ्या ’बहर’ या साहित्य पुरवणीतील माझे मित्र डॉ.संजय ढोडरे यांची ’माझा खानदेश’ लेखमाला अगदी सुरुवातीपासून न चुकता वाचतो. खानदेशच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारी ही लेखमाला आहे .डॉ.संजय ढोडरे सातत्याने विविध विषयांवर लेख लिहीत असतात. खानदेशातील समाज प्रबोधन– परिवर्तन व पुरोगामी चळवळीशी ते सक्रियपणे जुळलेले आहेत. अध्ययन, अध्यापन ,संशोधन, लेखन या क्षेत्रातील त्यांचा अनुभव व त्यांच्याजवळ असलेली वैचारिक बैठक, चिंतनशीलता लेख मालिकेतील प्रत्येक लेखांमध्ये दिसून येते. त्यांचा लेख मालिकेतील पहिला लेख वाचल्यावर मी त्यांना पहिली प्रतिक्रिया पाठवली होती... व प्रत्येक लेखाला प्रतिक्रिया भ्रमणध्वनी द्वारे देत असतो. या लेखमालेतून त्यांची मातृभूमीवरील प्रेम–आस्था, अस्मिता व स्वाभिमान प्रकट होताना दिसते. अनेक अशा गोष्टी असतात ज्या विषयी आपल्याला केवळ वरवर माहिती असते ...त्याच्या खोलात किंवा तपशिलात आपण जात नाही... मला वाटते ज्ञात– अज्ञात अशा अनेक घटना व संदर्भ यांची उकल या लेखमालेतून झालेली आहे. प्रत्येक अंकात त्यांनी नवनवीन विषयांना हात घातलेला आहे. ’माझा खानदेश’ लेखमालिकेतून सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य–कला व समाज प्रबोधन या क्षेत्रातील विस्मृतीत गेलेल्या घटना–स्थळांना त्यांनी प्रकाशझोतात आणले आहे. गतकालीन इतिहासाची मोड तोड न करता खानदेशी वैभवशाली इतिहासाची नव्याने ओळख ही लेखमाला करून देते..... मी व्यक्तिशः डॉ.संजय ढोडरे यांचे अभिनंदन करतो... व त्यांच्या हातून यापुढेही असेच उत्तमोत्तम लेखन कार्य होत राहो यासाठी शुभेच्छा देतो...

**–डॉ.कृष्णमोहन सैंदाणे**
सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ, धुळे

### खानदेशच्या ऐतिहासिक व भौगोलिक घटना-स्थळांचा शब्दरूपी प्रवास

’आपला महाराष्ट्र’ दैनिकाच्या ’बहर’ पुरवणीत डॉ. संजय ढोडरे यांच्या ’माझा खानदेश’ लेखमालिकेतील या वर्षी जानेवारी पासून प्रकाशित झालेले जवळपास सर्वच लेख वाचनीय आहेत. लेखकाने आपल्या मायभूमी खानदेश बद्दल माहिती नसलेल्या अनेक घटना–प्रसंग व स्थळांची शब्दरूपी सफर लेखमालिकेच्या माध्यमातून घडवून आणली. पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश या दोन विभागांमध्ये व आता ३–४ जिल्ह्यांमध्ये विस्तारलेल्या खानदेशचे अगदी प्राचीन काळापासून तर आतापर्यंतच्या ऐतिहासिक, भौगोलिक, साहित्य– कला,सामाजिक, सांस्कृतिक,राजकीय, धार्मिक,समाज प्रबोधनपर तसेच स्वातंत्र्य चळवळ व अन्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण प्रसंग यांचे अत्यंत सखोल आणि संशोधनाधारित अभ्यासपूर्ण विश्लेषण लेखमालेतून डॉ.संजय ढोडरे यांनी मांडले आहे. या लेखमालिकेमुळे आजच्या तरुण पिढीला खानदेशच्या समृद्ध वारशाची नक्कीच ओळख होईल. आपण घेतलेले अपार कष्ट आणि केलेले संशोधन प्रत्येक लेखातून स्पष्टपणे जाणवते. भविष्यात लेखमाला पूर्ण झाल्यावर ’माझा खानदेश’ मधील लेख एकत्रित करून उत्तम असा संदर्भ ग्रंथ प्रकाशित व्हावा. ज्याने खानदेश विषयी संशोधन करणाऱ्या व जाणून घेण्याची प्रवृत्ती असणाऱ्या संशोधक विद्यार्थी व नागरिकांसाठी तो ग्रंथ उपयोगी पडेल. आपले व ’आपला महाराष्ट्र’ दैनिकाच्या सर्व टीमचे मनःपूर्वक अभिनंदन... पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा...!

**–ॲड.तुकाराम चित्ते**, प्रकाशा, जि.नंदूरबार

# बँक खाती व गुंतवणुकीतील नॉमिनेशन



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

## अर्थवेध

आजच्या काळात प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक जीवनात बँक खाती, मुदत ठेवी, म्युच्युअल फंड, शेअर्स, विमा पॉलिसी, पोस्ट ऑफिसच्या बचत योजना आणि इतर विविध प्रकारच्या गुंतवणुकींना महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्ती आपल्या आयुष्यभराच्या कमाईतून या माध्यमातून बचत व गुंतवणूक करत असते. मात्र, एखाद्या खातेदाराचा किंवा गुंतवणूकदाराचा अचानक मृत्यू झाल्यास त्याच्या आर्थिक मालमत्तेचे काय होईल, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत नॉमिनेशन (Nomination) ही अत्यंत उपयुक्त व्यवस्था ठरते. नॉमिनेशन म्हणजे खातेदार किंवा गुंतवणूकदाराने आपल्या मृत्यूनंतर संबंधित खाते किंवा गुंतवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी एका किंवा अधिक व्यक्तींचे नाव नोंदवून ठेवणे होय. त्यामुळे मृत्यूनंतर संबंधित बँक किंवा वित्तीय संस्थेला रक्कम कोणाकडे सोपवायची याबाबत स्पष्टता मिळते आणि कुटुंबीयांना रक्कम मिळवण्याची प्रक्रिया तुलनेने सोपी व जलद होते. विशेषतः अनेक बँक खाती, ठेवी आणि वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकी असलेल्या व्यक्तींनी नॉमिनीची माहिती योग्य पद्धतीने नोंदवणे आणि ती वेळोवेळी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक नियोजनाबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीनेही नॉमिनेशनला महत्त्व आहे.

बँकेत बचत खाते उघडताना, मुदत ठेव (FD) करताना, लॉकर सुविधा घेताना तसेच विविध गुंतवणूक पर्यायांमध्ये पैसे गुंतविताना आपल्याला एक अर्ज भरावा लागतो. या अर्जामध्ये नॉमिनेशन किंवा नामनिर्देशन असा एक अत्यंत महत्त्वाचा रकाना असतो. अनेक वेळा हा रकाना दुर्लक्षित केला जातो किंवा रिकामाच ठेवला जातो. मात्र, असे करणे खातेदाराच्या किंवा गुंतवणूकदाराच्या निधनानंतर त्यांच्या बँक खात्यांतील रक्कम, ठेवी किंवा गुंतवणुकीबाबत कुटुंबासाठी मोठ्या अडचणी आणि कायदेशीर गुंतागुंत निर्माण करू शकते.

**नॉमिनेशन म्हणजे काय?**

नॉमिनेशन म्हणजे खातेदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या बँक खात्यातील रक्कम, ठेव, गुंतवणूक किंवा लॉकरमधील वस्तू कोणाला द्यायच्या आहेत, याबाबत बँकेला दिलेली अधिकृत माहिती. नॉमिनेशन केल्यास संबंधित व्यक्तीला कोणतीही गुंतागुंतीची कायदेशीर प्रक्रिया न करता बँकेकडून रक्कम किंवा लॉकरचा ताबा मिळू शकतो.

उदाहरणार्थ: जर एखाद्या व्यक्तीच्या बँक खात्यात ५ लाख रुपये असतील आणि त्या व्यक्तीचे निधन झाले, तर बँक त्या खात्याची रक्कम नॉमिनीला देऊ शकते. यासाठी कुटुंबाला दीर्घ न्यायालयीन प्रक्रिया करावी लागत नाही.

**नॉमिनेशन का आवश्यक आहे?**

जर खातेदाराने नॉमिनेशन केले नसेल, तर त्याच्या निधनानंतर कायदेशीर वारसांना बँकेत दावा दाखल करण्यासाठी विविध कागदपत्रे, वारस प्रमाणपत्र, न्यायालयीन प्रक्रिया आदींचा सामना करावा लागतो. यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाढतो. नॉमिनेशन ही प्रक्रिया सोपी, जलद आणि वादविरहित बनवते.

**१ नोव्हेंबर २०२५ पासून मोठा बदल**

१ नोव्हेंबर २०२५ पासून बँकिंग कायद्यात महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. या बदलामुळे बँक खात्यांसाठी चार व्यक्तींपर्यंत नॉमिनी नियुक्त करण्याची सुविधा लागू आहे. यामुळे खातेदार आपल्या मृत्यूनंतर जमा रक्कम एकापेक्षा जास्त व्यक्तींमध्ये ठरावीक टक्केवारीनुसार वाटू शकतो किंवा क्रमाने नॉमिनेशन करू शकतो.




उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीच्या बँक ठेवीमध्ये पत्नी, मुलगा आणि दोन मुली यांना नॉमिनी करायचे असल्यास, या चारही व्यक्तींची नावे नोंदवता येतात. जर खातेदाराने ठेवीचे प्रमाण निश्चित केले असेल, तर प्रत्येक नॉमिनीला ठरावीक हिस्सा मिळेल अशा पद्धतीने नॉमिनेशन करता येते. दुसऱ्या पद्धतीमध्ये नॉमिनींचा क्रम ठरवता येतो. अशा वेळी पहिल्या नॉमिनीच्या अनुपस्थितीत किंवा संबंधित परिस्थितीत पुढील नॉमिनीचा क्रम लागू होतो.

**कोणाला नॉमिनी करता येते?**

खातेदार आपल्या खात्यात कोणालाही नॉमिनी करू शकतो. जोडीदार, मुले, आई–वडील, नातेवाईक किंवा विश्वासार्ह व्यक्ती असू शकते. बँक खात्यांव्यतिरिक्त विमा, गुंतवणूक आणि इतर मालमत्तांमध्येही नॉमिनेशनची सुविधा उपलब्ध आहे.

**नॉमिनेशन कसे करावे?**

नॉमिनेशन करणे अत्यंत सोपे आहे. खाते उघडताना अर्जामध्ये नॉमिनीचे नाव नमूद करावे लागते. त्यामध्ये नॉमिनीचे पूर्ण नाव, पत्ता, नाते आणि जन्मतारीख नमूद करावी लागते. अनेक बँका आता ऑनलाइन नॉमिनेशनची सुविधा देखील देतात. तसेच खातेदाराला कधीही नॉमिनेशन बदलण्याचा अधिकार असतो. विवाह, कुटुंबातील बदल किंवा इतर कारणांमुळे नॉमिनेशन अद्ययावत करता येते.

**अल्पवयीन व्यक्तीला नॉमिनी करता येते का?**

अल्पवयीन व्यक्तीला (Minor) नॉमिनी करता येते. एखाद्या खातेदाराला आपल्या बँक खात्यातील किंवा मुदत ठेवीतील रक्कम आपल्या अल्पवयीन मुलाला किंवा मुलीला भविष्यात मिळावी असे वाटत असल्यास, त्या अल्पवयीन व्यक्तीचे नाव नॉमिनी म्हणून नोंदवता येते. मात्र, अल्पवयीन व्यक्ती स्वतः त्या वेळी रक्कम स्वीकारण्यास किंवा तिच्याशी संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यास सक्षम नसल्यामुळे नॉमिनेशन करताना त्याच्या/तिच्या वतीने रक्कम स्वीकारणाऱ्या पालकाची किंवा नियुक्त व्यक्तीची माहिती देणे आवश्यक असते.

नॉमिनीचे अधिकार आणि जबाबदारी

नॉमिनी करताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नॉमिनी आणि कायदेशीर वारस हे समान असतीलच असे नाही. नॉमिनीची व्यवस्था प्रामुख्याने मृत खातेदाराच्या मालमत्तेचा दावा संबंधित संस्था कोणाकडे सोपवू शकते याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी असते. मात्र, त्या मालमत्तेवर अंतिम हक्क कोणाचा आहे, हा प्रश्न लागू वारसाहक्काचे कायदे, वसीयत आणि इतर कायदेशीर बाबींनुसार ठरू शकतो.

नॉमिनी म्हणजे मालमत्तेचा अंतिम मालक नसतो. जर नॉमिनी कायदेशीर वारस नसेल, तर त्याला केवळ विश्वस्त म्हणून रक्कम मिळते. त्याचे कर्तव्य ती रक्कम कायदेशीर वारसांना हस्तांतरित करणे हे असते. कायदेशीर वारसांमध्ये पती–पत्नी, मुलगा, मुलगी, आई–वडील, भाऊ–बहीण आदींचा समावेश होतो.

**नॉमिनी नसेल तर काय?**

एखाद्या व्यक्तीने बँक खाते, मुदत ठेव किंवा इतर आर्थिक साधनांमध्ये नॉमिनीची नोंद केली नसेल, तर त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर संबंधित रक्कम थेट कोणत्याही व्यक्तीला देता येत नाही. अशा वेळी बँकेला किंवा संबंधित वित्तीय संस्थेला मृत खातेदाराच्या कायदेशीर वारसांची खात्री करून रक्कम देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. त्यामुळे नॉमिनी नसल्यास कुटुंबीयांना आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतात आणि काही प्रकरणांमध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्र, उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate), वसीयत किंवा इतर वारसाहक्काशी संबंधित कागदपत्रे आवश्यक ठरू शकतात.

**नॉमिनी म्हणून कोणाला निवडावे?**

सामान्यतः व्यक्ती आपल्या जवळच्या कुटुंबातील सदस्याला नॉमिनी करणे पसंत करते. विवाहित व्यक्ती पती किंवा पत्नीला, तर पालक आपल्या मुलांना नॉमिनी करू शकतात. मात्र, प्रत्येक कुटुंबाची परिस्थिती वेगळी असल्यामुळे नॉमिनी निवडण्याचा निर्णय खातेदाराने स्वतःच्या परिस्थितीनुसार घ्यावा.

नॉमिनेशन ही एक छोटी पण अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. ती दुर्लक्षित केल्यास कुटुंबाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे प्रत्येक खातेदाराने आपल्या सर्व बँक खात्यांमध्ये, ठेवींमध्ये आणि गुंतवणुकांमध्ये नॉमिनेशन केले आहे की नाही, याची आजच खात्री करून घ्यावी. योग्य वेळी केलेले नॉमिनेशन हे आपल्या कुटुंबासाठी मोठा दिलासा ठरू शकते.

# दोन छोटे रायडर्स आणि आजोबा




घरात त्या दिवशी सकाळपासूनच वेगळाच उत्साह होता. चैतन्य आणि चिन्मय गेल्या कित्येक दिवसांपासून एकच हट्ट करत होतेआजोबा, आम्हालाही बाइक पाहिजे!

त्यांच्या बालहट्टाला अखेर घरच्यांनी होकार दिला आणि एका दिवशी घराच्या अंगणात दोन छोट्या इलेक्ट्रिक बाइक येऊन उभ्या राहिल्या.

बाइक पाहताच दोघांच्या डोळ्यांत चमक आली. जणू काही त्यांच्या हातात जगातील सर्वात मोठी गोष्ट आली होती.

चैतन्यने लगेच सीटवर बसून हँडल पकडले.

आजोबा, बघा ना! मी बाइक चालवतोय!

चिन्मय कुठे मागे राहणार होता?

आजोबा, आधी मला शिकवा. चैतन्यला नंतर शिकवा!

नाही! आधी मी!

क्षणात दोघांमध्ये वाद सुरू झाला.

मी हसत दोघांकडे पाहिले. दोन छोटे रायडर्स आणि त्यांचा एकच कोचआजोबा!

अरे बाबा, दोघांनाही शिकवणार आहे. पण आधी बाइक कशी चालवायची हे समजून घ्या.

दोघेही अगदी गंभीर चेहरा करून माझ्यासमोर उभे राहिले.

मी त्यांना हँडल कसे पकडायचे, एक्सिलरेटर कसा वापरायचा आणि बाइक हळू कशी चालवायची हे सांगू लागलो.

हळू चालवायची आणि एक्सिलरेटरवरून पाय काढला की बाइक थांबते, मी समजावून सांगितले.

चैतन्यने सावधपणे एक्सिलरेटर दिला. बाइक हळूहळू पुढे सरकली. त्याने पाय काढताच बाइक थांबली.

अरे वा! आजोबा, पाय काढला की ती थांबते! तो आनंदाने ओरडला.

चिन्मयनेही लगेच प्रयोग करून पाहिला. पुन्हा बाइक पुढे गेली आणि एक्सिलरेटरवरून पाय काढताच थांबली.

आजोबा, ही तर माझं ऐकते! तो म्हणाला आणि दोघेही खळखळून हसू लागले.

पुढचे काही दिवस आमच्या अंगणात रोज प्रशिक्षण सुरू झाले.

कधी मी मागून सीट पकडून बाइक चालवायला शिकवत होतो, तर कधी दोघे स्वतःच प्रयत्न करत होते. सुरुवातीला पाय कधी जमिनीवर, तर कधी एक्सिलरेटरवर. बाइक कुठे वळेल याचा नेम नसायचा.

पण भीतीपेक्षा त्यांच्या चेहऱ्यावर शिकण्याचा आनंद अधिक होता.

कधी बाइक अचानक बंद पडायची.

मग दोघेही बाइकभोवती फेरफटका मारायचे.

आजोबा, ही का बंद झाली?

काय झालं असेल?

मी म्हणायचो, कदाचित चार्ज संपला असेल.

बस्स! हा शब्द ऐकताच दोघांच्या डोक्यात नवा प्रश्न जन्माला आला.

चार्ज म्हणजे?

बाइकला चार्ज का करावा लागतो?

मोबाईल चार्ज होतो हे त्यांना माहीत होते; पण बाइकही चार्ज होते, ही गोष्ट त्यांच्यासाठी नवीन होती.

एक दिवस बाइक चार्जिंगला लावली होती. दोघे बराच वेळ तिच्याकडे पाहत उभे राहिले.

चिन्मयने विचारले, आजोबा, बाइक झोपली आहे का?

मी हसत म्हणालो, हो, समज झोपली आहे.

मग पूर्ण चार्ज झाली की उठते का?

चैतन्यने लगेच विचारले, आणि चार्ज झाली की ती खुश होते का?

त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना मलाच कधी कधी माझे बालपण आठवायचे.



चार्जिंगची प्रक्रिया पाहणे हा त्यांचा रोजचा कार्यक्रम झाला. चार्जर कुठे लावायचा, स्विच कधी सुरू करायचा, चार्जरचा दिवा कधी लागतो, हे दोघे बारकाईने पाहू लागले.

हळूहळू त्यांनी चार्जर स्वतः आणून ठेवणे, बाइकजवळ ठेवलेली वस्तू बाजूला करणे आणि चार्जिंग सुरू करण्यापूर्वी आजोबांना हाक मारणे सुरू केले.

एक दिवस तर त्यांनीच मला सांगितले,

आजोबा, बाइक चार्जला लावायची आहे.

मी मुद्दाम विचारले, का?

चैतन्य म्हणाला, काल ती चालत नव्हती ना! म्हणजे तिचा चार्ज संपला असणार.

त्याच्या उत्तराने मला जाणवलेही मुले फक्त खेळत नाहीत, तर निरीक्षणातून शिकत आहेत.

एकदा बाइक चालवत असताना अचानक ती थांबली.

दोघांनी आधी एकमेकांकडे पाहिले. मग बाइककडे पाहिले.

चिन्मय म्हणाला, आजोबा, पुन्हा आजारी पडली!

मी म्हणालो, आधी पाहूया काय झालंय.

दोघेही माझ्याबरोबर खाली बसले. वायर कुठे आहे, स्विच कुठे आहे, चार्जिंगचे कनेक्शन व्यवस्थित आहे का, हे ते कुतूहलाने पाहू लागले.

मी त्यांना प्रत्येक गोष्ट समजावून सांगत होतो.

हा स्विच. हा चार्जर. इथून वीज जाते आणि बॅटरी चार्ज होते.

म्हणजे वीज आत जाते?

चैतन्यने विचारले.

हो.

मग बाइकच्या आत वीज दिसते का?

हा प्रश्न ऐकून मी हसलो.

वीज दिसत नाही, पण तिचं काम दिसतं.

दोघे काही क्षण शांत राहिले.

कदाचित त्यांच्या छोट्या मनात विज्ञानाचा पहिला धडा सुरू झाला होता.

नंतर तर बाइक चालवण्याबरोबरच तिची काळजी घेणेही त्यांच्या खेळाचा भाग झाले. बाइक कुठे ठेवायची, चार्जर कुठे ठेवायचा, स्विच बंद आहे की नाही, हे ते तपासू लागले.

कधी एकमेकांच्या पुढे जाण्याची स्पर्धा व्हायची. मी जिंकलो!

नाही, मी आधी पोहोचलो!

अंगणात छोटासा रेस ट्रॅक तयार झाला होता.

कधी बाइकचा वेग वाढवायचा, कधी हळू करायचा, कधी एक्सिलरेटरवरून पाय काढून बाइक थांबते का हे पुन्हा तपासायचेत्यांचे प्रयोग सुरूच असायचे.

पण त्या स्पर्धेतही एक गंमत होती. एखाद्याची बाइक बंद पडली की दुसरा लगेच थांबायचा.

चल, आपण आजोबांना बोलवू.

मला तेव्हा जाणवायचेस्पर्धा असली तरी मैत्री त्यापेक्षा मोठी आहे.

एक दिवस दोघे बाइक घेऊन माझ्याजवळ आले.

आजोबा, तुम्ही पण बसणार का?

मी हसून म्हणालो, माझ्यासाठी ही बाइक खूप छोटी आहे.

चिन्मय म्हणाला, मग आम्ही मोठे झाल्यावर तुम्हाला मोठी बाइक घेऊन देऊ!

त्या वाक्याने माझ्या मनात काहीतरी हलले.

त्यांना कदाचित माहीतही नव्हते की त्यांनी त्या क्षणी आजोबांना किती मोठी भेट दिली होती.

आज माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी मी त्यांच्या बालपणाचा साक्षीदार आहे. त्यांच्या प्रत्येक नव्या गोष्टीत मला माझे हरवलेले बालपण सापडते.

त्यांची पहिली बाइक म्हणजे केवळ दोन चाकांचे खेळणे नव्हते.

ती त्यांच्या स्वावलंबनाची पहिली पायरी होती.

ती निरीक्षणाची पहिली शाळा होती.

ती प्रश्न विचारण्याची पहिली प्रयोगशाळा होती. आणि माझ्यासाठी? **(पान ६ वर)**

# शब्दझुला

## सरावन सनसना मेया !!

झिमझीम पडतीस पानीन्या धारा
संगे ल्हिसनी थंडा वारा
सोनेरी किरनस्ना संगे
ल्हिसनी सन समदा
सरावन उना सरावन उना !!
सरावन सोमवारले शे दखा संकरजीना मान
त्यान्हा पुजागुंता लई जावूत फुले, बेलपान
तीही,तांदूयनी सिवामूठ वाहूत ना !!
मंगयवारले उना मंगयागौराईना सन
भारी हारीकमा रमस समद्या सवासनीसन मन
गौराईनी पूजा करीसनी फुगड्या खेयूत ना !!
नागपंचमिले शे दखा नागोबाना मान
तो बी फना काढीसनी भारी डूलस आननमान
परंपरागत वारुयनी पूजा करूत ना !!
पंचमी व्हइसनी आयतवारे शे कानुबाई उच्छाव
खान्देशी दैवतले दिवूत आपिन माहेरना मान
आरती करीसनी मनभावथीन रोट पुजूत ना !!
समदीरले भरतं येस भारी येताज नारय पुनी
यान्हाज जीववर आम्हन कोलियासन जीनं भारी
पूजा करिसनी समदीरले नारय वाहूत ना !!
हातमा लिसनी पुजानं ताट दखूत भाऊरायानी वाट
भाऊ येत नहीं तव लागत नहीं मन
राखीबंधन वाटत नहीं सन
उना उना भाऊ उना त्याले वव्वायूत चला
शुभेच्छा गुफिनी त्याले राखी बांधूत ना !!
गोकुयआस्टमिले आपीन समदा व्हवूत गोया
जागरन करीसनी साजरा करूत कान्हाना जलम सोहया
आर्धी रातले किसनाना गुंता पायांना म्हनूत ना !!
उना उना कान्हा उना त्यान्हासंगे खेयूत चला
बायगोपायसना संगे आज करूत गोपायकाला
समदा समदा मिईसनी दहीहंडी फोडूत ना !!
या सर्जा राजा ना सन पोया
पोया करस समदा सन गोया
शेतकरी राजाना आननना सन बैलपोया
पूजा करीसनी बैलसले पुरनपोई खावू घाला
उपकार जानीनी सरजा राजाले पोयामा मिरावूत ना !!
सरावन उना सरावन उना !!

–विमल प्रकाश पाटकरी ,धुळे, मो.९०२८०५५९११

## तुझ्या दर्शनाची ओढ मला लागली

तुझ्या दर्शनाची ओढ मला लागली
सांग नां रे कोठे तुज पाहू
सांग नां रे कोठे तुज पाहू
विठ्ठला शरण कुणा जावू...।। धृ ।।
ताल सुरांचा गंध न मजला
मी गीत कोणते गावू
या नयनांच्या पापणी
किती कसे तुला साठवू.....।। १ ।।
भावप्रीतीचे शुभ्र वस्त्र हे
सांग कसे तुला नेसवू
तव चैतन्याचे दिव्य निरांजन
सांग कसे कुठे रे लावू.......।। २ ।।
अथांग माझी अविचल भक्ती
देवा कशी तुला रे दावू
जीव फुल हे सुकुनी जाता
कुठे कसे तुला रे वाहू............।।
३ ।।
एकच मनीषा पंढरीराया
नयनी तुझ्या रे राहू
घेवूनी जा रे तू भगवंता
मला ऋणी नको रे ठेवू....।। ४ ।।
जीवन माझे तृप्त जाहले
सांग रे कृपा किती मागू
दीनदयाळा सोडवी आता
अंत नको रे पाहू....... ।। ५ ।।
तुजवीण कोण सहारा
मी कुठे आसरा रे शोधू
तुच एक रे तारणहारी
अन्य कुणाला शरण जावू...

–वि.ग.सातपुते

# दोन छोटे रायडर्स आणि आजोबा

(पान ५ वरुन) ती आमच्या मैत्रीची पहिली छोटी वाट होती.

आजही कधी अंगणात त्या छोट्या बाइक दिसल्या की त्या दिवसांची आठवण होते. चैतन्य पहिला सावध प्रयत्न, चिन्मयचा बाइक झोपली आहे का? हा प्रश्न, चार्जिंगकडे टक लावून पाहण त्यांचे डोळे, स्विच शोधण्याची त्यांची धडपड आणि बाइक बंद पडली की माझ्याकडे धावत येण त्यांची पावले. सगळे काही कालच घडल्यासारखे वाटते. नातवंडे आपल्याकडून काही शिकता असे आपण नेहमी म्हणतो. पण खरं सांगायचं तर, आजोबा नातवंडांकडून त्याहून अधिक शिक असतात. ते शिकवतात कुतूहल जपायला. छोट्या गोष्टींत आनंद शोधायला. प्रश्न विचाराय चुकायला आणि पुन्हा प्रयत्न करायला. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आयुष्य कितीही पुढे गेले त मनाने बालपण जिवंत ठेवायला.

त्या दिवशी डायरीत मी फक्त एवढेच लिहिले होते

आज चैतन्य आणि चिन्मयने पहिल्यांदा बाइक चालवली. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहि आणि नकळत मीही पुन्हा एकदा लहान झालो.

कदाचित म्हणूनच आजोबा आणि नातवंडांचे नाते इतके सुंदर असते.

नातवंडे आजोबांकडून रस्ता शिकतात

आणि आजोबा नातवंडांकडून पुन्हा एकदा जगण्याचा आनंद शिकतात.

# मराठी भाषेच्या वैभवाचे जनक

(पान ३ वरुन) यांना छ. शिवाजी महाराजांनी साहित्य क्षेत्रात प्रवृत्त केले व पुढे संभाजी महाराजांनी अतिशय उत्कृष्ठ असे महान ग्रंथ लिहिले. छत्रपती संभाजी महाराज आठ भाषेवर प्रभुत्व होते. त्यांनी बुधभूषणम, नायिकाभेद, नखशिख, सातसतक असे श्रेष्ठ ग्रंथ लिहिले. त्यांनी संस्कृतमध्ये एक प्रदीर्घ दानपत्र लिहिले आहे. हे दानपत्र म्हणजे छत्रप संभाजी महाराजांचे थोडक्यात आत्मचरित्र आहे. छत्रपतींनी मराठी भाषेच्या समृध्दीसाठी वि रायगडावरती भीमाजी पारेखच्या मदतीने छापखाना सुरू केला. छापखान्यांना तेव्हा लिहि मंडप असे म्हटले जात असे. किल्ले रायगडावरती विवेकसभा नावाची एक सुंदर वास्तू हो या विवेकसभेमध्ये जाणकार शास्त्रज्ञांचा परामर्श घेण्यासाठी आणि विचारविनिमय करण्यासा ज्ञानाची देवाण-घेवाण करण्यासाठी ही विवेकसभा श्रेष्ठ होती. बाहेरून आलेल्या विद्वान, क यांच्या बरोबर छत्रपती येथे विचारविनियमय करीत असत. मराठी भाषेच्या समृध्दीच्या प्रगतीच्या दृष्टीने छत्रपतींचा कालखंड अत्यंत महत्वाचा आहे. मराठी भाषेचा प्रसार, प्रच जतन, विकास व संवर्धन करून तिला श्रेष्ठ बनविले. महाराजांनी मराठी भाषेला श्रेष्ठ दर्जा सर्व प्रकारच्या व्यवहारांच्या भाषेसाठी मराठी भाषेला सन्मान देऊन समृध्द व प्रगल्भ बनविल आज मराठी भाषेचा झेंडा सातासमुद्रापार फडकला असुन ती मोठ्या गौरवाने अभिजात भा म्हणून मिरवली जात आहे. हे छत्रपतींच्या समृध्द मराठी भाषिक धोरणाचे फळ आहे.

## आरोग्यम् धनसंपदा

डॉ.नितिन जाधव
संजीवन चिकित्सक, डोंबिवली
९८९२३०६०९२.

# मानेच्या मणक्याचा स्पाँडिलायसीस

संधी म्हणजे दोन अवयवयांना सांधणारे अवयव. पण यात वात झाला किंवा चुकीच्या पद्धतीने हलचाल झाली की त्या अवयवाची पुरती बोंब लागते. कधीकधी हे आयुष्यभराचे दुखणे होते. त्यात स्पाँडिलायसीस झाले की संपलेच सगळे. उठता बसता मानेवर, पाठीवर कुत्र्याचा पट्टा बांधल्यासारखा पट्टा बांधावा लागतो. पण हा आजार नेमका कसा होतो आणि त्यावर उपचार काय आहेत हे आपण आज जाणून घेऊया.

घर्षणाने जीर्णशीर्ण झालेला वयोमानाने उद्भवणारा मानेचा आजार म्हणजेच सर्व्हायकल स्पाँडिलायसीस. सर्वप्रथम हा आजार सुरू होताना दोन मणक्यांच्या मध्ये असणारी गादी (डिस्क)मधील पाण्याचे प्रमाण कमी होण्यास सुरू होते. त्यामुळे त्यातील असणारे कार्टीलेज मणक्याच्या बाहेर निघून मज्जारज्जूवर दबाव टाकायला सुरुवात करते. अगोदरच मज्जारज्जू हा मणक्यातील एका छोट्या कॅनेलमधून कंबरेपर्यंत खाली गेलेला असतो. त्यावर मणक्यातून ही गादी सरकल्यामुळे मान दुखणे व त्याच प्रमाणे एक किंवा दोन्ही हातांमध्ये वेदना होणे, हातांमध्ये मुंग्या येणे व सुन्नपणा येणे अशी लक्षणे दिसून येतात.

गादी सरकण्याची (स्लीप डिस्क) कारणे

*अचानक मानेला झटका लागणे. * स्थूलपणा * मणक्याला झालेला अपघात * मानेला असलेला ताण * वयोमानानुसार मणक्यांची झीज *अचानक वजन उचलण्यामुळे व *मणक्यातील सरकलेली गादी

आजारातील लक्षणे : कंबरेचे स्नायू खूप जास्त खेचलेले असतात.नजिकच्या भूतकाळात रोग्याने खूप वजन उचललेले असते.अति खोकल्यानेही हा आजार उद्भवू शकतो.अचानक मान वाकडी करणे अथवा मानेला झटका बसणे.




वेदना : साधारणतः मानेमध्ये किंवा कंबरेमध्ये. *मानेचे दुखणे डोक्याकडे, दोन्ही काखांकडे व हातापर्यंत सरकत जाते. *अशा प्रकारचे दुखणे असह्य असते. *वेगवेगळ्या प्रकारच्या हालचाली खोकणे, शिंकणे, चालणे किंवा समोर * झुकणे यामुळे या प्रकारचे दुखणे वाढू शकते. * आराम केल्याने वेदना कमी होतात. * हातामध्ये किंवा पायामध्ये मुंग्या येतात किंवा सुन्नपणा येतो.

तपासण्या : मानेची क्ष-किरण तपासणी

सिटी स्कॅन- एम.आर.आय. स्कॅन. ही अतिशय महत्वाची तपासणी असून आपल्याला गादी किती सरकली आहे याची कल्पना येते. त्याचप्रमाणे मानेपासून हातांमध्ये येणाऱ्या दबावाचे किती प्रमाण आहे हे या तपासणीत नमूद होते.

उपचार : साधारणतः ८ ते १२ आठवडे पूर्ण आराम करावा लागतो. शक्यतो हाडासारखा कडक भाग झोपण्यास घ्यावा. अतिशय तीव्र स्वरुपाच्या आजारामध्ये डोक्याला ट्रॅक्शन लावून फिजियोथेरपी करता येते.

मानेचा सांधा जोडणे : ही मानेच्या मणक्यातील शस्त्रक्रिया असून मणक्यातील सरकलेली गादी काढून टाकण्यात येते. ही शस्त्रक्रिया साधारणतः समोरून मानेकडे केली जाते. या शस्त्रक्रियेमध्ये बरेचदा दुर्बिणीचा वापरही केला जातो. दबाव निघाल्यानंतर दोन मणक्यांच्यामध्ये हाडांचा तुकडा किंवा कृत्रिम केज बसवली जाते व वरच्या आणि खालच्या मणक्यांना प्लेट आणि स्क्रूच्या सहाय्याने बांधले जाते. यालाच सर्व्हायवल फ्युजनही म्हणतात. पण ही शस्त्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक करावी लागते. आजच्या घडीला या आजारासाठी सर्वात नवीन उपचार पद्धती आहे. यामध्ये दोन मणक्यांच्या मध्ये सरकलेल्या गादीच्या जागी कृत्रिम सांध्याचे प्रत्यारोपण केले जाते. अशा प्रकारचा सांधा दोन मणक्यांच्यामध्ये टाकल्यामुळे मानेच्या सर्व प्रकारच्या हालचाली योग्य प्रकारे होत राहतात. त्यामुळे मणके एक दुसऱ्यांना बांधण्याची गरज राहत नाही. त्याचप्रमाणे मणक्याच्या मध्ये हाडाचे तुकडे किंवा प्लेट व स्क्रू वापरायची गरज लागत नाही. पण ही उपचार पद्धती अशा प्रकारे अशाच व्यक्तींना वापरण्यात येते. ज्यांना खूप जास्त शारीरिक हालचाल करण्याची गरज भासते.

मानेच्या सर्व प्रकारचे हालचाली व्यवस्थित राहतात.आजूबाजूच्या मणक्यांशी कमी घर्षण होते.बोन ग्राफिटींगची गरज लागत नाही.ऑपरेशनच्या नंतर दुसऱ्या तिसऱ्या दिवसापासून मानेची हालचाल सुरू होते.आपले सामान्य आयुष्य लवकरात लवकर सुरू करता येते. तेव्हा मानेच्या या आजारामध्ये सर्व्हायकल डिस्क रिप्लेसमेंट ही उाची सर्वात अभिमत उपचार पद्धती असण्यास हरकत नाही.

# गणेशोत्सवाचे बदलते स्वरूप

(पान १ वरुन) राहणे. म्हणून यावर्षी गणरायाला एक वेगळे वचन देऊ या

**उत्सव मोठा करू, पण आवाज नाही;**
**सजावट भव्य करू, पण दिखावा नाही;**
**कार्यक्रम भरपूर करू, पण केवळ मनोरंजन नाही;**
**गणेशोत्सव साजरा करू,**
**पण त्याची संस्कृती विसरून नाही!**

गणरायाचे आगमन आपल्या जीवनात आनंद, ज्ञान, विवेक, एकता आणि सकारात्मक विचार घेऊन येवो. आपल्या पुढच्या पिढीला आपण असा गणेशोत्सव देऊ या, ज्याची आठवण त्यांना मोबाईलच्या कॅमेऱ्यातील छायाचित्रांमुळे नव्हे, तर मनात जपलेल्या सुंदर संस्कारांमुळे आयुष्यभर राहील.

गणपती बाप्पा मोरया!

यावर्षी आम्हाला आमची संस्कृती, आमची परंपरा आणि आमचा सुंदर गणेशोत्सव पुन्हा आठवून द्या! एक गाव – एक गणपती, एक शहर – एक गणपती! आज गणेशोत्सवाच्या निमित्ताने आणखी एका कल्पनेचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

**एक गाव, एक गणपती आणि एक शहर, एक गणपती!**

आज अनेक ठिकाणी अगदी प्रत्येक गल्लीत, चौकात, वसाहतीत स्वतंत्र गणपतीची स्थापना केली जाते. त्याऐवजी संपूर्ण गावाने किंवा शहराने एकत्र येऊन एका प्रशस्त मैदानावर एकच भव्य गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली तर गणेशोत्सवाचे स्वरूप निश्चितच अधिक व्यापक, भव्य आणि विधायक होऊ शकते.

संपूर्ण गावातील किंवा शहरातील नागरिकांनी एकत्र येऊन गणरायाची स्थापना करावी आणि त्या दहा दिवसांत सर्वांच्या सहभागातून विविध सांस्कृतिक, शैक्षणिक, मनोरंजनात्मक, सामाजिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित कार्यक्रम आयोजित करावेत. मुलांसाठी वक्तृत्व, निबंध, चित्रकला, प्रश्नमंजुषा व वाचन स्पर्धा; तरुणांसाठी क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम; महिलांसाठी विविध कार्यक्रम; ज्येष्ठांसाठी अनुभवकथन व संवाद; तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, आरोग्य, संविधान, इतिहास आणि समाजप्रबोधनावर व्याख्याने आयोजित करता येतील. संपूर्ण गावाचा उत्सव एकाच ठिकाणी भरल्यामुळे आपलेपणा वाढेल, खर्चात बचत होईल, अनाठायी स्पर्धेला आळा बसेल आणि गावातील प्रत्येक कुटुंब या उत्सवाचे एक कुटुंब बनेल.

गणरायाच्या चरणी जमा होणारा निधी केवळ सजावट आणि रोषणाईवर खर्च करण्याऐवजी त्यातून गावासाठी एखादे कायमस्वरूपी विधायक काम उभे करता येईलग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, वृक्षारोपण, पाण्याची व्यवस्था, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत किंवा एखादा सामाजिक उपक्रम. अशा पद्धतीने एक गाव – एक गणपती ही संकल्पना केवळ गणेशोत्सवाची पद्धत बदलणारी नव्हे, तर गावाच्या विकासाची आणि सामाजिक एकतेची चळवळ ठरू शकते. आजच्या आधुनिक युगात खऱ्या अर्थाने आधुनिक गणेशोत्सव म्हणजे मोठा आवाज नव्हे, तर मोठा विचार; मोठी रोषणाई नव्हे, तर मोठी सामाजिक जाणीव; मोठी मूर्ती नव्हे, तर मोठे मन! म्हणूनच एक गाव – एक गणपती, एक शहर – एक गणपती ही संकल्पना आपण मनापासून स्वीकारली तर गणरायाच्या उत्सवाला भक्तीबरोबरच एकता, ज्ञान, संस्कृती, आधुनिकता आणि विकासाची नवी दिशा मिळू शकते.

**डीजे असावा, पण आवाज आणि प्रकाशाला मर्यादा असावी!**

गणेशोत्सवात डीजेचा वापर करायचाच असेल, तर त्याला पूर्णपणे विरोध करण्यापेक्षा त्याचा संयमित आणि जबाबदार वापर करण्याचा विचार करायला हवा. संगीत आणि जल्लोष हा उत्सवाचा आनंदाचा भाग आहे; मात्र त्या आनंदाची किंमत इतरांच्या आरोग्याला मोजावी लागू नये. डीजेचा आवाज मर्यादेपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढवून कानठळ्या बसवणारा कर्णकर्कश आवाज करणे योग्य नाही. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि परिसरातील नागरिक यांना त्याचा मोठा त्रास होऊ शकतो. त्याचप्रमाणे डीजेसोबत वापरले जाणारे अत्यंत तीव्र लेझर किरण डोळ्यांवर थेट किंवा दीर्घकाळ पडणार नाहीत, याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तीव्र लेझर प्रकाशामुळे डोळ्यांना गंभीर इजा होण्याचा धोका असू शकतो. त्यामुळे उत्सवाचा आनंद घेताना आरोग्य आणि सुरक्षिततेची जबाबदारीही आपलीच आहे. डीजे लावायचाच असेल तर तो नियंत्रित आवाजात, योग्य वेळेत आणि सुरक्षित प्रकाशयोजनेसह लावू या. कारण गणरायाला मोठा आवाज नव्हे, तर भक्तीचा नाद प्रिय आहे; डोळे दिपवणारी रोषणाई नव्हे, तर आपल्या मनातील श्रद्धेचा प्रकाश महत्त्वाचा आहे. आपला उत्सव असा असावा की आपण आनंद घ्यावा आणि आपल्या आनंदामुळे दुसऱ्याला त्रास होऊ नयेहीच खरी गणेशभक्ती!



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी जलद गतीचा आहे. तुमच्या कामात तुम्हाला नवीन संकल्पना सुचतील. थोडे मतभेद आणि वादविवाद देखील संभवतात पण एकुणात परिस्थीत चांगली राहील. इतरांसमोर तुमचं बुद्धीचातुर्य उठून दिसेल. तुम्हाला हवी असलेली बातमी मिळेल, किंवा हवी असलेली व्यक्ती भेटेल. एखादा प्रवास घडेल. या आठवड्यात तुम्ही अतिशय प्रामाणिकपणा जपण्याची गरज आहे. रोखठोक वागा, भावनांना बळी पडू नका. संवाद कौशल्यात सुधारणा करा. वाचन, लेखन यासारख्या गोष्टींत मन रमवा. फक्त लहान तोंडी मोठा घास घेऊ नका!

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी बऱ्याच गोष्टी एकाच वेळी घेऊन येणार आहे. त्यामुळे तुमची तारांबळ उडू शकते. तुम्हाला ओझं वाहून नेत असल्याप्रमाणे वाटू शकतं. एक प्रकारचं दडपण आणि ताण येऊ शकतो. पण हा शेवटचा टप्पा आहे हे लक्षात ठेवा! या आठवड्यात तुम्ही अनेक गोष्टी स्वतःवर ओढवून घेऊ नका, त्याचा तुम्हाला त्रास होऊ शकतो. मान, पाठ, डोकं आणि डोळे यांच्याकडे लक्ष द्या. जेव्हा तुम्हाला वाटत असेल तेव्हा मदत नक्की मागा. जगात अजून मदत करणारी चांगली माणसं आहेत यावर विश्वास ठेवा!

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे कारण तुमच्या समोर अशी परिस्थिती येईल जिथे तुमच्या धैर्याचा आणि संयमाचा कस लागेल. तुम्हाला हव्या तशा वेगाने गोष्टी घडणार नाहीत. जे मिळायला हवे, त्यात काहीतरी कमी राहू शकते. तुम्हाला मध्यस्ती करावी लागू शकते. गरजेपुरते काम भागेल. मध्यम फलदायी असा हा सप्ताह राहील. या आठवड्यात तुम्ही धैर्य ठेवा, संयम ठेवा, मन शांत ठेवा. कोणत्याही प्रसंगात मध्यम मार्ग निवडा. संथ गतीने वाटचाल करा, घाई गडबड करू नका. सगळ्या पसाऱ्यातून चांगलं काय ते निवडा. इतरांना मदत करा त्यातून तुम्हाला समाधान मिळेल!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन ऊर्जा घेऊन येत आहे. तुमच्यातील जिद्द, धाडस, काहीतरी करून दाखवण्याची वृत्ती, या सगळ्यांचा उपयोग करुन तुम्हाला हवं असलेलं काहीतरी मिळण्याची शक्यता आहे. सकारात्मक घटना घडतील. इतरांकडून मान सन्मान आणि सहकार्य मिळेल. लोकांना तुमचा सहवास आवडेल. या आठवड्यात तुम्ही काहीही झालं तरी खचून जाऊ नका. सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. लढण्याची वृत्ती ठेवा पण कोणाशी विनाकारण भांडू नका. आत्मविश्वास, प्रसंगावधान आणि खेळाडू वृत्ती ठेवा. चांगले नेतृत्व करा.

**२३ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट**

**वृषभ सिंह वृश्चिक**
**या राशींना लाल थांबा**
**मेष मिथुन कन्या तूळ मीन**
**या राशींना पिवळा दिवा**
**कर्क धनू मकर कुंभ**
**या राशींना हिरवा झेंडा**



**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या वळणाचा आहे. एक प्रकारे विरक्ती आणणारा हा काळ असू शकतो. कष्टाचे हवे तसे फळ मिळणार नाही. विलंब होईल. पण यामुळेच तुम्ही अंतर्मुख व्हाल आणि नवीन मार्ग सापडेल! परिस्थितीचा स्वीकार करुन आनंदाने मार्गक्रमण कराल. निरस व्हाल पण निराश नाही! स्वार्थ सोडून परमार्थाचा विचार येईल. या आठवड्यात तुम्ही विवेकबुद्धी आणि धीराने वागा. आत्मोन्नतीचा मार्ग शोधा. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका, त्या पूर्ण होणार नाहीत. भौतिक पसाऱ्यातून स्वतःला थोडे अलिप्त करून बघा. एकांतात वेळ घालवा.

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावनांचे प्राधान्य घेऊन येत आहे. घरात किंवा नोकरीमध्ये लोकांचा प्रभाव राहील. समजून घेणारे लोक भेटतील. तुमच्या कलेला वाव मिळेल. काही प्रमाणात राजकारण घडू शकतं. कामामध्ये एक प्रकारचा टप्पा गाठला जाईल. या आठवड्यात तुम्हाला तुमचं वागणं बोलणं चांगलं आणि सुसंस्कृत ठेवण्याची गरज आहे. ऐकावं जनाचं करावं मनाचं, याप्रमाणे वागा. मोठ्यांसमोर नमतं घ्या. कोणालाही हिणवू नका. कोणा अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. तुमच्या जवळच्या व्यक्तींची चांगली काळजी घ्या!

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक नवीन सुरुवात घेऊन येत आहे. कामामध्ये संथ पण आश्वासक अशी वाटचाल होईल. आर्थिक दृष्ट्या हा काळ तुमच्यासाठी सकारात्मक आहे. समाधानकारक उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबात, आरोग्यात, कामात स्थैर्य लाभेल. या आठवड्यात तुम्ही काहीतरी नवीन शिकण्यासाठी तयार रहा. येणाऱ्या संधीचे सोने करुन घ्या. मुंगी होऊन साखर खाऊन घ्या. आर्थिक गुंतवणूक विश्वासार्ह ठिकाणी करु शकता. लहान गोष्टींमध्ये आनंद माना. आकाशात उडायचे असेल तर आधी पाय जमिनीवर ठेवावे लागतात हे विसरु नका.

**वृश्चिक:**हा सप्ताह तुमच्यासाठी संभ्रम आणि शंका निर्माण करणारा ठरु शकतो. तुमचा स्वतः वरचा विश्वास कमी होऊ शकतो. इतरांनी तुमच्या डोक्यात काहीतरी घातले तर तुम्ही पूर्णपणे त्यांच्या प्रभावाखाली राहाल अशी शक्यता दिसते आहे. पण स्वतःला मजबूत ठेवले, मन भक्कम ठेवले तर हा सप्ताह तुमच्यातील कलेला, सृजशीलतेला वाव देणारा ठरेल! या आठवड्यात तुम्ही मनावर ताबा ठेवण्याची गरज आहे. मनाप्रमाणे वागता वागता तुम्ही वाहवत तर जात नाही ना याकडे लक्ष द्या. ध्यान मेडीटेशन प्रार्थना करा.

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी निवांत वेळ घेऊन येत आहे. तुमच्या आवडीचं काहीतरी करु शकाल. एखादा आनंदाचा कार्यक्रम होईल. मागे केलेल्या कष्टाचे फळ काही प्रमाणात मिळेल. लहानसा उत्सव साजरा कराल. समारंभामध्ये सहभागी व्हाल किंवा तुम्ही स्वतः तुमच्या आवडीच्या लोकांशी भेटी होतील. एकमेकांना सहाय्य कराल. तब्येत सुधारेल. या आठवडयात तुम्ही एकटे राहू नका, लोकांना भेटायला जा. मन मोकळे हसा आणि मन मोकळे बोला. लोकांचे मत जाणून घ्या, त्यांना बोलतं करा. तुमच्या जवळच्या माणसांशी आवर्जून संवाद साधा. स्वार्थबुद्धी सोडा.

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी लोकांकडून मदत आणि पाठिंबा घेऊन येत आहे. इतरांवर अवलंबून असलेली कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे. जुने मित्र किंवा नातेवाईक, मदतीसाठी तयार असणारे सज्जन लोक तुम्हाला भेटतील. एखादी लहान भेटवस्तू मिळेल. या आठवड्यात तुम्ही लोकांशी सलोखा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा. तुमच्या जवळच्या माणसांना तुमचं म्हणणं मोकळेपणाने सांगा, त्याने तुमचं नातं घट्ट व्हायला मदत होईल. घरातल्यांसोबत निवांत वेळ घालवा. जुन्या आठवणी ताज्या करा. मन जिंकून जग जिंका.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी इच्छापूर्तीचा असणार आहे! एखाद्या कामाचा मोबदला चांगला मिळेल. एखादी अपेक्षित घटना घडेल. एखादा लाभ नक्की होईल. मागच्या दुःखावर सुखाची फुंकर घालणारा हा काळ आहे. नातेसंबंधांमध्ये सुधारणा होईल. कलेला प्रोत्साहन मिळेल. या आठवड्यात तुमच्याकडून कळत नकळत स्वार्थी वागणूक होऊ शकते त्यामुळे ते लक्षपूर्वक टाळा. कुटुंबामध्ये एकोप्याने वागा. तुम्हाला आवडत असणाऱ्या गोष्टीसाठी वेळ काढा. कुठल्या नात्यात वितुष्ट आलं असेल तर ते दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा!

मीन: हा सप्ताह तुमच्यासाठी अधिकाराचा आणि वर्चस्वाचा असणार आहे. तुम्ही करत असलेले काम मोठे होईल. विस्तार होईल. तुम्हाला एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. बऱ्याच गोष्टींची सूत्रे तुमच्या हातात असतील. त्यामुळे तुम्हाला जबाबदारीने वागण्याची गरज आहे. वडील किंवा मोठ्या आदरणीय व्यक्तींचा दबदबा राहील. या आठवड्यात तुमचा आत्मविश्वास बळावेल. पण अती विश्वास, अभिमान, गर्व हे तुम्हाला बाधक ठरु शकतात. म्हणून पाय जमिनीवर ठेवा. सामर्थ्यवान अशी एखादी सुरुवात करा.

# शिरपूर पॅटर्नच्या बंधाऱ्याचे आंबे गावाजवळ भूमिपूजन सुतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांची उपस्थिती

**शिरपूर, दि.५- शिरपूर तालुक्यात जलसंधारणाच्या माध्यमातून शेतीला शाश्वत पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी सुरू असलेल्या शिरपूर पॅटर्नच्या कार्यात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे. आंबे गावाजवळ शिरपूर पॅटर्नच्या ४७२ व्या बंधाऱ्याचे भूमिपूजन प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.**

माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १५ वर्षांपासून शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून तालुक्यात जलसंधारणाची विविध कामे सातत्याने राबविण्यात येत आहेत. पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि शेतकऱ्यांना शेतीसाठी अधिकाधिक पाणी उपलब्ध करून देणे, या उद्देशाने या उपक्रमाची वाटचाल सुरू आहे. आतापर्यंत या माध्यमातून ४७१ बंधारे उभारण्यात आले असून, आता आंबे गावाजवळ ४७२ व्या बंधाऱ्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.



यावेळी माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, सुभाष कुळकर्णी, आर. आर. माळी, शिरपूर पॅटर्न प्रकल्प संचालक टी. आर. दोरीक, आंबे गावचे सरपंच प्रितम पावरा, गेंदराम पावरा, ईदला पावरा, रमेश पावरा, बिरसिंग पावरा, ग्रामस्थ काशिराम जाण्या पावरा, चत्तरसिंग पावरा, गणेश माळी, कृष्णा पावरा यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

शिरपूर पॅटर्नमुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलसंधारणाला चालना मिळाली असून, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट झाले आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा जास्तीत जास्त उपयोग परिसरातील शेतीसाठी व्हावा, तसेच भूजलसाठ्यात वाढ व्हावी, यासाठी बंधाऱ्यांची उभारणी करण्यात येत आहे.

**पुढील पिढीसाठी पाण्याची मोठी तरतूद :**

यावेळी बोलताना सुभाषदादा कुळकर्णी यांनी शिरपूर पॅटर्नच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, शिरपूर पॅटर्न हा केवळ बंधारे बांधण्याचा प्रकल्प नसून पुढील पिढीसाठी केलेली मोठी तरतूद आहे. आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पुढील पिढीलाही शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडावा, या ध्येयाने आमदार अमरिशभाई पटेल अत्यंत आत्मीयतेने काम करीत आहेत.

जलसंधारणाची कामे ही भविष्यातील शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, पाण्याची उपलब्धता वाढल्यास शेतकऱ्यांना शेतीमध्ये अधिक स्थैर्य मिळण्यास मदत होईल. त्यामुळे शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून सुरू असलेली ही कामे तालुक्याच्या कृषी विकासासाठी दीर्घकालीन दृष्टीने उपयुक्त ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**बंधाऱ्याच्या मातीचा पाणंद रस्त्यासाठी उपयोग :**

या बंधाऱ्याच्या कामातून निघणाऱ्या मातीचा उपयोग परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात जाणाऱ्या पाणंद रस्त्यांसाठी करण्यात येणार असल्याची माहिती शिरपूर पॅटर्नचे प्रकल्प संचालक टी. आर. दोरीक यांनी दिली.

बंधाऱ्याच्या कामातून उपलब्ध होणाऱ्या मातीचा योग्य पद्धतीने वापर करून पाणंद रस्ते अधिक सुकर करण्यात येणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा दुहेरी फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना आपली वाहने थेट शेतापर्यंत नेता येतील. त्यामुळे शेतीमालाची वाहतूक, शेतीसाठी लागणारे साहित्य ने-आण तसेच दैनंदिन शेतीची कामे अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

**ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग :**

भूमिपूजन सोहळ्यावेळी आंबे परिसरातील ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. जलसंधारणाच्या या कामामुळे परिसरातील शेतीला भविष्यात फायदा होण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आली. शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे सातत्याने सुरू असल्याने पाणी अडविणे, पाणी जमिनीत मुरविणे आणि शेतीला त्याचा लाभ मिळवून देणे या उद्देशाला अधिक बळ मिळत आहे. आंबे गावाजवळील व्या बंधाऱ्यामुळे परिसरातील जलसंधारणाच्या प्रयत्नांना आणखी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रिमझिम गिरे सावनच्या सुरांनी नंदुरबारकर चिंब पावसाळी फिल्म गीत गायन कार्यक्रम उत्साहात संपन्न




**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- कल्चरल फाउंडेशन, नंदुरबारतर्फे रिमझिम गिरे सावन या पावसाळी फिल्म गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन डी. आर. हायस्कूल जिमखाना हॉल येथे करण्यात आले. यावेळी नवोदित तसेच अनुभवी कलाकारांनी सादर केलेल्या तब्बल ३० गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. गाण्यांच्या सुरांची जणू पावसाची सरच रसिकांवर कोसळत होती. रसिक प्रेक्षक या सुरेल वर्षावात अक्षरशः चिंब झाले.**

कार्यक्रमाची सुरुवात पल्लवी कुलकर्णी यांनी रिमझिम गिरे सावन या गीताने केली. त्यानंतर किरण वाणी यांनी आनेके उसके आये बहार हे सुपरिचित गीत सादर केले. दीप्ती शिवदे यांनी अधीर मन झाले, तर जितेंद्र खवळे यांनी लागी आज सावन की फिर वो झडी रे हे गीत सादर केले. प्रा. नरेंद्र मराठे यांनी सुहानी चांदनी रातें हमें सोने नहीं देती या गीताने वातावरण सुरेल केले.

राकेश कलाल यांनी रिमझिम धून, तर प्रतिभा कुलकर्णी यांनी निंदिया से जागी बहार हे गीत सादर केले. रमाकांत पाटील यांनी डम डम डिगा डिगा, तर भारती मोरावकर यांनी इस दुनिया में जीना हो तो हे गीत गायले. दुर्गेश वैष्णव व रचना निकम यांनी आया सावन झूम के हे गीत सादर केले. चंपालाल चौधरी व मनीषा माळी यांनी इन हसीन वादियों में या गीताने रसिकांची दाद मिळवली.

डॉ. संदीप बोरसे व वैभवी बोरसे यांनी निशाणा तुला दिसला ना हे सुंदर गीत सादर करताना स्टेजवर नृत्याचीही जोड दिली. त्यांच्या या उत्स्फूर्त सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली. रणजित राजपूत व वंदना राजपूत यांनी जिंदगी की ना टूटे लड़ी हे गीत सादर केले. जान्हवी वळवी व यश दलाल यांनी टिप टिप बरसा पानी हे नवीन गीत सादर केले.

शुभांगणी देवकर व प्रवीण पाटील यांनी मी डोलकर दर्याचा राजा हे लोकप्रिय कोळीगीत सादर केले. मुकेश यांनी गायलेले बरखा रानी तू जमके बरसो हे गीत रवी सूर्यवंशी यांनी सुंदरपणे सादर केले. रवी सूर्यवंशी व मीनल म्हसावंदकर यांनी रिमझिम रिमझिम हे गीत सादर केले. सुभाष व भारती मोरावकर यांनी झिलमिल सितारों का हे गीत गायले. राजेंद्र विसपुते व प्रेमलता भावसार यांनी कुछ कहता है ये सावन हे गीत सादर केले.

याशिवाय अंजनी राणे, निशा जैस्वाल यांच्यासह अनेक कलाकारांनी विविध गीते सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमाला डॉ. नरेंद्र गोसावी, डॉ. राहुल मेघे, डॉ. दीपक अंधारे, राम दाउतखाने, चंद्रशेखर चौहान, कैलास मराठे, प्रा. डॉ. कदम, मधुकर शेवाळे, विजय पवार, राज व मीनल जमीनदार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमातील सर्व कलाकारांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन धर्मेंद्र भारती यांनी केले, तर आभार श्रीराम मोडक यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंपालाल चौधरी यांनी संगीताची साथ दिली.

**झाडे लावा झाडे जगवा**

# धुळे शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा दोघांची सैन्यदलात अधिकारीपदी निवड

**धुळे, दि.५- धुळे तालुक्यातील नंदाणे येथील रहिवासी पंकज बाविस्कर व चावशी (ता. अंमळनेर) येथील रहिवासी व कापडणे येथे आजोळ असणारे मयूर पाटील या दोन्ही शेतकरी कुटूंबातील युवकांची भारतीय सैन्य दलात अधिकारी बनण्यासाठी निवड झाली आहे.**



ऑफिसर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, चेन्नई (तामिळनाडू) येथे पंकज बाविस्कर व ऑफिसर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, गया (बिहार) येथे मयूर पाटील यांची वर्षभराच्या खडतर प्रशिक्षणानंतर नौदलात अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

अरुणाचल प्रदेश येथे कार्यरत असलेल्या व सध्या रजेवर आलेल्या लेफ्टनंट सलोनी बोरसे यांच्या निवासस्थानी या युवकांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी कर्नल (रिटा) उत्तम पाटील व त्यांच्या धर्मपत्नी मीनाक्षी पाटील, लेफ्ट. सलोनी बोरसे यांच्या सह नौदलात कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांचे पालक, नौदलाचे निवृत्त नाईक कैलास माळी, सुनीता माळी, अनिता व हिरालाल पाटील, कमला व सुरेश जाधव, मनिषा व सतीश कोठावदे, रिटा व सुकलाल बोरसे, विद्या व अनिल खंडेलवाल, रिशिका पाटील, डॉली बोरसे व भूमी खंडेलवाल हे उपस्थित होते.

सत्कार प्रसंगी दोन्ही युवकांचे पालक रंजना व राजेंद्र बाविस्कर, सुनीता व सूर्यकांत पाटील यांचे आनंदाश्रु अनावर झाले.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना कर्नल (रिटा) पाटील व लेफ्ट. बोरसे यांनी सांगितले की, भविष्यात नौदलात अधिकारी बनू इच्छिणाऱ्या युवक-युवतींना आमच्या मार्फत मोफत मार्गदर्शन व सहकार्य केले जाईल याचा लाभ घ्यावा. दोन्ही प्रशिक्षणार्थी युवकांना प्रशिक्षण दरम्यान येणाऱ्या आव्हानांवर व त्यावरील उपाय बाबतीत मार्गदर्शनही केले.

या दोन्ही युवकांच्या निवडीबद्दल जिल्हाभरातून कौतुक होत आहे.



# बेटावद परिसरात पावसाची दडी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान

**बेटावद, दि.५- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद व परिसरातील सर्व ठिकाणी महिन्याभरापासून पावसाची दडी मारल्याने व ढगाळ वातावरण असल्यामुळे कापूस, मका, बाजरी, ज्वारी, मुग आदी पिकांच्या मोठ्या प्रमाणात व उत्पन्नात घट तसेच नुकसान झाले आहे.**

याबाबत वृत्त असे की, बेटावद परिसरातील गेल्या महिनाभरापासून पावसाने दांडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असल्यामुळे पावसाअभावी जमिनीवरील ओलावा झपाट्याने कमी होत असून ढगाळ वातावरण मुळे उत्पन्नात घट होत असताना शेतकऱ्याचे वादळी चर्चा सुरू आहे तसेच कापूस, मका, बाजरी, ज्वारी, मुग या पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घटल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत आलेला असून केलेला खर्च सुद्धा निघाला नाही यावर शेतकऱ्याची मोठी चर्चा सुरू आहे तसेच इतर पिकं याच्या मोठा नुकसानीच्या सामना करावा लागणार आहे अशीही शेतकरी वर्ग कडून चर्चा सुरू आहे यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी केली बियाणे खते औषधी अशा महागड्या वस्तू शेतकरी टाकत असून त्यावर मशागत व मजुरीसाठी झालेला मोठा खर्च केल्यानंतर सुरुवातीला पिकाची परिस्थिती समाधानकारक होती मात्र गेल्या महिन्याभरापासून पावसाने पाठ फिरवून वातावरण ढगाळ झाल्यामुळे पिकांना आवश्यक असलेले ओलावा तसेच काही ठिकाणी पिकांची वाढ फुटल्याची शक्यता निर्माण झाली असून कापूस पिकाला मोठा फटका बसला आहे कापूस पिकाच्या वाढीवर महत्त्वाच्या टप्प्यात पावसाच्या मोठा खंड पडल्याने झाडाची वाढ मंदावली असून उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहे तसेच मका ज्वारी बाजरी मूग आदी पिकांनाही पावसाची नितांत गरज असून पावसाअभावी लांबलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतकरी चिंता व्यक्त करी त आहे तसेच मका बाजरी ज्वारी मुग आधी पिकांनाही पावसाची नितांत गरज असून पाऊस आणखी लाभल्यास उत्पादन काही येणार नाही असे शेतकरी वर्ग कडून चर्चिले जात आहे या शेतकरी कडे सिंचनाची सुविधा असते तरी ढगाळ वातावरणामुळे पिकांना मोठे नुकसान होत असते म्हणून पाणी असूनही शेतकरी वर्ग हा चिंतेत आहे.

# जि.ग्राहक आयोगात मेडिएशन सेल कार्यान्वित करा; मुख्यमंत्र्यांना निवेदन

**धुळे, दि.५- ग्राहकांना जलद गतीने न्याय मिळावा, त्यांचा वेळ व पैशांची बचत व्हावी यासाठी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ मधील तरतुदींनुसार राज्यातील सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये मेडिएशन सेल (मध्यस्थी केंद्र) तत्काळ कार्यान्वित करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी मग्राहक पंचायत महाराष्ट्रफ धुळे जिल्हा शाखेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

निवेदनात नमूद केल्यानुसार, नवीन ग्राहक संरक्षण कायदा २०१९ मधील कलम ७४ ते ८१ अंतर्गत प्रत्येक जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग व राज्य आयोगात मेडिएशन सेल स्थापन करणे आणि मध्यस्थांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. या तरतुदीमुळे ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारी सामंजस्याने व तडजोडीने सोडवणे शक्य होणार आहे. शासनाने यापूर्वी प्रत्येक जिल्हा आयोगात मेडिएशन सेल स्थापन करण्याचे आदेश दिले होते आणि त्यानुसार कागदोपत्री प्रक्रिया झाली असली, तरी जिल्हा आयोगाच्या उदासीनतेमुळे प्रत्यक्ष मेडिएशन सेंटर कार्यान्वित झालेले नाहीत.

मेडिएशन सेल फक्त कागदावरच राहिल्याने राज्यातील लाखो ग्राहकांचे नुकसान होत असून, हजारो केसेस प्रलंबित पडल्या आहेत. त्यामुळे या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दल संघटनेने खेद व्यक्त केला आहे. राज्य सरकारने व राज्य आयोगाने या प्रकरणी लक्ष घालून दरमहा मेडिएशन सेलचा अहवाल मागवावा आणि महाराष्ट्रातील लाखो ग्राहकांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, विभागाचे सचिव, महाराष्ट्र राज्य ग्राहक वाद निवारण आयोगाचे अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (धुळे) चे अध्यक्ष व सचिव तसेच धुळे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांना माहिती व पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे धुळे शहर अध्यक्ष ॲड. चंद्रकांत येशीराव, जिल्हा उपाध्यक्ष जगदीश बोरसे, धुळे तालुका अध्यक्ष भास्कर पाटील, महानगर सचिव ईश्वर बारी, आशा वसईकर, सुवर्णा पाकड, नूतन सोनार, श्रद्धा कुलकर्णी, पुजा सोनवणे, मनिषा निंबाळकर, किशोर पाटील, निंबा पाटील, राकेश गाळणकर, दिग्विजय गाळणकर, उर्मिला बडगुजर आदी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे धुळे येथील स. नं. ४८८/१-१ पैकी, १) प्लॉट नं. १ यांस वि. सि. स. नं. १८२६९ चे एकूण क्षेत्र ६०३.७५ चौ. मी. यापैकी आमच्या मालकीचा दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र १८३ चौ. मी. चा बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस : ६ मी. रस्ता, पश्चिमेस : स. नं. ४८८/१ पैकी प्लॉट, उत्तरेस : याच प्लॉटचा उर्वरित भाग, दक्षिणेस : प्लॉट नं. १६, २) प्लॉट नं. १६ चे एूण क्षेत्र २११.५० चौ. मी. चा बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा पुर्वेस :६ मी. रस्ता, पश्चिमेस : स. नं. ४८८/१ पैकी प्लॉट, उत्तरेस : प्लॉट नं. १, दक्षिणेस : ६ मी. रस्ता, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील दोन्ही बखळ प्लॉट १) श्री. संतोष जगन्नाथ खंडेलवाल, २) सौ. अनिता संतोष खंडेलवाल रा.फ्लॅट नं. २२, ओमशांती नगर अपार्टमेंट,वैभव नगर, मालेगांव रोड, धुळे यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे.सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहे.

तरी तमाम लोकांना सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर दोन्ही बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहाराबाबत हरकत असल्यास,बखळ प्लॉटवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉट संबंधी कोणत्याही प्रकारचा न्यायलयात दावा न्यायप्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदा पावती, विक्री पावती, खरेदी खत करुन दिलेले असल्यास असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर दोन्ही बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे आशिल सदरहू दोन्ही बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ - धुळे, दि. ०५/०९/२०२६.

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग. नं.४ भांडी बाजार,कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे
मो.७७०९७७२७५७/७५८८८४१०७

## नावात बदल

शाळेच्या दाखल्यावरील नाव **बत्तीसा नाना आत्माराम** असे असून माझ्या नावात बदल झाला आहे. तरी यापुढे आधार कार्ड वरील नाव: **पाटील नाना आत्माराम** असे आहे. दोन्ही नावाचा व्यक्ती एकच आहे.
पत्ता : - रा.वायपूर ता. शिंदखेडा, जि. धुळे ४२४३०९
9527835627

**आपला महाराष्ट्र**
वाचकांना विनम्र सुचना

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे-१, कुमार नगर, महिंदळे शिवार ता. जि. धुळे येथील सि. स. नं. ५४११ चे क्षेत्र २४०.५० चौ.मी. सत्ता प्रकार अ यात बांधीव शिव साई अपार्टमेंट मधील ग्राऊंड फ्लोअर वरील बांधीव गाळा/दुकान नं. १ चे क्षेत्र १३.२१८ चौ. मी. बिल्टप एरिया यांसी षट:सिमा मंजूर बांधकाम नकाशा प्रमाणे. येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत श्री.दिलीप हासानंद बोधाणी रा.ब्लॉक नं. क्यु. २, रुम नं. २, कुमार नगर, साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे व बयाण्यापोटी रक्कम ही स्विकारली आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, कर्ज, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, कब्जापाावती, रक्कम देणे/घेणे, कोर्ट वाद इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी किंवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०४/०९/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व वित्तीय संस्था, बँक, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद परिशिष्टातील बखळ प्लॉट **श्री. धिरज शंकर कोके** रा. प्लॉट नं. १५, वैभव नगर, अर्थव अपार्टमेंट, जमनागिरी रोड, धुळे यांचे मालकी हक्काचा व ताबे उपभोगातील असून त्यांनी खालील परिशिष्ठातील चतु:सिमांकीत बखळ प्लॉट आमचे अशिलांना कायमस्वरुपी विक्री करण्याचा सौदा केलेला असून बेणे स्विकारलेले आहे.

तरी खालील नमूद परिशिष्टातील मिळकतीमध्ये कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क, व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र ८ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे,असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** मौजे लळींग ता. जि. धुळे येथील गट नं. ७३/१/२/३ पैकी प्लॉट नं. ३९ एकूण क्षेत्र १६५.०० चौ. मी. यापैकी आमचे अशिलास विक्री करण्याचा सौदा केला ते दक्षिणेकडील भागाचे अविभक्त क्षेत्र ८२.५० चौ.मी.बखळ प्लॉट यासी चतु:सिमा : पुर्वेस : ९ मी. रस्ता, पश्चिमेस : गट नं. ७२, दक्षिणेस : प्लॉट नं. ३८, उत्तरेस : याच प्लॉटचा उर्वरित भाग, ही जाहीर नोटीस दिली असे.कळावे.

दि. ०४/०९/२०२६.

**ॲड.सुभाष जी.विसपुते**
ॲडव्होकेट व नोटरी
६-अ, यशोदाई विशाल इस्टेट,
राष्ट्रवादी भवनजवळ, स्टेशन रोड,
धुळे मो.९७३०८ ०३५००

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ८४/१/२/अ यापैकी प्लॉट नं. ३२ चे क्षेत्र १५० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ३३, पश्चिमेस : प्लॉट नं. ३१, दक्षिणेस :रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. २६, येणे प्रमाणे वर्णनाची बाधीव घर व उर्वरित बखळ जागेसह मिळकत श्री. किशोर रामचंद्र शिरुडे रा. १७, इंदासिनी नगर, देवपूर, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल सौ. सविता पवन शिंदे रा. वडजाई ता. जि. धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहू मिळकतीस अनुषंगुन जळगांव जनता सह.बँक लि. शाखा धुळे चा कर्ज बोजा प्रलंबित आहे. तरी या व्यतिरिक्कत सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापाावती, रक्कम देणे/घेणे, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०५/०९/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**KHALID AKHTAR KHALIL AHMED**
MY NEW NAME IS
**KHALID AKHTAR KHALIL AHMAD ANSARI**
ADD- PLOT NO.22, GARIB NAWA NAGAR, KUBA MUSJID, DHULE-424001. MS.

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM
**NILOFARBI BINTE SK AKABAR KHATIK**
TO **NILOFAR BI SHARFUDDIN KHATIK**
ADD- 78, GULAB HAJI NAGAR, MASJID HASNAIN, VITA BHATTI, DHULE-424002.

## NAME CHANGE

My Old Name was
**YASMEEN JAVEDMIYA JAHAGIRDAR**
My correct & New Name is
**YASMEEN SHAUKATMIYA JAHGIRDAR**
ADD- GANDHI CHAUK, NEAR DISTRICT DHULE-424303 (M.S.)
FOR ALL PURPOSE.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस तसेच सरकारी, निमसरकारी, बँका, संस्था, पतसंस्था वगैरे तसेच मदरसा सिराजुल अुलुम मौलवी गंज धुळे यांचे ट्रस्टी यांना आमचे अशिल श्री. मोहन तुळशिराम नवले रा. साने गुरुजी सोसायटी जवळ, रेल्वे स्टेशनमागे धुळे यांचे कडून आमचे मार्फत या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील शेतजमीन सर्व्हे ५३१/२ चे क्षेत्र ० हे. २२ आर तसेच शेतजमीन सर्व्हे नं. ५३१/४ चे क्षेत्र ० हे. २३ आर या मिळकती संदर्भात आमचे अशिलाने मिळकत मालक मदरसा सिराजुल अुलुम मौलवीगंज, धुळे यांचे तत्कालीन ट्रस्ट १. मो. अबुलास हाफीज अ. कैय्युम, २. हाजी समसुलहक हाफीज मो. सिद्दीकी, ३. हाजी वकील अहमद हाजीलाल मोहम्मद, ४. हाजी रहमतुल्ला निजामोद्दीन, ५. मो. आबीद हाजी मो. आरीफ यांचेशी वर नमूद मिळकती संदर्भात दि. ११/०९/१९९६ रोजी रक्कम रुपये १,३१०००/- किंमतीला सदर मिळकती खरेदी देणेबाबत सौदा केलेला होता. सदर सौद्यापोटी बयाणा म्हणून आमचे अशिलाने रक्कम रुपये ३२,७५०/- धुळे जिल्हा मध्यवर्ती को. ऑप बँक धुळे या बँकेचा चेक क्र. ८२८१४ अन्वये अदा केलेले होते व आहे.

परंतु आमचे अशिलास नुकतेच लक्षात आले आहे की, मदरसा सिराजुल अुलुम मौलवीगंज धुळे हे सदर मिळकत वृत्तपत्रात जाहिरात देवून परस्पर त्रयस्तास विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत वर नमूद प्रमाणे आमचे अशिलाच्या सौदा कराराप्रमाणे मिळकतीत हितसंबंध आहे व सदर सौदा कराराच्या पुर्ततेकरीता आमचे अशिल लवकरच कायदेशीर कार्यवाही करणार आहेत.

सबब या नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकती संदर्भात मिळकत मालक मदरसा सिराजुल अुलुम मौलवी गंज धुळे यांचेशी कोणीही काहीही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर राहील व तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. ४/०९/२०२६

**ॲड.विनोदकुमार आर.वर्मा**
ऑफिस : चेंबर नं.१०४, ॲडव्होकेटस चेम्बर्स बिल्डींग,
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या द्वारे कळविण्यात येते की,

धुळे महानगर पालिका हद्दीतील, साक्री रोडवरील महिंदळे शिवारातील, अरुणकुमार वैद्य नगरातील सर्व्हे नं. ४१ मधील प्लॉट नं. ११४ यास सिटी सर्व्हे नं. २२३८ यांचे क्षेत्र सिटी सर्व्हे उताऱ्याप्रमाणे सुमारे २४६.७० चौ.मी. अदमासे पूर्व -पश्चिम १७ मिटर व उत्तर-दक्षिण १४ मिटर व त्यावरील बांधीव घर बंगला ८९.९६ चौ.मी. व उर्वरित बखळ जागेस चतु:सिमा :

पुर्वेस : प्लॉट नं. १०५ — पश्चिमेस : रोड/वापर
उत्तरेस : स. नं. ५३ — व दक्षिणेस: प्लॉट नं. ११३

येणे प्रमाणे चतु:सिमेतील घर, बंगला मिळकत ही मयत उत्तम नथ्थु जाधव, रा. धुळे यांची स्वसंपादीत मिळकत होती. श्री. उत्तम नथ्थु जाधव यांच्या मृत्यूनंतर वरील चतु:सिमांकीत मिळकतीबाबत त्यांचे वारसांमध्ये वाद विवाद होवून त्या मिळकतीबाबत बेकायदेशीर कागदपत्रे केलीत.त्यामुळे धुळे येथील मे. कोर्टात आमचे अशिलांनी १) श्रीमती इंदुमती भ्र. उत्तम जाधव, २) सौ.सुलभा शिवाजी देवरे, ३) प्रतिभा प्रकाश गवळे, ४) सुगंधा विनोद बागुल, यावारसांविरुद्ध दावा केला असून सदर दावा हा धुळे कोर्टात न्यायप्रविष्ठ आहे. परंतु सदर मिळकतीबाबत संबंधीत वारसांनी बेकायदेशीर, अधिकार बाह्य कागदपत्रे करुन वरील वादातील मिळकत विक्रीच्या आणि अगर इतर प्रकारे संगनमताने तबदील करण्याच्या प्रयत्नात आहे,असे आमचे अशिलास खात्रीशिररित्या कळाले आहे.

तरी सर्व संबंधितांना या द्वारे कळविण्यात येते की, वरील चतु:सिमांकीत मिळकती बाबत कोणीही खरेदी विक्रीचे आणि अगर कोणत्याही प्रकारे सदर मिळकत तबदीली बाबत व्यवहार करु नये. वरील मिळकतीबाबत कोणीही, काहीही व्यवहार केल्यास त्या मिळकती बाबत न्यायप्रविष्ठ असलेल्या कोर्टातील दाव्याचा निकाल त्या मिळकतीवर बंधनकारक राहील. त्याचे येणारे परिणामास संकल्पीत खरेदीदार आणि अगर मिळकत धारक सर्वस्वी जबाबदार राहतील. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती वरुन व कागदपत्रांवरुन प्रसिद्धीस दिली आहे. ठिकाण : धुळे दि. ५/०९/२०२६

**ॲड. ए. एम. शाह** मो. ९४२०४४१४०५
४४३७/१, गल्ली नं. ७, देवपूर, धुळे ४२४००२ .

## जाहीर नोटीस

तमाम जनता, सर्व कौटुंबिक, सामाजिक व व्यावसायिक हितसंबंधिय, सर्व पतसंस्था,राष्ट्रीयकृत वित्तीय संस्था, सुक्ष्म व गृह अर्थसहाय्य संस्था, खाजगी अर्थसहाय्य कर्ता, शासकीय निमशासकीय कार्यालये, गृहनिर्माण सोसायट्या, संबंधित सर्व नोंदणी कार्यालये, महानगरपालिका, महसूल नगर भूमापन विभाग, म. रा. वि. वि. कं. आदी तसेच या नोटीसीतील मिळकतीचे पुर्वोक्त खरेदी विक्री कर्ता यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी आफरीन बानो हाजी म.सुलतान, खालेदा बी हाजी,मा. आबीद हाजी, मो.सलमान हाजी, मो. सुफियान हाजी, हुमैदा बाप हाजी, तसलीमा बानो महेमुद, सफा बानो मो. नईम, सलमाबानोम मो. शफीक यांचे सामाईक मालकी व कब्जे उपभोगातील असलेल्या तुकडी जिल्हा धुळे,पोट तुकडी तालुका धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी येथील शेत जमीन मिळकत म्हणजेच.

मौजे धुळे म. न. पा. हद्दीतील पिंपरी येथील स. क्र. ७७/१चे एकूण क्षेत्र ० हे. ९१ आर, आकार रु. ४.२५ मधुन फे. नों. क्र. ३३२७अथवा लागू प्रमाणे मनमाड इंदौर (पुरमेपाडा ते बाळापूर) भुसंपादन क्षेत्र वजा जातां उर्वरित राहणारे क्षेत्र अशी मिळकत कायम स्वरुपी विकत घेण्याचा रितसर व्यवहार मिळकत मालक यांचेशी बयाणा रकमेचे अदायगीने निश्चित केलेला आहे. व नजिकच्या काळातच अंतिम खरेदीचा व्यवहारही पूर्ण करणार आहेत.

तरी सदरहू शेतजमीन मिळकतीसंबंधी कोणाचेही काही एक व्यवहार असल्यास व नियोजित व्यवहाराचे पूर्ततेस कोणाही संबंधितांचे काही एक म्हणणे, हरकत/हरकती आक्षेप असल्यास आणि/किंवा या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे तोंडी वा लेखी हक्क हितसंबंध अथवा काही एक व्यवहार जोडलेले असल्यांस त्याबाबत लिखित वा दस्त ऐवजी सपुराव्याने खालील स्वाक्षांकित यांचेकडेस या जाहीर नोटीस प्रसिद्धीपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सादर करावयात.तोंडी अथवा या मुदतीनंतर आलेल्या तसेच परस्पर वृत्तपत्रातून प्रसिद्ध केलेल्या कोणाच्याही कोणत्याही हरकती कदापी विचारात घेतल्या जाणार नाहीत व सदरची मिळकत ही निर्वेध असल्याचे ग्राह्य धरण्यांत येईल. ओघानेच या मुदतीनंतर आलेल्या हरकती व आक्षेप हे बेकायदेशीर व रद्द बातलच ठरतील याची नोंद घ्यावी.

वर नमूद मुदतीत कोणाच्याही काही एक सपुरावा हरकत/हरकती न आल्यांस वर नमूद मिळकतीसंबंधी अंतिम नोंदणीकृत व्यवहार एकमेकांचे सोयीनुसार करण्यास आमचे अशिल मुक्त राहतील याची संबंधितांनी विनंती नोंद घेणेस्तव ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.दिनांक ०५/०९/२०२६

**ॲड.नितिन कन्हैय्यालाल गुजराथी**
४४, नगरपट्टी, पाटबाजार, गांधी पुतळ्याजवळ, धुळे
कार्य : जिल्हा सत्र न्यायालय, धुळे
मो.९४२३९६३४३२/९८८११७१४७९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था, यासी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन तु. जि. धुळे पो. तु.ता. धुळे पैकी धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे महिंदळे येथील सर्व्हे नं. १०६/२/ड पैकी प्लॉट नं. १६ चे एकूण क्षेत्र २२३ चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा मंजूर ले आउट प्रमाणे :

वरील वर्णनांचे बखळ प्लॉटचे मालक **श्री. भिका रामदास चव्हाण** रा. खंडेराव हौसिंग सोसायटी,चितोड रोड, धुळे यांनी उपरोक्त बखळ प्लॉटची कायमस्वरुपी विक्रीबाबत आमचे अशिल यांचेशी विक्रीचा सौदा करार केला आहे.

मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त बखळ प्लॉटचे बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण,वहिवाट,कुळ जमीन जप्ती, टांच, वारस,बक्षिस, बोजा, सौदा करार, खरेदी विक्री इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावरप्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन शहानिशा करुन द्यावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे. प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

दिनांक ०५/०९/२०२६

**ॲड.ललित चांगदेव गायकवाड**
प्लॉट नं. ५, भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धुळे
मो.९७६४२८०४३४,९४०३८४४४७९

## पान १ वरुन

### पुन्हा लष्कराचे वर्चस्व वाढविणारा निर्णय

नियंत्रण कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. माजी लष्करी अधिकारी आणि विधिज्ञ कर्नल इनाम रहीम यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता सीडीएफ केवळ एका पत्राद्वारे कोणत्याही अधिकाऱ्याची हकालपट्टी करू शकतात; त्यासाठी यापूर्वी आवश्यक असणाऱ्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीची आता गरज उरलेली नाही. एकाच पदाच्या इतर दोन दलप्रमुखांना लष्करप्रमुखांच्या हाताखाली दुय्यम स्थान दिल्याचा आक्षेपही वकिलांकडून नोंदवला जात आहे. ब्रिटन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये अशा प्रकारची पदे असली, तरी तिथे तीन दलांच्या प्रमुखांना आलटून-पालटून संधी दिली जाते; पाकिस्तानात मात्र ही सर्व सत्ता कायमस्वरूपी केवळ लष्करप्रमुखांच्या हातात केंद्रीत करण्यात आली आहे.

**सरकारचा दावा काय?**

दरम्यान या फेरबदलाचे पाकिस्तान सरकारने समर्थन केले आहे. भूदल, नौदल, हवाई दल याबरोबरच सायबर आणि ड्रोन मोहिमांमध्ये सुसूत्रता आणणे, तीनही दलांमधील दरी मिटवणे आणि युद्धासारख्या आणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ निर्णय घेणे शक्य व्हावे, यासाठीच सर्व दलांचे नियंत्रण एका कमांडरकडे सोपवण्यात आल्याचे स्पष्टीकरण प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

### उड्डाणपुलाच्या कामामुळे वाहतूक कोंडी

आणि उतरताना पक्का रस्ता न करता केवळ कच्ची खडी टाकण्यात आली आहे. त्यामुळे येथे मोठे खड्डे पडले असून दररोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत. नुकतेच या भागात दोन ट्रक व एक ट्रॅक्टर उलटल्याच्या घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने, या निष्काळजीपणामुळे एका तरुणाचा आणि एका महिलेचा बळी गेला आहे.शिरपूरकडे जाणाऱ्या मार्गावर अत्यंत अरुंद पूल उभारल्याने शुक्रवारी अवजड ट्रॉला अडकून पडला. त्यामुळे प्रशासनाला खोदून ठेवलेल्या मुख्य ट्रॅकवरून आणि विरुद्ध बाजूच्या सर्व्हिस रस्त्यावरून दोन्हीकडची वाहतूक वळवावी लागली. एकाच रस्त्यावरून दुहेरी वाहतूक सुरू झाल्याने वाहतूक व्यवस्थेचा बट्ट्याबोळ झाला आहे. याचा सर्वाधिक फटका अमळनेर-सोनगीर बस सेवेला बसला असून ही वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारावर तात्काळ कारवाई करून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

### गळफास घेवून आत्महत्या

घेऊन मरण पावलेल्या अवस्थेत आढळला. त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी काही तासापूर्वीच त्याचा मृत्यू झाला असल्याचे घोषित केले. घटनेची माहिती घेणे सुरू असल्यामुळे घटनास्थळी नेमके काय आढळले हे सांगू शकत नसल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. मयंक याचा मोबाईल अधिक तपासासाठी पोलिसांनी ताब्यात घेतला असून मयंक कोणा कोणाच्या संपर्कात होता, याचाही तपास सुरू आहे.

### स्कुटीवरील दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू

दाखल केले. अपघाताची वार्ता पसरताच शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेत अपघातग्रस्तांना उपचारासाठी मदत केली. गंभीर दुखापतींनची तपासणी करून डॉ.मुकेश मोरे यांनी मयत घोषित केले.

घटनास्थळी स्कुटीचे मोठे नुकसान झाले असून आयशर ट्रकचे पुढील दोघेही चाक फुटल्याने दुसऱ्या साईडने समोरुन येणाऱ्या वाहनचालकांनी प्रसंगावधान राखून पुढील अनर्थ टळला.

### घरफोडीचेही सत्र सुरूच

संजय बोरसे (३१, ह.मु. वृंदावन कॉलनी, देवपूर) यांचे विंचूर येथील घर बंद होते. चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटात ठेवलेली ५० हजारांची रोकड, सोन्याची साखळी, १२ ग्रॅमची सोनपोत, २६ ग्रॅमची मोठी सोनपोत, सोन्याच्या दोन अंगठ्या, सोन्याचे कानातील दागिने, दोन सोन्याच्या नथ, लहान मुलांच्या पाच सोन्याच्या अंगठ्या, चांदीची जोडवी, करदोडा, साखळ्या असा एकूण चार लाख ८३ हजार २०० रूपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. बुधवारी रात्री घरफोडीचा प्रकार घडला. याप्रकरणी जिजाबराव बोरसे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### हृदयविकार क्लिनिकचा शुभारंभ

जिल्ह्यातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विशेष म्हणजे, ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांना या उपक्रमाचा लाभ घेता येणार आहे. हृदयविकाराच्या शस्त्रक्रियेसाठी साधारणपणे सात ते आठ लाख रुपयांपर्यंत खर्च येऊ शकतो. मात्र, या उपक्रमांतर्गत पात्र बालकांच्या आवश्यक शस्त्रक्रिया मोफत करण्याचा प्रयतक करण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या गोरगरीब कुटुंबांसाठी हा उपक्रम मोठा आधार ठरणार आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक कुटुंबांना बालकांच्या हृदयविकाराची माहिती उशिरा मिळते किंवा उपचाराचा मोठा खर्च परवडत नसल्याने उपचार रखडतात. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा रुग्णालय आणि एबी फाउंडेशनने पुढाकार घेत हा उपक्रम सुरू केला आहे. गरजू बालकांना वेळेत निदान, तज्ज्ञांचा सल्ला आणि आवश्यक उपचारांची दिशा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, एबी फाउंडेशनचे अध्यक्ष व आरोग्यदूत कमलेश देवरे तसेच आरबीएसकेच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले आहेत.

### कायदेविषयक सहाय्य, मार्गदर्शन केंद्र

विधी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या सहकार्याने केंद्राच्या माध्यमातून गावातील नागरिकांना आवश्यक कायदेविषयक सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.कायदेविषयक सहाय्य व मार्गदर्शन केंद्र, सोनगीरपाडा हे तळागाळातील नागरिकांपर्यंत न्याय व विधी सेवा पोहोचविण्यासाठी तसेच नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबाबत जागरूक करण्यासाठी महत्त्वपूर्ण माध्यम ठरणार आहे, असे जिल्हा न्यायाधीश-१ ए. एच. सैय्यद यांनी यावेळी प्रतिपादन केले.

### आश्वासनामुळे तुर्त स्थगित

चौकात, पोलीस स्टेशनच्या जवळ, मंदिरांच्या जवळ, बाजार पेठेत सर्वत्रच खुलेआम अवैध धंदे सरास सुरू आहे, महाविद्यालय शाळा परिसरात नशेली पदार्थांची विक्री होते आहे. असे याआधी कधी धुळेकरांनी बघितले नाही. आज कायदा सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजलेले असतांना, धुळेकर सुरक्षित राहिलेला नाही. धुळेकरांच्या तक्रारी नंतर अवैध धंदे व गुन्हेगारी ताबडतोब बंद व्हावे यासाठी आंदोलन उपोषण करण्यात आले होते.

तब्बल नऊ दिवस आंदोलन चालले त्यात ॲड.गोरे यांनी साखळीपद्धत आंदोलन करून दररोज नवनवीन प्रतीकात्मक स्वरूपात आंदोलने करून प्रशासनाला जागे करण्याचे काम केले. अखेर तारखेला पोलीस विभागाच्या वतीने प्रतिनिधी वरिष्ठांसोबत चर्चा करून आलेत आम्ही त्यांना अवैध धंद्यांवर त्वरित कारवाई करावी तसे आम्हाला लेखी आश्वासन द्यावे. पोलीस विभागाच्या वतीने अवैध धंद्यांवर कारवाई सुरू असून पुढील काळात सर्वच अवैध धंद्यांवर कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन दिले. पोलीस प्रशासनाच्या लेखी आश्वासनावर विश्वास ठेवून आंदोलन तात्पुरता स्वरूपात स्थगित केले असून पुढील काळात कारवाई न झाल्यास पुन्हा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशाराही देण्यात आला आहे. पोलीस विभागाच्या वतीने प्रतिनिधी आले असता आम्ही त्यांना कळवले की कारवाईचे लेखी आश्वासन व पोलीस अधीक्षांसोबत चर्चा.. त्या मध्ये प्रथमता पोलीस अधिक्षक विशालजी आनंद यांची भेट घेतली, सकारात्मक चर्चा झाली त्यांनी अवैध धंद्याबाबत कारवाई सुरू झालेली आहे. सोबत नशेली पदार्थ ड्रग्स वैगेरे ज्या पण आहेत त्या वरही कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले. याच दरम्यान गेल्या आठ दिवसात धुळेकरांनी आंदोलन स्थळी येऊन दिलेल्या सर्व अवैध धंद्याची यादी पोलीस अधीक्षक यांच्या कडे सुपूर्द केली. यावेळी ॲड.गोरे यांच्या समवेत पंकज भारस्कर, संदीप चौधरी, संजय पाटील, सागर निकम, सागर साळवे, डॉ.सुनील पाटील, बंटो गोरे, स्वप्नील सोनवणे, निलेश चौधरी, सौरभ जवराल, गोकुळ येलमामे, दर्शन कंबायत यांच्या सहपदाधिकारी उपस्थित होत.

## पान १ वरुन

### शहादा नगरपालिकेचे दुर्लक्ष

समिती कार्यालय परिसर, बस स्थानक परिसर, जुना खेतिया रोड, मेन रोड, जुना प्रकाशा रोड, गरीब नवाज कॉलनी परिसर आणि प्रेस मारुती मैदान या भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. अनेक ठिकाणी तर अतिक्रमणधारकांनी पक्क्या स्वरूपाची बांधकामे केली आहेत. असे असतानाही नगरपालिकेचा बांधकाम विभाग आणि संबंधित अधिकारी मात्र यावर कोणतीही कारवाई न करता डोळ्यावर पट्टी बांधून गप्प बसले आहेत.अतिक्रमणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस रस्त्यांची रुंदी कमी होत चालली आहे. यामुळे सामान्य नागरिक आणि वाहनधारकांना गाड्या चालवणे कमालीचे कठीण व त्रासदायक ठरत असून रोज लहान-मोठे अपघात घडू लागले आहेत. नगरपालिका अधिकाऱ्यांनी कार्यालयाबाहेर पडून शहरात फेरफटका मारणे गरजेचे असताना ते मात्र शहराच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत आहेत. याबाबत विचारणा केली असता, पावसाळ्यात अतिक्रमण काढू नये असे शासनाचे निर्देश असल्याने आपण सध्या काहीच करू शकत नाही. अशी प्रतिक्रिया बांधकाम अभियंत्यांनी व्यक्त केल्याने नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त होत आहे.एकूणच नगरपालिका प्रशासनाच्या आणि विशेषतः बांधकाम विभागाच्या नाकर्तेपणामुळेच शहादा शहराला अतिक्रमणाचा विळखा पडल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे आता जिल्हा प्रशासनानेच या प्रकरणी तातडीने लक्ष घालून शहादा नगरपालिका प्रशासनाला अतिक्रमणविरोधी मोहीम राबवण्यासाठी कठोर निर्देश द्यावेत, अशी तीव्र मागणी जोर धरू लागली आहे.

### विविध मागण्यांसाठी शहाद्यात निदर्शने

दररोज शिक्षणासाठी प्रवासावर अवलंबून असतात, परंतु नियमित बसफेऱ्या नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून या मार्गांवर तातडीने बसफेऱ्या वाढवण्याची मागणी शहादा आगार प्रमुखांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.याचबरोबर शहादा प्रांत कार्यालयावर शाळा वाचवा! मोहिमेअंतर्गत तसेच आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही व्हावी, यासाठी जोरदार आंदोलन करण्यात आले.आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांमुळे परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुलभ शिक्षण मिळावे, शाळांचे प्रश्न सुटावेत आणि वसतिगृहांतील समस्या तात्काळ मार्गी लागाव्यात, अशी ठाम भूमिका संघटनांनी घेतली. प्रशासनाने या प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता योग्य ती पावले उचलावीत, अन्यथा आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही एसएफआय व डिवायएफआयच्या पदाधिकाऱ्यांनी याप्रसंगी दिला.

### जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा

हंगामासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत तसेच मजुरीवर मोठा खर्च केला आहे. सुरुवातीला पिकांची परिस्थिती समाधानकारक असल्याने हा खर्च वसुल होईल अशा आशेवर शेतकरी वर्ग होता. परंतु सगळ्याच पिकांची वाढ खुंटलीय. कपाशीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने बोंडधारणा झालेली नाही. नुकसान झालेली पिके वाचविण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे नुकसान ग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करुन धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये ही भरीव मदत द्यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हा प्रमुख निंबा मराठे, नरेंद्र परदेशी, महानगरप्रमुख धिरज पाटील, जिल्हा समन्वयक जनार्दन मासुळे (धुळे ग्रामीण), किशोर वाघ (साक्री), बाबाजी पाटील, हेमराज पाटील तालुका प्रमुख धुळे ग्रामीण चंद्रकांत देसले, तुषार गवळी तालुकाप्रमुख साक्री, नितीन पाटील सहसमन्वये धुळे ग्रामीण, विश्वनाथ सोनवणे विधानसभा क्षेत्र प्रमुख, धुळे तालुका संघटक राजेंद्र पाटील, प्रकाश वाघ सहसंघटक कल्पेश राजपुत, अमोल ठाकरे, समन्वयक भिकनसिंग राजपुत, कैलास वाणी, समन्वयक जगदीश पाटील, दिलीप चव्हाण, भाऊसाहेब शिंदे, प्रदीप (भोला) पाटील यांनी केली आहे.

### वेलफेअर फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण

असली व शिरपूर येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वृक्षांचे संगोपन व संवर्धन ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.स्व. तपनभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्फूर्तींना अभिवादन करत आणि माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करत २ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. या माध्यमातून समाजात पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्प करण्यात आला. दोन हजार वृक्षांची लागवड हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनच्या या उपक्रफातून वृक्ष लावा, पर्यावरण वाचवा हा संदेश देण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संरक्षणासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी कौतुक केले.

## निधन वार्ता

### दगुबाई वाघ



सोनगीर दि. ५- येथील दगुबाई भिमराव वाघ यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७७ वर्षाच्या होत्या. सेवानिवृत्त कृषी पर्यवेक्षक भीमराव वाघ यांच्या त्या पत्नी तर महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना(उबाठा) धुळे व नंदुरबार जिल्हा संपर्कप्रमुख मुरलीधर मोरे यांच्या भगिनी होत. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, जावाई असा परीवार आहे.

### आप्पा भामरे



शहादा,दि.५- तालुक्यातील ब्राह्मणपूरी येथील सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक आप्पा गोरख भामरे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले असा परिवार आहे. ते शिक्षक मनोहर भामरे व अनिल भामरे यांचे वडील होत.

### तांब्याची तार लंपास

धुळे : कोकले (ता. साक्री) शिवारात रोहित मधुकर खैरनार यांचे शेतातून चोरट्यांनी ६५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल लांबविला. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

### अभिनेत्री स्वरा भास्करच्या वक्तव्याविरोधात राजपूत समाजाचे पोलीस ठाण्यात निवेदन

**दोंडाईचा दि. ५(प्रतिनिधी)- वीरांगना राणी पद्मावती यांच्या त्याग, शौर्य आणि बलिदानाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करत अभिनेत्री स्वरा भास्कर यांच्याविरोधात दोंडाईचा येथे राजपूत समाजाच्या वतीने तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित अभिनेत्रीवर कायद्यानुसार गुन्हा दाखल करून योग्य ती कारवाई करावी, या मागणीचे निवेदन अखिल भारतीय क्षत्रिय महासभा व समस्त राजपूत समाज, दोंडाईचा यांच्या वतीने स्थानिक पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना सादर करण्यात आले.**

राणी पद्मावती या राजपूत समाजाच्या इतिहासातील शौर्य, स्वाभिमान आणि त्यागाचे प्रतीक आहेत. स्वरा भास्कर यांच्या वक्तव्यामुळे राजपूत समाजाच्या भावना दुखावल्या असून समाजात तीव्र नाराजीचे वातावरण पसरले आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा प्रकारे ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा अवमान होणार नाही याची काळजी घेण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.हे निवेदन सादर करताना अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचे पदाधिकारी तसेच समाजबांधव उपस्थित होते. निवेदनावर सौ. इंदिरा देवेंद्र रावळ, सौ. अमृता निखिल जाधव, सौ. कल्पना चंद्रकांत जाधव, सौ. एकता जितेंद्रसिंग



गिरासे, सौ. सुनीता महेंद्रसिंग गिरासे, सौ. सारिका गिरासे, सौ. योजना भरतसिंग गिरासे, सौ. मनीषा जितेंद्रसिंग गिरासे आणि प्रदीपसिंग सोलंकी यांच्यासह दोंडाईचा येथील समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**WANTED ACCOUNTANT – REQUIRED –**

**SIDDHANT AGRAWAL & ASSOCIATES**
CA OFFICE – MIDC, DHULE

QUALIFICATION: B.Com / M.Com
EXPERIENCE: 2–5 years preferred
JOB LOCATION: Awadhan, MIDC, Dhule
SALARY: Negotiable – As per qualification & experience

SKILLS REQUIRED
- Tally Prime & MS Excel
- Purchase & Sales Accounting
- Bank Reconciliation & Finalization
- Day-to-day accounting and documentation

JOIN OUR TEAM – JOIN IMMEDIATELY PREFERRED

INTERESTED CANDIDATES MAY CONTACT:
7507239218
Send your CV to: siddhantdilipagrawal@gmail.com

GROW YOUR CAREER WITH US!

**नोकरीच्या सुवर्णसंधी**

एकदंत स्पिनिंग प्रा. लि. तर्फे आमच्या वाढत्या संस्थेसाठी पात्र, अनुभवी व प्रमाणिक उमेदवारांकडून खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

ठिकाण : अवधान MIDC, धुळे येथील स्पिनिंग मिल



रिक्त पदे :
- Sr. Accountant – वरिष्ठ लेखापाल
- Jr. Accountant – कनिष्ठ लेखापाल
- Electrician – इलेक्ट्रीशियन
- MIS Executive – एमआयएस कार्यकारी

व्यावसायिक क्षेत्रात प्रगती करण्याची इच्छाअसलेल्या तसेच कापड उद्योगातील प्रगतिशील संस्थेसोबत करिअर घडविण्यास इच्छुक उमेदवारांनी अर्ज करण्यास प्रोत्साहित केले जाते.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपला अर्ज सादर करावा.

ekdanta SPINNING
संस्था : एकदंत स्पिनिंग प्रा. लि.
कार्यालय : अवधान MIDC, धुळे, महाराष्ट्र
उद्योग : स्पिनिंग / टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरिंग
ई-मेल : hr@ekdantaspinning.com संपर्क : 8669988654

"“आपल्या उज्वल करिअरसाठी आमच्या वाढत्या टीमचा एक भाग बना!”"

**पाहिजेत**

रेडिमेड कपड्यांच्या दुकानासाठी
Sales man / Sales Girl
त्वरित पाहिजे.
आकर्षक पगार देण्यात येईल
-:संपर्क :-
गौतम जैन
पाच कंदिल, आग्रारोड, धुळे
8208392178

**पाहिजेत**

दुकान कामासाठी
सेल्समन व
हेल्पर लावणे आहे.
जेन्टस व लेडीज
-: समक्ष भेटा :-
शाह हॅन्डलुम
नवग्रही गल्ली नं. २,
पारोळा रोड, धुळे

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



**शंकर विजय सॉ मिल**
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

**पाहिजेत**

अनुभवी सेल्समन
पाहिजेत पगार
अनुभवाप्रमाणे
देण्यात येईल.
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड
& होजीअरी
अकबर चौक,
गल्ली नं.२, धुळे
9422286958

**पाहिजेत**

गरुड मैदान कॉम्प्लेक्स येथे सुरु होणाऱ्या नवीन रेडीमेड गारमेंट्स शोरूमसाठी जागा भरणे आहेत!
अनुभवी सेल्समन– ५ जागा
हेल्पर– २ जागा
अनुभवी व इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
-: संपर्क :-
+91 90493 50591

**घर विकणे आहे**

न.भु.क्र.४७८८/ब-१०/धुळे १
प्लॉट नं.४७८८/ब-१०
क्षेत्र चौ. मी. १६७.२०
भिडे बाग, धुळे ता.जि. धुळे
......
R.C.C. दोन मजली
बांधकाम १८०० स्क्वे. फिट
पश्चिम मुखी
दोन रोड कॉर्नर.
-:संपर्क :-
वैभव वि. उपासणी
7387700466

**गणपती बाप्पा मोरया**

बाप्पाच्या आवडीचे
मोदक
फक्त मदर्स किचनमध्येच
१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ
(अनारसे, करंजी, चकली, चिरोटे). नोंदणी आवश्यक
मदर्स किचन
फुलवाला चौक धुळे.
9049902201
7887750864

**फ्लॅट विकणे आहे**

वेल फर्निचरसह फ्लॅट
2 BHK
850 स्क्वे. फुट
विकणे आहे.
-:संपर्क :-
कुबेर अपार्टमेंट
फ्लॅट नं. ८ प्लॉट ११,
प्रोफेसर कॉलनी, देवपूर धुळे
9422787659

**REQUIRED**

Required: Hospital Administrative Officer (Male/Female)
For a 50-bedded Hospital at Dhule.
Experience in Hospital Administration.
Degree/Diploma in Health Care Management. Preference to Doctor- BAMS/BHMS/BUMS/BEMS/DHMS/BDS candidates.
Contact: 9422961803

**पाहिजेत**

धुळे, शिंदखेडा, शिरपूर, दोंडाईचा, साक्री, पिंपळनेर येथे कंपनीचा कामासाठी मुले-मुली पाहिजे आकर्षक पगार व कमिशन.
संपर्क
7387894755

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**

atomberg "Why not?"





क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरूरत नहीं होती है !

SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

**पाहिजेत**

होलसेल मेडिकलमध्ये
कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि
कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8888096777

**पाहिजेत**

Coputer Oprutor पाहिजे
(Tally आवश्यक)
Part Time/Full Time
Ladies /Gents
संपर्क:- आकाशदीप साडी एम्पोरियम
जे.बी.रोड, धुळे, फोन – 233230

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०